सोलापूर

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा


SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

लातूर | शुक्रवार, ७ नोव्हेंबर २०२५ | वर्ष ३ रे अंक २४७ | पाने १२ | किंमत रु. ६/- ■ RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.

dainiktarunbharat.com | epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



तुम्ही आपल्या कार्यकर्त्यांना संघकार्य करण्याचा आदेश देण्याऐवजी प्रेरणा द्या. त्यांना कार्यासाठी उत्साह द्या. आपल्याला आदेश दिला जातो आहे, असे कोणालाही चुकूनसुद्धा वाटता कामा नये, असे तुमचे वागणे, बोलणे असले पाहिजे. त्याला असे वाटले पाहिजे की हे कार्य म्हणजे आपले जीवितकार्यच आहे आणि असे वाटले की तो पूर्ण तन्मयतेने त्या कार्याला वाहून घेईल.

**- लक्ष्मणराव भिडे**
रा. स्व. संघाच्या विश्व विभागाचे पूर्व संयोजक आणि दीनदयाल शोध संस्थानचे पूर्व अध्यक्ष

# ईकेवायसी अभावी जिल्ह्यातील पावणे दोन लाख पूरग्रस्त शेतकरी मदतीपासून वंचित

- ३ लाख ४१ हजार शेतकऱ्यांच्या खात्यावर ४०९ कोटी १९ लाख झाले जमा
- पूर व अतिवृष्टी बाधित ५ लाख २७ हजार शेतकऱ्यांना आजपर्यंत ६४९ कोटी मंजूर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ नोव्हेंबर-**

अतिवृष्टी आणि पूर स्थितीमुळे जिल्ह्यातील बाधित ७ लाख ६४ हजार १७३ शेतकऱ्यांच्या याद्या अपलोड केल्या आणि या शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईसाठी ८६७ कोटी ३७ लाख ६३ हजार ८५५ रूपयांची मागणी अहवालाद्वारे केली आहे. यातील सर्वच रक्कम मंजूर झाली असून, यातील ५ लाख २७ हजार १८८ शेतकऱ्यांना आजतागायत ६४८ कोटी ९५ लाख ३४ हजार ९८३ रूपये मंजूर झाले असून, त्यापैकी ३ लाख ४१ हजार ०९५ शेतकऱ्यांच्या



खात्यावर आजतागायत ४०९ कोटी १९ लाख ८४ हजार ०५२ रूपये झाले जमा झाले आणि ईकेवायसीअभावी १ लाख ७५ हजार १८१ शेतकऱ्यांचे शासनाकडून आलेले २१२ कोटी २३ लाख ४३ हजार ५८४ रूपये जमा होवू शकलेले नाहीत. उर्वरित शेतकऱ्यांच्या खात्यावरही येत्या २ ते ३ दिवसात पैसे जमा होतील, अशी माहिती जिल्हा प्रशासनाकडून मिळाली. आजतागायत जवळपास ९० ते ९५ टक्के शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसे पडले असून, उर्वरित बाधित शेतकऱ्यांनाही लवकरच पैसे मिळणार आहेत. शासनाने महापुराच्या संकटात नुकसान भरपाई देण्याचा शब्द दिला होता. इतकेच नाहीतर घरांच्या बाधित कुटुंबांना दिवाळीपूर्वी पैसे मिळाले तर सर्वच पूरग्रस्तांना दिवाळीसाठी कीट वाटप केले आहेत. जिल्ह्यातील शेतकऱ्यांना शासकीय मदत मिळू लागल्याने महापुराच्या संकटातून खचलेल्या शेतकऱ्यांना यातून नक्कीच बळ मिळणार आहे.

जिल्ह्यातील १०३ महसूल मंडलात अतिवृष्टी झाली होती; २१ ते २३ सप्टेंबरपर्यंत महापुराचे मोठे संकटही ६ तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांवर ओढवले होते. राज्य सरकारने भरपाईसाठी तीन हेक्टरपर्यंत मदत देण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी ३२ हजार कोटींचे पॅकेज जाहीर करण्यात आले. जिल्ह्यात झालेली अतिवृष्टी आणि महापुराने बाधित शेतकरी एकूण संख्या ७ लाख ६४ हजार १७३ इतके आहेत.

(उर्वरित पान ५ वर)

### ‘ॲग्रीस्टॅक’साठी जिल्हाभरात कॅम्प सुरू

जिल्ह्यातील अजून १० ते १२ टक्के लोकांचे ॲग्रीस्टॅक झाले नसल्याने त्यांच्या खात्यावर ही नुकसान भरपाईची रक्कम मिळणार नाही. त्याही शेतकऱ्यांना लवकर पैसे मिळावे यासाठी गावोगाव शिबिरे घेवून त्या शेतकऱ्यांचे ॲग्रीस्टॅक करून घेतले जात आहेत. तर आम चे अधिकारी, कर्मचारी मोठमोठ्या गावात जावून प्रत्येक गावातील २० ते २५ माणसांशी चर्चा करून शासनाकडून येणारी मदत मिळते की नाही? याचीही चौकशी करून त्याचे अहवाल आमच्याकडे पाठवित आहेत.

**- कुमार आशीर्वाद, जिल्हाधिकारी सोलापूर**

## महत्त्वाचे

### बाजारात पुन्हा निराशेचे ढग

**मुंबई** : गुरुवारच्या सत्रात शेअर बाजारात निराशाजनक वातावरण राहिले. आयटी आणि ऑटो वगळता सर्व



निर्देशांक विक्रीच्या दबावाखाली राहिले. निर्देशांक ९० अंकांनी खाली येत ८३,३६९ वर तसेच निफ्टी ७८ अंकांनी घसरून २५,५२० वर बंद झाला. परकीय गुंतवणूकदारांनी शेअर्स विक्रीचा सपाटा लावल्याने बाजारात निराशा पसरली. त्याचा परिणाम म्हणून निर्देशांक तसेच निफ्टीत किरकोळ का असेना घसरण झाली. सर्वाधिक घसरण पॉवर ग्रीडच्या शेअर्समध्ये दिसून आली. त्यापाठोपाठ इटर्नल, बजाज फायनान्स, आयसीआयसीआय बँक, एनटीपीसी यांनाही धक्का बसला. या घसरणीच्या वातावरणातही एशियन पेण्ट्स, रिलायन्स, महिंद्रा, अल्ट्राटेक सिमेंट आणि टीसीएसचे शेअर वधारले होते.

### महाराष्ट्राला थंडीची चाहूल; तापमान घटणार

**सोलापूर** : राज्यात मागील दोन ते तीन आठवड्यांपासून अवकाळी पावसाचा जोर कायम होता. परतीच्या पावसाने आणि बंगालच्या उपसागरातील कमी दाबाच्या पट्ट्याने वातावरण आर्द्र आणि अस्थिर होते. पण आता अखेर राज्यभरासह सोलापूर शहर-जिल्ह्यात थंडीची चाहूल लागण्यास सुरुवात झाली आहे. भारतीय हवामान खात्याने पुढील २४ तासात तापमान घटण्याचा अंदाज वर्तवला असून मुंबईसह राज्याच्या बहुतांश भागात गारवा वाढणार आहे. ७ नोव्हेंबरपासून हवामानात स्पष्ट बदल होणार असून कोरडे आणि थंड वातावरण निर्माण होईल.

### भगवंत मैदानावर आज 'वंदे मातरम' कार्यक्रम

**बार्शी** : वंदे मातरम गीताला १५0 वर्षे पूर्ण झाल्याबद्दल आज भगवंत मैदान येथे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून बार्शीकरांनी जास्तीत जास्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन तहसीलदार एफ. आर.शेख यांनी केले आहे.

# ‘वंदे मातरम्’चा आज शतकोत्तर सुवर्ण महोत्सव

- भारतीय स्फूर्तिगीताच्या रचनेला १५० वर्षे पूर्ण
- आज देशभरात १५० ठिकाणी भरगच्च कार्यक्रम

**नवी दिल्ली, ६ नोव्हेंबर**

भारताच्या स्वातंत्र्य संग्रामात ‘वंदे मातरम्’चा नारा देत अनेक ज्ञात-अज्ञात देशभक्तांनी मृत्यूला कवटाळले. या स्फूर्तीगीताच्या रचनेला १५० वर्ष पूर्ण झाली असून यानिमित्त सरकारने देशभरात १५० ठिकाणी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी शुक्रवारी दिल्लीच्या इंदिरा गांधी स्टेडियममध्ये अशाच एका कार्यक्रमात सहभागी होणार आहेत.

भारताचे राष्ट्रीय गीत ‘वंदे मातरम्’ यंदा १५० वे वर्धापन दिन साजरे करत आहे. केंद्र सरकारने या निमित्ताने देशभरातील १५० ठिकाणी कार्यक्रम आयोजित करण्याचा निर्णय घेतला आहे. वंदे मातरम हे सामूहिक गायले जाईल. शिवाय, सर्व कार्यक्रमांमध्ये एक ज्येष्ठ नेता, मंत्री किंवा अधिकारी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

सांस्कृतिक मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, पंतप्रधान ‘वंदे मातरम्’च्या १५० व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात सहभागी होतील. दरम्यान, जम्मू आणि काश्मीरमध्ये या कार्यक्रमांबाबत इस्लामबाबत प्रश्न उपस्थित झाले आहेत. मिरवाइज उमर फारूख यांच्या नेतृत्वाखालील मुत्ताहिदा मजलिस-ए-उलेमाने केंद्रशासित प्रदेश सरकारवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. सरकारने सर्व शाळांना ‘वंदे मातरम्’ला समर्पित संगीत आणि सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्याच्या आदेशावर आक्षेप घेतला आहे.

इस्लामिक संघटनेचा असा युक्तिवाद आहे की ‘वंदे मातरम्’ कार्यक्रमांमध्ये सहभागी होणे बंधनकारक आहे. मुस्लिम बहुल भागात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची हिंदुत्ववादी विचारसरणी लादण्याचा हा प्रयत्न आहे. ७ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या कार्यक्रमांमध्ये शालेय मुले, महाविद्यालयीन विद्यार्थी, अधिकारी, निवडून आलेले प्रतिनिधी, पोलिस अधिकारी आणि डॉक्टरांसह नागरिकांचा सहभाग असेल. या कार्यक्रमांमध्ये ‘वंदे मातरम्’चे सामूहिक गायन समाविष्ट असेल. (वृत्तसंस्था)

### महाराष्ट्रात १५ ठिकाणी कार्यक्रम




**मुंबई** : ‘वंदे मातरम्’या राष्ट्रगानाला १५० वर्षे पूर्ण होत असल्यानिमिताने भारतीय जनता पार्टीतर्फे राज्यात १५ ठिकाणी कार्यक्रम होणार आहेत. केंद्रीय रस्ते बांधणी मंत्री नितीन गडकरी, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यासह राज्यातील अनेक मंत्री सहभागी होणार असल्याची माहिती भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी गुरुवारी दिली. नागपूर, अकोला, ठाणे, रायगड, पुणे, अहिल्यानगर, सातारा, जळगाव, धुळे, छत्रपती संभाजीनगर, कुलाबा (मुंबई), मानखुर्द, अंधेरी, मालाड या ठिकाणी हे कार्यक्रम होतील.

वेदमंत्राहून आम्हां वंद्य, वंदे मातरम्। (प्रासंगिक) (पान ४ वर)

### या प्रमुख ठिकाणी देखील गायिले जाईल ‘वंदे मातरम्’

७ नोव्हेंबर रोजी १५० महत्त्वाच्या ठिकाणी वंदे मातरम गायले जाईल, त्यानंतर स्वदेशी उत्पादने वापरण्याची प्रतिज्ञा केली जाईल. या काळात कविता लेखन, पठण आणि चित्रकला असे अनेक इतर कार्यक्रम देखील आयोजित केले जातील. तसेच कारगिल युद्ध स्मारक, अंदमान आणि निकोबार सेल्युलर जेल, ओडिशातील स्वराज आश्रम, आग्रा येथील शहीद स्मारक उद्यान आणि वाराणसीतील नमो घाट यांचा समावेश आहे.



पहिल्या टप्प्यातील मतदानासाठी लागलेली रांग

# बिहारमध्ये पहिल्या टप्प्यात ६४ टक्के मतदान

### तेजस्वी यादव, सम्राट चौधरींचे भाग्य ईव्हीएम बंद

**पाटणा, ६ नोव्हेंबर**

बिहार विधानसभेच्या पहिल्या टप्प्यात १२१ जागांवर गुरुवारी सायंकाळी पाच वाजेपर्यंत ६४.४६ टक्के मतदान झाले. पहिल्या टप्प्यात एकूण १३१४ उमेदवार रिंगणात होते.

पहिल्या टप्प्यातील उमेदवारांत ११९२ पुरुष, तर १२२ महिलांचा समावेश आहे. या टप्प्यात १०२ जागा सामान्य उमेदवारांसाठी, १९ टक्के अनुसूचित जातींसाठी राखीव आहेत. या टप्प्यात तीन कोटी ७५ लाख १३ हजार ३०२ मतदारांनी मतदानाचा अधिकार पूर्ण करावा, यासाठी निवडणूक आयोगाने साधने उपलब्ध करून दिली. यात एक कोटी ९८ लाख ३५ हजार ३२५ पुरुष, तर एक कोटी ९८ लाख ३५ हजार २१९ महिला आणि ७५८ तृतीयपंथी मतदारांचा समावेश होता.

यातील राघोपूर विधानसभा मतदारसंघात राजदचे नेते आणि माजी उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव रिंगणात आहेत. तेजस्वी यादव यांनी याच मतदारसंघातून निवडणूक कारकीर्दीची सुरुवात केली होती. २०१५ आणि २०२० मध्ये त्यांनी या जागेवरून विजय मिळवला आहे. भाजपाने येथे मागील वेळी सतीशकुमार यांना उमेदवारी दिली. त्यांनी २०१० मध्ये जदयूच्या तिकिटावर राबडीदेवी यांचा पराभव केला होता. (वृत्तसंस्था)

# पार्थ पवारांशी संबंधित जमीन प्रकरणात उपनिबंधक निलंबित

### ३०० कोटींच्या सौद्याच्या चौकशीचा आदेश

**पुणे, ६ नोव्हेंबर**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांच्याशी संबंधित ३०० कोटी रुपयांच्या जमीन व्यवहाराबद्दल महाराष्ट्र महसूल विभागाने एक उपनिबंधकाला निलंबित केले आणि या व्यवहाराची चौकशी करण्यासाठी एक समिती स्थापन करण्यात आली आहे. सात दिवसांमध्ये चौकशी समिती अहवाल सादर करणार आहे.



प्राथमिकदृष्ट्या हा प्रकार गंभीर दिसत असल्याने चौकशीचा आदेश देण्यात आला आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले. असे असले तरी, या मुद्यावर विरोधकांनी महायुतीवर टीका केली आहे. सरकारी मालकीची ४० एकर महार वतन जमीन पार्थ पवार भागीदार असलेल्या अमेडिया एंटरप्रायझेस एलएलपीला ३०० कोटी रुपयांत विकण्यात आली. यावरील मुद्रांक शुल्क माफ करण्यात आले, अशी माहिती अधिकाऱ्याने दिली.

नियमाप्रमाणे सरकारी जमीन खाजगी प्रतिष्ठानाला विकता येत नाही, असे त्याने सांगितले. सरकारी जमीन खाजगी प्रतिष्ठानाला कशी विकली गेली आणि नियमांनुसार सूट देण्यात आली की नाही, हे तपासण्यासाठी एक उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली, अशी माहिती नोंदणी महानिरीक्षक रवींद्र बिनवडे यांनी वृत्तसंस्थेला दिली.

या जमिनीचा सात-बाऱ्याची नोंद मुंबई सरकारच्या नावे आहे. प्रॉपर्टी कार्डवर त्याच्या मालकाचे नाव असून, ती खाजगी प्रतिष्ठानाला विकण्यात आल्याचे दिसून आले. या मुद्यावर वृत्तसंस्थेने पार्थ पवार यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. पण, त्यांनी प्रतिसाद दिला नाही. या नोंदणीत नाव असलेले पार्थ पवार आणि दिग्विजय पाटील हे कंपनीचे सहमालक आहेत. (वृत्तसंस्था)

### पार्थ पवार यांच्या कंपनीवर गुन्हा दाखल?

पार्थ पवार संचालक असलेल्या अमेडिया कंपनीवर गुन्हा दाखल होणार असल्याची माहिती समोर येत आहे. मुद्रांक शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी याबाबत माहिती दिल्याचं एका वृत्तवाहिनीकडून सांगण्यात आलं. मुद्रांक शुल्क विभागाचे सहनोंदणी महानिरीक्षर रवींद्र मुठे यांनी ही माहिती दिली आहे. या प्रकरणात सब रजिस्टरवरही गुन्हा दाखल होणार असल्याची माहिती आहे. अमेडिया होल्डिंग्स एलएलपी कंपनीला आणि मुद्रांक शुल्क विभागाने नोटीस बजावल्याची माहिती समोर आली आहे. स्टॅम्प ड्युटी म्हणजेच मुद्रांक शुल्कची दोन टक्के रक्कम भरण्यासाठी ही नोटीस बजावण्यात आली आहे. अमेडिया कंपनीला दोन टक्के प्रमाणे सहा कोटी रुपये मुद्रांक शुल्क म्हणून भरावे यासाठी नोटीस बजावण्यात आली आहे.

# रैना, धवनची कोट्यवधींची मालमत्ता ईडीने केली जप्त

**नवी दिल्ली, ६ नोव्हेंबर**

एका कथित बेकायदेशीर ऑनलाईन बेटिंग संकेतस्थळाच्या कारवायांशी संबंधित अवैध सावकारी प्रकरणाच्या चौकशीचा भाग म्हणून अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) माजी क्रिकेटपटू सुरेश रैना व शिखर धवन यांची ११.१४ कोटी रुपयांची मालमत्ता जप्त केली आहे, असे अधिकृत सूत्रांनी गुरुवारी सांगितले.

१ नावाच्या ऑनलाईन बेटिंग साईटविरुद्धच्या प्रकरणात धवनची ४.५ कोटी रुपयांची स्थावर मालमत्ता आणि रैनाचा ६.६४ कोटी रुपयांचा म्युच्युअल फंड जप्त करण्याचा तात्पुरता आदेश अवैध सावकारी प्रतिबंधक कायद्यांतर्गत (पीएमएलए) जारी करण्यात आला आहे, असे सूत्रांनी सांगितले. दोन्ही माजी क्रिकेटपटूंनी १ आणि त्याच्या सरोगेट्सच्या जाहिरातीसाठी ‘जाणूनबुजून’ परदेशी संस्थांसोबत एंडोर्समेंट करार केले होते, असे चौकशीत आढळले आहे. या चौकशीचा भाग म्हणून ईडीने युवराज सिंग व रॉबिन उथप्पा यांसारख्या माजी क्रिकेटपटूंशिवाय अभिनेता सोनू सूद, उर्वशी रौतेला, मिमी चक्रवर्ती आणि अंकुश हाजरा यांचीही चौकशी केली आहे.

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक
Bharose ka Bank Bhavishya ka Bank

सोन्यासारखा आधार
टीजेएसबी सुवर्ण कर्जाची साथ



आपल्या आर्थिक गरजा पूर्ण करा
व्याजदर
8.60%*
द.सा. पासून
*अटी व शर्ती लागू
www.tjsb.bank.in | ✆ : 022 - 48897222

# स्वेच्छानिवृत्तीसंदर्भात नवीन मार्गदर्शक तत्त्व

**नवी दिल्ली, ६ नोव्हेंबर**

केंद्र सरकारने शासकीय कर्मचाऱ्यांसाठी स्वेच्छानिवृत्ती (व्हीआरएस) संदर्भात महत्वाची मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. पेन्शन आणि पेन्शनर कल्याण विभागाने नेशनल पेन्शन सिस्टम (एनपीएस) अंतर्गत युनिफाइड पेन्शन स्कीम (यूपीएस) निवडली आहे, अशा कर्मचाऱ्यांसाठी हे मार्गदर्शक निर्देश जारी करण्यात आले आहेत.

नव्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, निवडलेले केंद्रीय कर्मचारी नियम १३ अंतर्गत स्वेच्छानिवृत्तीचा लाभ घेऊ शकतात. या नियमानुसार, जर कोणत्याही कर्मचाऱ्याने २0 वर्षांची नियमित सेवा पूर्ण केली असेल, तर त्याला स्वतःहून सेवामुक्त होण्याचा अधिकार आहे. मात्र, यासाठी कर्मचाऱ्याने आपल्या नियुक्ती प्राधिकरणाला किमान तीन महिने आधी लेखी स्वरूपात निवृत्तीची सूचना देणे अनिवार्य आहे.

म्हणजेच, २0 वर्षांची सेवा पूर्ण झाल्यानंतर स्वेच्छानिवृत्ती घेऊ इच्छिणाऱ्यांना पूर्वसूचना देणे आवश्यक असेल. नव्या प्रणालीअंतर्गत स्वेच्छानिवृत्ती घेणाऱ्या कर्मचाऱ्यांना पेन्शन, ग्रॅच्युइटी, आणि इतर निवृत्तीवेतनाचे लाभ पात्रतेनुसार देण्यात येतील.

# ‘मनसे’शी आघाडी नाही, काँग्रेस ठाम

### मुंबई महानगरपालिका स्वबळावर लढण्याच्या तयारीत

**मुंबई, ६ नोव्हेंबर**

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत मनसेसोबत आघाडी करणार नसल्याच्या भूमिकेवर काँग्रेस ठाम असून, टिळक भवन येथे काँग्रेस नेत्यांच्या बैठकीत मनसेसोबत न जाण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरु आहे. महाराष्ट्र काँग्रेस याबाबत लवकरच दिल्ली हायकमांडला याबाबत कळवणार असल्याचे कळते.

राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला असून, सर्वच राजकीय पक्ष जोरदार तयारीला लागले आहेत. मोठ्याप्रमाणात बैठकांचा सपाटा




लागला आहे. त्या पृष्ठभूमिवर काँग्रेस पक्षाची बैठक झाली. यात मनसे सोबत न जाण्याबाबतची मागणी एकमुखाने करण्यात आली. मुंबई महापालिका निवडणूक स्वबळावर लढल्यास जास्त जागा काँग्रेस लढू शकतो आणि जास्त जागा जिंकू शकतो, असा आशावाद यावेळी व्यक्त करण्यात आला. तर महाविकास आघाडीतील उबाठा आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे शरदचंद्र पवार पक्षासोबत आघाडी करण्यास या बैठकीत अनुकूलता दर्शविण्यात आल्याचे वृत्त आहे.

मनसे प्रमुख राज ठाकरे गेल्या काही दिवसांपासून महाविकास आघाडीसोबत दिसत असून, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी राज ठाकरे महाविकास आघाडीसोबत जाणार असल्याची चर्चा सुरु होती. मात्र, आता काँग्रेसने या निवडणुकांसाठी मनसेसोबत आघाडी करणार नाही, असा पवित्रा घेतला असल्यानं आघाडीत बिघाडी होत की काय असा प्रश्न निर्माण झाला आहे. (तभा वृत्तसेवा)

### शरद पवार गट घेणार स्थानिक पातळीवर निर्णय

दरम्यान, स्थानिक परिस्थिती पाहून युती आघाडी बाबत निर्णय घ्या, अशा सूचना शरद पवार गटाच्या झालेल्या बैठकीत पदाधिकाऱ्यांना देण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. यात अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांच्याशी युती करण्यास हरकत नसल्याचे या बैठकीत स्पष्ट करण्यात आलेचेही सांगण्यात येत आहे. याचा अर्थ राष्ट्रवादी काँग्रेस श. प. गटाला कोणाताही पक्ष अस्पृष्य नाही. शरद पवार गटाची ही भूमिका देखील आघाडीसाठी घातकच मानली जात आहे.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### अस्वल पकडण्यासाठी जपानने सैन्य केले तैनात

**टोकियो** : जपानने अस्वलांना पकडण्यासाठी अनेक भागात स्व-संरक्षण दल तैनात केले, जे विभागाच्या अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की ते पर्वतीय प्रदेशात वाढत्या धोक्याचे कारण आहेत. एप्रिलपासून, देशभरात अस्वलांचे १०० हून अधिक हल्ले झाले आहेत, ज्यामध्ये १२ लोकांचा मृत्यू झाला आहे. बहुतेक मृत्यू अकिता प्रीफेक्चर आणि शेजारच्या इवाते शहरात झाले आहेत. या वर्षी अकितामध्ये अस्वल दिसण्याचे प्रमाण सहा पटीने वाढून ८,००० पेक्षा जास्त झाले आहे. परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाऊ लागल्याने, प्रांतीय राज्यपालांनी लष्कराला पाचारण केले. एसडीएफचे सैन्य काझुनो शहरात पोहोचले, जिथे ते अस्वलाला पकडण्यासाठी स्टीलचे सापळे लावण्यात स्थानिक अधिकाऱ्यांना मदत करत आहेत.

### पॅन आधारशी जोडण्यास ३१ डिसेंबरपर्यंतची मुदत

**नवी दिल्ली** : पॅन कार्ड आधारशी जोडण्यासाठी ३१ डिसेंबर २०२५ पर्यंतची मुदत देण्यात आली आहे. दिलेल्या मुदतीत हे न केल्यास पॅन कार्ड निष्क्रिय केले जाईल. याचा फटका पगार ठेवी किंवा एसआयपीसारख्या गुंतवणुकीमध्येही बसू शकतो. पॅन-आधार जोडण्याची प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीनेही करता येईल. त्यासाठी आयकर विभागाच्या संकेतस्थळावर जावे लागेल.

### कालमेगी वादळाचा कहर, फिलीपाईन्समध्ये आणिबाणी

**मनिला** : कालमेगी वादळामुळे झालेल्या विध्वंसाच्या पृष्ठभूमीवर फिलिपिन्सचे राष्ट्राध्यक्ष फर्डिनांड मार्कोस ज्युनियर यांनी गुरुवारी देशात आणीबाणी जाहीर केली. त्यांनी म्हटले की, वादळामुळे आतापर्यंत २४१ लोकांचा मृत्यू झाला, तर अजूनही १२७ लोक बेपत्ता आहेत. नैसर्गिक आपत्ती देशासाठी मोठे संकट आहे. मार्कोस यांनी निवेदनात म्हटले की, वादळाचा सर्वाधिक तडाखा सेबू प्रांताला बसला आहेत. कालमेगी भागात २० लाख लोक प्रभावित झाले आणि ५६ लाखांहून अधिक लोकांना सुरक्षित स्थळी हलवावे लागले. आपत्ती व्यवस्थापन अधिकाऱ्यांसोबत चर्चा केल्यानंतर देशात आणीबाणी जाहीर करण्याचा निर्णय घेण्यात आला. यामुळे सरकारला आपत्कालीन मदत निधीचे वितरण जलद करता येईल आणि अन्न साठवणूक किंवा किंमती वाढण्यापासून रोखता येईल.

### सैनिकी शाळेत सातवीच्या विद्यार्थ्याची आत्महत्या

**इटानगर** : अरुणाचल प्रदेशातील पूर्व सियांग जिल्ह्यातील निगलोक सैनिकी शाळेतील सातवीच्या विद्यार्थ्याच्या मृत्यूप्रकरणी, पीडितेची बहीण ताडू लुनियाने वरिष्ठांवर रॅगिंगचा आरोप केला आहे. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म इंस्टाग्रामवर व्हिडीओ शेअर करताना त्यांनी सांगितले की, रात्री ११ वाजताच्या सुमारास दहावीचे आठ विद्यार्थी आणि आठवीतील तीन विद्यार्थी ज्युनियर विद्यार्थ्यांच्या वसतिगृहात घुसले. त्यानंतर वरिष्ठांनी सातवीच्या विद्यार्थ्यांना धमकावले आणि तिच्या भावाला जबरदस्तीने दहावीच्या वसतिगृहात नेले. लुनिया म्हणाली की, तिच्या भावाचा रात्रभर मानसिक आणि शारीरिक छळ करण्यात आला. सीसीटीव्ही फुटेजमध्ये तिचा भाऊ सकाळी ५:४५ च्या सुमारास त्याच्या वसतिगृहाबाहेर दिसतो. थोड्याच वेळात तो एका रिकाम्या वर्गात गेला, जिथे त्याची सुसाईड नोट सापडली. त्यात लिहिले होते, वरिष्ठांनी मला खूप त्रास दिला, आता काय करावे हे मला कळत नाही.

### शेअर बाजार

| | |
|---|---|
| सेन्सेक्स | ८३,३११.०१ (-१४८.१४) |
| निफ्टी | २५,५०९.७० (-८७.९५ ) |



### सराफा

| | |
|---|---|
| सोने (स्टॅण्डर्ड/१० ग्रॅम) | रु. १,२१,००० |
| चांदी (प्रतिकिलो) | रु. १,४९,८०० |

### तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| सोलापूर | ३१.८ | २३.0 |
| अमरावती | ३३.२ | १६.७ |
| भंडारा | ३२.० | २१.० |
| बुलडाणा | ३०.६ | १७.५ |
| चंद्रपूर | ३२.० | २१.० |
| गडचिरोली | ३१.४ | २१.६ |
| गोंदिया | ३१.१ | २०.२ |
| नागपूर | ३१.९ | १९.४ |
| वर्धा | ३२.० | १९.२ |
| वाशीम | ३१.० | १९.४ |
| यवतमाळ | ३२.० | १९.६ |

# व्याप्त काश्मीर पुन्हा भडकले

## ‘जनरेशन झेड’चे उग्र आंदोलन, गोळीबार युवकांचा संताप



◆ **मुझफ्फराबाद, ६ नोव्हेंबर**

शिक्षण प्रणालीत सुधारणा करण्याची मागणी आणि महाविद्यालये व विद्यापीठातील फी दरवाढीविरोधात व्याप्त काश्मिरात शहबाज सरकारविरोधात सुरू असलेले ‘जनरेशन झेड’ चे आंदोलन गुरुवारी चिघळले. हजारोच्या संख्येने तरुण रस्त्यावर उतरले आणि त्यांनी शासकीय वाहने, मालमत्तांची तोडफोड आणि जाळपोळ केली. विद्यार्थ्यांच्या एका गटावर करण्यात आलेल्या गोळीबारानंतर विद्यार्थी आक्रमक झाले.

शिक्षण प्रणालीत सुधारणा करण्याच्या मागणीसाठी मागील तीन दिवसांपासून व्याप्त काश्मीरातील विविध शहरांत विद्यार्थ्यांची निदर्शने सुरू आहे. सुरुवातीला ही निदर्शने फी वाढ आणि मूल्यांकन प्रक्रियेच्या विरोधात होती. शांततापूर्ण मोर्चे काढण्यात येत होते. अशातच गुरुवारी एका अज्ञात व्यक्तीने आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या गटावर गोळीबार केला, त्यात तीन विद्यार्थी जखमी झाल्याने परिस्थिती आणखी बिकट झाली. त्यानंतर संतप्त विद्यार्थ्यांनी रस्ते रोखून टायर जाळले आणि शासकीय मालमत्ता, बसेसची तोडफोड जाळपोळ करण्यात आली. ‘जनरेशन झेड’जिंदाबाद आणि पाकिस्तान सरकारविरोधात जोरदार घोषणाजी आंदोलकांनी केली. सध्या व्याप्त काश्मिरात तणापूर्ण परिस्थिती असून पोलिस आणि सुरक्षा दलाचे अतिरिक्त पथक तैनात करण्यात आले. एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, गोळीबार प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीचा शोध सुरू आहे. विद्यार्थ्यांनी महामार्ग रोखले असून लाहोरला जाणारी वाहतूक विस्कळीत झाली, सरकारचे मंत्री आंदोलकांसोबत चर्चा करीत आहे. ◀(वृत्तसंस्था)

### विद्यार्थ्यांच्या मागण्या काय ?

माध्यमिक स्तरावरील विद्यार्थी देखील या आंदोलनात सामील झाले आहेत. त्यांचा मुख्य असंतोष नवीन ई-मार्किंगच्या डिजिटल मूल्यांकन प्रणालीबद्दल आहे. सहा महिन्यांच्या विलंबानंतर ३० ऑक्टोबर रोजी प्रथम वर्षाच्या इंटरमिडिएट परीक्षेचे निकाल जाहीर झाले, परंतु अनेक विद्यार्थ्यांना खूप कमी गुण मिळाल्याने निकालांवरून संताप व्यक्त झाला.

# रा. स्व. संघासंबंधी निर्णयावरील स्थगितीविरुद्धची याचिका फेटाळली

## कर्नाटक सरकारला पुन्हा एकदा झटका

◆ **बंगळुरू, ६ नोव्हेंबर**

रा. स्व. संघाच्या सार्वजनिक ठिकाणांवरील कार्यक्रमांवर प्रतिबंध लादणाऱ्या निर्णयाविरुद्ध कर्नाटक उच्च न्यायालयाच्या एकलपीठाने दिलेल्या स्थगितीच्या विरोधात राज्य सरकारने दाखल केलेली याचिका उच्च न्यायालयाने फेटाळत काँग्रेस सरकारला झटका दिला आहे. कर्नाटक सरकारच्या निर्णयाविरुद्ध दिलेल्या स्थगितीचा आदेश हटवण्यासाठी निर्णय देणाऱ्या एकलपीठात याचिका दाखल करा, असे न्या. एस. जी. पंडित आणि गीता के. बी. यांच्या खंडपीठाने म्हटले आहे.

सार्वजनिक ठिकाणी कोणत्याही खाजगी संस्थेच्या कार्यक्रमांसाठी सरकारची परवानगी घ्यावी लागेल, असा आदेश काही दिवसांपूर्वी कर्नाटक सरकारने दिला होता. या आदेशाचे उल्लंघन करून आयोजित केलेला कोणताही कार्यक्रम किंवा रॅली भारतीय न्याय संहितेच्या अंतर्गत बेकायदेशीर मानली जाईल, असेही यात म्हटले होते. या सरकारी आदेशात रा. स्व. संघाचे थेट नाव घेण्यात आले नव्हते. मात्र, रा. स्व. संघाच्या दक्षिणेतील कार्यक्रम प्रभावित करण्याचा हेतू या आदेशामागे होत.

कर्नाटक उच्च न्यायालयाच्या एकलपीठाने २२ ऑक्टोबर रोजी या सरकारी आदेशाला स्थगिती दिली होती. एकसाथ चालावे, असे लोकांना वाटत असल्यास त्यांना का रोखले जाऊ शकते, असा प्रश्न न्यायालयाने उपस्थित केला होता.

राज्य सरकारने अपील दाखल करण्याऐवजी एकलपीठाच्या न्यायमूर्तीकडून स्पष्टीकरण मागावे, असा सल्ला कर्नाटक उच्च न्यायालयाच्या दोन सदस्यीय खंडपीठाने दिला. हा आदेश अनौपचारिक भेटीगाठी नव्हे तर, रॅली आणि मिरवणुकांसारख्या संघटित कार्यक्रमांसाठी आहे, असा युक्तिवाद ॲडव्होकेट जनरल शशी किरण शेट्टी राज्य सरकारच्या वतीने केला. विरोध आंदोलनांसाठी सरकारने अगोदरच फ्रीडम पार्क आणि क्रीडा आयोजनसाठी कांतीरवा स्टेडियम उपलब्ध केले असल्याचे त्यांनी सांगितले. ◀(वृत्तसंस्था)

### सरकारचे अपील सुनावणीयोग्य नसल्याचा दावा

सरकारचे अपील सुनावणीयोग्य नसल्याचा युक्तिवाद याचिकाकर्ती संघटना पुनश्चेतना सेवा संघ आणि वुई केअर फाऊंडेशनच्या वतीन वरिष्ठ वकील अशोक हरनाहल्ली यांनी केला. या नियमाप्रमाणे क्रिकेट खेळणाऱ्या समूहांनाही रोज परवानगी घ्यावी लागेल, असे त्यांनी सांगितले. दोन्ही बाजूंच्या युक्तिवादानंतर न्यायालयाने या प्रकरणाची सुनावणी १७ नोव्हेंबर रोजी ठेवली.

## एलआयसीला दुसऱ्या तिमाहीत १०,०९८ कोटींचा नफा

**मुंबई** : देशातील सर्वात मोठी विमा कंपनी, भारतीय जीवन विमा महामंडळ (एलआयसी) ने २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या तिमाहीत १०,०९८ कोटींचा नफा नोंदवला आहे, जो मागील वर्षीच्या तुलनेत ३०.६५ टक्के वाढ आहे. गेल्या वर्षी याच तिमाहीत कंपनीला ७,७२९ कोटींचा नफा झाला होता. जुलै-सप्टेंबर तिमाहीत कंपनीने प्रीमियममध्ये १,२६,९३० कोटी जमा केले, जे २०२५ च्या याच कालावधीच्या तुलनेत ५.४९ टक्के जास्त आहे, जेव्हा प्रीमियममध्ये १,२०,३२६ कोटी जमा झाले होते.

# भाजपाचे राज्यातील निवडणूक प्रमुख ठरले

## एकनाथ शिंदेंच्या बालेकिल्ल्यात गणेश नाईक प्रभारी

◆ **मुंबई, ६ नोव्हेंबर**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर भाजापने राज्यातील सर्व जिल्ह्यांतील निवडणूक प्रमुख निवडले आहेत. एकनाथ शिंदे यांचा बालेकिल्ला ठाण्यात मंत्री गणेश नाईक यांची निवडणूक प्रभारी म्हणून नियुक्ती करण्यात आली. ठाणे शहर, ग्रामीण, कल्याण, उल्हासनगर, मीरा भाईंदर, भिवंडी, नवी मुंबई या सर्व ठिकाणी गणेश नाईक निवडणूक प्रभारी असणार आहेत.

बीड जिल्ह्यातही महत्त्वाच्या नियुक्त्या केल्या आहेत. बीड जिल्हा निवडणूक प्रमुखपदी आ. सुरेश धस तर निवडणूक प्रभारी म्हणून मंत्री पंकजा मुंडे यांची नियुक्ती करण्यात आली.

सिंधुदुर्ग जिल्ह्यात नितेश राणे निवडणूक प्रभारी तर, पुणे ग्रामीणमध्ये गणेश बिडकर यांच्यावर निवडणूक प्रमुख म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे. मुंबईत आशिष शेलार हे निवडणूक प्रभारी असणार आहेत. त्याचबरोबर सोलापूर जिल्ह्यात मंत्री जयकुमार गोरे हे प्रभारी असणार आहेत. छत्रपती संभाजीनगरमध्ये मंत्री अतुल सावे हे निवडणूक प्रभारी असणार आहेत. नांदेड जिल्ह्यात खासदार अशोक चव्हाण हे निवडणूक प्रभारी असणार आहेत. त्याचबरोबर कोल्हापूर जिल्ह्यात खासदार धनंजय महाडिक हे निवडणूक प्रभारी असणार आहेत. रायगडमध्ये प्रशांत ठाकूर हे निवडणूक प्रभारी असणार आहेत. नाशिकमध्ये गिरीश महाजन तर जळगावमध्ये संजय सावकारे हे निवडणूक प्रभारी असणार आहेत. अहिल्यानगर जिल्ह्यात मंत्री राधाकृष्ण विखे पाटील हे हे निवडणूक प्रभारी असणार आहेत. पुणे जिल्ह्यात केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ हे निवडणूक प्रभारी असणार आहेत. रत्नागिरीत निरंजन डावखरे हे निवडणूक प्रभारी असणार आहेत, तर साताऱ्यात मंत्री शिवेंद्रराजे भोसले हे निवडणूक प्रभारी असणार आहेत. ◀(वृत्तसंस्था)

### मुंबईत लोकलने चार प्रवाशांना उडवले

**मुंबई** : मुंबईत लोकलच्या धडक्त चार प्रवाशांचा मृत्यू झाल्याचे वृत्त आहे. मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे रेल्वे कर्मचाऱ्यांनी केलेल्या आंदोलनामुळे मध्य रेल्वे मार्गावरील लोकल वाहतूक विस्कळीत झाली असताना, हा अत्यंत दुर्दैवी अपघात घडला. सँडहर्स्ट रोड स्टेशनजवळ रुळांवरून पायी चालणाऱ्या चार प्रवाशांना अंबरनाथ फास्ट लोकलने धडक दिली.

# वाघाच्या हल्ल्यात शेतकरी ठार

## संतप्त गावकऱ्यांनी शंकरपूर-आंबोली मार्ग रोखला

◆ **चिमूर, ६ नोव्हेंबर**

तालुक्यातील शंकरपूर-आंबोली मार्गावरील ठाणारीठ परिसरात असलेल्या शेतात कापूस वेचत असताना वाघाने शेतकऱ्यावर हल्ला करून ठार केले. ही घटना बुधवार, ५ नोव्हेंबर रोजी रात्री ८ वाजताच्या सुमारास उघडकीस आली. ईश्वर भरडे (५२) असे मृतकाचे नाव आहे.



मृतक ईश्वर भरडे

ईश्वर भरडे बुधवारी दुपारी १२ वाजता शेतातील कापूस वेचण्यासाठी गेले होते. सायंकाळ झाल्यानंतरही ते घरी परत आले नसल्याने कुटुंबीयांसह काही नागरिक शेताकडे त्यांना पाहायला गेले. तेव्हा शेताजवळ त्यांची सायकल होती आणि शेतातच त्यांचा मृतदेहही आढळला. त्यांच्या शरीरावर वाघाच्या नखांच्या खोल जखमा होत्या आणि हाताचा एक भाग वाघाने खाल्ला असल्याचे आढळले.

वन विभागाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. रात्री उशिरापर्यंत शंकरपूर-आंबोली मार्गावर ‘रास्ता रोको’ आंदोलन करून वाघाचा बंदोबस्त करण्याची मागणी गावकऱ्यांकडून रेटून धरण्यात आली. गावकऱ्यांनी भरडे यांचा मृतदेह उचलून शंकरपूर-भिसी रस्त्यावरील आंबोली गावाजवळ रस्त्याच्या मधोमध ट्रॅक्टरवर ठेवला. जोपर्यंत वाघाचा बंदोबस्त करण्यात येत नाही तोपर्यंत मृतदेहाची उत्तरीय तपासणी होऊ देणार नाही, अशी भूमिका गावकऱ्यांनी घेतली. यामुळे परिसरात काही काळ तणावाचे वतावरण निर्माण झाले होते.

**मासळ येथे रास्ता रोको**

चिमूर तालुक्यातील नंदरा येथे बुधवारी वाघाने चार बैलांवर हल्ला करून ठार केले. तालुक्यातील ग्रामीण भागात वाघाच्या हल्ल्याचे प्रमाण वाढल्याने भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. वाघाचा लवकरात लवकर बंदोबस्त करण्यात यावा यासाठी आज गुरुवारी मासळ मार्गावरील तुकूम फाटा येथे ग्रामस्थांनी रास्ता रोको आंदोलन केले. आंदोलनात माजी जि. प. सदस्य गजानन बुटके, माजी उपसभापती शांताराम सेलवटकर, मासळचे सरपंच विकास धरणे यांच्यासह गावकरी सहभागी झाले होते. ◀(तभा वृत्तसेवा)



# मनोज जरांगेंच्या हत्येचा कट उघडकीस



## दोन संशयित ताब्यात

◆ **जालना, ६ नोव्हेंबर**

मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांना जीवे मारण्याचा कट रचल्याचा खळबळजनक आरोप बीड येथील एका कार्यकर्त्याकडून करण्यात आला आहे. त्यानेच यासंदर्भात जालना पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

बीडमधूनच हा कट रचला गेल्याची प्राथमिक माहिती समोर आली असून, या प्रकरणात पोलिसांनी दोन संशयित व्यक्तींना ताब्यात घेतले असून त्यांची कसून चौकशी सुरू आहे. या तक्रारीमुळे जालना पोलिसांमध्ये एकच खळबळ उडाली आहे. दरम्यान, या संपूर्ण प्रकरणावर आता मनोज जरांगे पाटील यांची पहिली प्रतिक्रिया समोर आली असून, त्यांच्या या दाव्यामुळे राजकीय चर्चांना उधाण आले आहे.

मनोज जरांगे पाटील म्हणाले, हे सत्य आहे. कट शिजला गेला आहे, हत्या घडवून आणण्याचा किंवा घातपात करण्याचा कट आहे, हे आता उघड होईलच. जालना जिल्ह्याच्या पोलिस अधीक्षकांनी स्वत: या प्रकरणामध्ये लक्ष घातले आहे. त्यामुळे लवकरच या प्रकरणात दूध का दूध आणि पाणी का पाणी होईल. हा कट खूप मोठ्या व्यक्तीने रचला आहे. या सर्व बाबी तपासातून स्पष्ट होतीलच. मी उद्या अकरा वाजता यावर पत्रकारांशी सविस्तर बोलणार आहे, सध्या मी ते सर्व पुरावे पहात असल्याचे जरांगे यांनी म्हटले आहे. ◀(वृत्तसंस्था)

# राज्यातील अंगणवाडी, आशा वर्कर, बांधकाम, घरेलु कामगारांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत पाठपुरावा करू

## खासदार डॉ. मेधाताई कुलकर्णी यांची भारतीय मजदूर संघ प्रदेश महिला अभ्यास वर्गात घोषणा

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि. ६ नोव्हेंबर-**

आंगणवाडी, आशा वर्कर आणि इतर महिला कामगारांच्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत सरकारकडे सातत्याने पाठपुरावा करून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी भारतीय मजदूर संघ ठाम प्रयत्न करेल, असे प्रतिपादन खासदार डॉ. मेधाताई कुलकर्णी यांनी केले.



भारतीय मजदूर संघाच्या ७०व्या वर्धापन दिनानिमित्त महाराष्ट्र प्रदेश महिला अभ्यासवर्गाच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. सौदामिनी सभागृह, मंगळवार पेठ, पुणे येथे आयोजित करण्यात आला आहे. खासदार डॉ. कुलकर्णी म्हणाल्या. अभ्यासवर्गात विविध शासकीय योजना, कामगारांना मिळणारे अल्प वेतन, सामाजिक सुरक्षा, तसेच कार्यपद्धतीतील तृटी या विषयांवर सखोल चर्चा झाली. महिला आरोग्य विषयावर बोलताना डॉ. मुक्ता उमरजी (एम. डी. गायनॅकॉलॉजिस्ट) म्हणाल्या, ‘‘महिला कार्यकर्त्यांनी स्वतःच्या आरोग्याला प्राधान्य दिल्यास सशक्त कुटुंब आणि सुदृढ समाज निर्माण होईल.’’

या अभ्यासवर्गाचा उद्देश म्हणजे संघटनेतील महिला कार्यकर्त्यांना संघटनात्मक, सामाजिक आणि कामगार क्षेत्रातील विषयांवर प्रशिक्षण देणे हा आहे. व्यक्तिमत्त्व विकास, असंघटित क्षेत्रातील महिला कामगारांसाठीच्या कल्याणकारी योजना, कामगार क्षेत्रातील नव्या आव्हाने आणि उपाययोजना यावर तज्ञांनी मार्गदर्शन केले.

चिंतन सत्रात श्री.राहुल पुंडे यांनी पंचपरिवर्तन या विषयात मार्गदर्शन केले, नोकरी करणाऱ्या महिलांनी कुटुंब, नोकरी , व सामाजिक संघठन यांच्या नियोजन करून सामाजिक काम करावे, असे मनोगत संध्या देशपांडे, सहभागी महिलांना प्रशस्ती पत्र देऊन समारोप भारतीय मजदूर संघ महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष अँड अनिल ढुमणे यांनी केले. भारतीय मजदूर संघ महाराष्ट कार्यक्रमाचे प्रदेशाध्यक्ष अध्यक्ष अँड. अनिल ढुमणे होते.

कार्यक्रमास राष्ट्रीय उपाध्यक्षा, नीता चोबे, शिल्पा देशपांडे, बाळासाहेब भुजबळ, अर्जुन चव्हाण, तसेच विविध जिल्ह्यांतील महिला कार्यकर्त्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. या अभ्यासवर्गाचे आयोजन आणि समन्वय वंदना कामठे, शर्मिलाताई पाटील, तृप्ती आळती, संजना वाडकर, वनिता सावंत, मनिषा ढुमणे, सुभाष सावजी , सुरेश जाधव, धनंजय इनामदार, बेबीराणी डे, रोहिणी पाटसकर व कामगार महासंघाचे पुण्यातील पदाधिकाऱ्यांनी केले असून त्यांच्या प्रयत्नांमुळे कार्यक्रम अत्यंत यशस्वीरीत्या पार पडला.

# गंभीर गुन्हे दाखल असलेले नेते रिंगणात






**श्यामकांत जहागीरदार**

◆ **नवी दिल्ली, ६ नोव्हेंबर**

बिहार विधानसभा निवडणुकीचा पहिला टप्पा आटोपला असून दुसऱ्या टप्प्यातील मतदान ११ नोव्हेंबरला होत आहे. बिहार विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात गंभीर गुन्ह्यांचे आरोप असलेले अनेक उमेदवार उतरले आहेत.

बिहार विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात १२२ मतदारसंघात १३०३ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहे, यातील १२९७ उमेदवारांच्या प्रतिज्ञापत्रातून मिळालेल्या माहितीनुसार दुसऱ्या टप्प्यातील ३२ टक्के उमेदवारांवर विविध प्रकारचे, तर २६ टक्के उमेदवारांवर गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत. १९३ उमेदवारांवर खुनाचे तर ७९ उमेदवारांवर खुनाच्या प्रयत्नांचे आरोप आहेत. ५२ टक्के उमेदवारांवर महिलांसंदर्भातील अत्याचाराचे तर ३ उमेदवारांवर बलात्काराचे गुन्हे दाखल आहेत.

प्रशांतकिशोर यांच्या जनसुराज पक्षाच्या ११५ पैकी ५१, बसपाच्या ९१ पैकी १२, राजदच्या ७० पैकी २७, भाजपाच्या ५३ पैकी २२, जदयुच्या ४४ पैकी ११, आपच्या ३९ पैकी १२, लोजपाच्या १५ पैकी ९, भाकपा मालेच्या ६ पैकी ४ तर भाकपाच्या ४ पैकी २ उमेदवारांवर गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत. विशेष म्हणजे निवडणुकीचा अर्ज दाखल करतांना सोबत जोडलेल्या प्रतिज्ञापत्रातून उमेदवारांनीच आपल्यावरील गुन्ह्यांचा तपशील सादर केल्यामुळे यावर अविश्वास ठेवण्याचा प्रश्नच उदभवत नाही.

असोसिएशन फॉर डेमोक्रेटिक रिफॉर्म्स आणि बिहार इलेक्शन वॉच या संघटनांच्या अहवालातून ही माहिती देण्यात आली आहे.बिहारची जी प्रतिमा देशभर निर्माण झाली, त्यात सुधारणा होण्याची गरज आहे.

न्यायालयातून राजकीय पक्षांच्या या गुन्हेगारीवृत्तीच्या उमेदवारांना अद्याप शिक्षा झाली नसली तरी जनतेच्या न्यायालयात म्हणजे निवडणुकीच्या रिंगणात मतदार या उमेदवारांचा निकाल कसा लावतात, ते मतमोजणीनंतरच समजणार आहे.

**पहिल्या टप्प्यातील ४२३ उमेदवारांवर विविध गुन्हे**

पहिल्या टप्प्यातील १२१ मतदारसंघात १३०३ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होते, यातील ४२३ म्हणजे ३२ टक्के उमेदवारांवर विविध स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत. यातील २७ टक्के म्हणजे ३५४ उमेदवारांवर गंभीर स्वरुपाचे वेगवेगळे गुन्हे दाखल आहेत. यातील ३३ उमेदवारांवर खुनाचे, ८६ उमेदवारांवर खुनाच्या प्रयत्नांचे तर ४२ उमेदवारांवर महिलांसंदर्भातील गुन्ह्यांचे आरोप आहेत. दोन उमेदवारांवर तर बलात्कारांचेही गुन्हे दाखल आहेत.

### छत्तीसगडमध्ये जहाल महिला माओवाद्याची शरणागती

◆ **रायपूर, ६ नोव्हेंबर**

छत्तीसगडमधील खैरागड-छुईखदान-गंडाई (केसीजी) जिल्ह्यातील पोलिसांसमोर गुरुवारी एका जहाल महिला माओवाद्याने शरणागती पत्करली. तिच्या शिरावर १७ लाख रुपयांचे बक्षीस होते, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

कमला सोडी असे तिचे नाव आहे आणि ती माड विभाग तसेच माओवाद्यांच्या मध्यप्रदेश-महाराष्ट्र-छत्तीसगड (एमएमसी) क्षेत्रात सक्रिय होती, असे केसीजीचे पोलिस अधीक्षक लक्ष्य शर्मा यांनी सांगितले. राज्य सरकारच्या नवीन शरणागती आणि पुनर्वसन धोरणाने प्रभावित होऊन तिने आत्मसमर्पण केले, असे त्यांनी सांगितले. केसीजी मध्यप्रदेश सीमेवर असून, छत्तीसगडची राजधानी रायपूरपासून ९० किमी अंतरावर आहे. कमला सोडी मागील १४ वर्षांपासून माओवादी चळवळीत होती. ती संघटनात्मक कार्ये आणि हिंसाचारात गुंतली होती. यात नक्षलभरती, प्रचार आणि सुरक्षा दलावर हल्ल्यांचा कट आखण्यासारख्या कारवायांचा समावेश होता, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. ◀(वृत्तसंस्था)

# मध्य प्रदेश सरकारने फेटाळली शहाबानोच्या मुलीची याचिका

## हक चित्रपट प्रदर्शन थांबवण्याची केली होणी मागणी

◆ **इंदूर, ६ नोव्हेंबर**

मध्य प्रदेश उच्च न्यायालयाने शहा बानो बेगम यांच्या मुलीने दाखल केलेली याचिका फेटाळून लावली आहे. त्यांनी हक या हिंदी चित्रपटाच्या प्रदर्शनाला स्थगिती देण्याची मागणी केली होती. या मागणीत कोणतेही तथ्य नाही, असे म्हणत उच्च न्यायालयाने त्यांची मागणी फेटाळून लावली आहे.



उच्च न्यायालयाच्या इंदूर खंडपीठाने ४ नोव्हेंबर रोजी दिलेल्या या आदेशामुळे आणि त्याची प्रत गुरुवारी देण्यात आल्याने ७ नोव्हेंबर रोजी चित्रपटाच्या प्रदर्शनाचा मार्ग मोकळा झाला. यामी गौतम धर आणि इमरान हाश्मी यांची मुख्य भूमिका असलेला हक हा चित्रपट शाह बानो बेगम यांच्या जीवनावर आणि कायदेशीर संघर्षावर आधारित असल्याचे म्हटले जाते. १९८५ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने घटस्फोटित मुस्लिम महिलांना पोटगीचा अधिकार देण्यासाठी केलेल्या ऐतिहासिक खटल्यामुळे बानो यांचे निधन झाले.

इंदूर येथील रहिवासी बानो यांचे १९९२ मध्ये निधन झाले. त्यांची मुलगी सिद्दीका बेगम खान हिने उच्च न्यायालयात धाव घेतली होती. हा चित्रपट कुटुंबाच्या संमतीशिवाय बनवण्यात आला आहे आणि तिच्या दिवंगत आईच्या आयुष्यातील वैयक्तिक पैलू चुकीचे सादर करण्यात आले असल्याचा दावा त्यांनी केला होता.

परिणामी, याचिका कोणत्याही गुणवत्तेपासून वंचित असल्याचे आढळून आले आहे आणि त्यामुळे ती फेटाळण्यात येत आहे, असे इंदूर खंडपीठाचे न्यायमूर्ती प्रणय वर्मा यांनी आदेशात म्हटले आहे. ◀(वृत्तसंस्था)

# बांगलादेशात भडकला हिंसाचार

## निवडणूक प्रचाराच्या सुरुवातीला अनेक ठिकाणी हल्ले, जाळपोळ

**ढाका, ६ नोव्हेंबर**

बांगलादेशमध्ये फेब्रुवारी २०२६ मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी आतापासूनच विविध पक्षाकडून प्रचारमोहीम सुरू झाली आहे. अशातच देशातील अनेक भागात हिंसाचार उसळला आहे. चितगावमध्ये विरोधी बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टी अर्थात् बीएनपीचे उमेदवार इरशाद उल्लाह यांच्यावर गोळीबार करण्यात आला. समाजकंटकांनी शासकीय बस आणि मालमत्तांची जाळपोळ केली. हिंसाचारांच्या घटनांत २५ पेक्षा अधिक नागरिक जखमी झाले.

बांगलादेशात सध्या मोहम्मद युनूस यांच्या नेतृत्वात अंतरिम सरकार सत्तेत आहे आणि फेब्रुवारी २०२६ मध्ये सार्वत्रिक निवडणुका होणार आहेत. तथापि, निवडणूक प्रचारादरम्यान देशात हिंसाचार उफाळला असून परिस्थिती तणावपूर्ण आहे. चितगावमधील घटनेनंतर कुमिल्ला जिल्ह्यात, बीएनपी पक्षाच्या अनेक नेत्यांच्या घरांना आगी लावण्यात आल्या. याशिवाय रस्त्यावर उतरून कट्टरपंथीयांनी जाळपोळ केली. चितगाव पोलिसांना गुन्हेगारांना लवकरात लवकर पकडण्यासाठी कठोर



कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले. बांगलादेशच्या सामाजिक आणि राजकीय संस्कृतीत कोणत्याही स्वरूपात हिंसाचार आणि धमकीचे राजकारण अस्वीकार्य आहे. सरकारने सर्व राजकीय पक्षांना आणि त्यांच्या समर्थकांना शांतता राखण्याचे आणि शांततापूर्ण निवडणूक प्रक्रिया सुनिश्चित करण्याचे आवाहन केले.

(वृत्तसंस्था)

### वातावरण बिघडविण्यात परदेशी शक्तींचा हात

बीएनपीचे नेते अन्वरुल हक म्हणाले, विद्यापीठ विद्यार्थी संघटना निवडणुकांमध्ये जमात-समर्थित विद्यार्थी संघटनांच्या अलिकडच्या विजयामुळे देशात अस्थिरता वाढली आहे. जमात-ए-इस्लामी आणि काही सरकारचे सल्लागार मोहम्मह युनूस देशातील वातावरण बिघडवण्यासाठी एकत्र काम करत आहेत. काही परदेशी शक्तींचाही यात सहभाग आहे. देशातील लोक निश्चितच धार्मिक आहेत, परंतु ते अतिरेकीपणाच्या विरोधात आहेत.



### जमात-ए-इस्लामीवर कारवाई करण्याची मागणी

सरकारने निवेदनात म्हटले की, सरकार फेब्रुवारीतील सार्वत्रिक निवडणुका मुक्त, निष्पक्षपणे घेण्याची तयारी करीत आहे. या काळात कोणत्याही पद्धतीचा हिंसाचार खपवून घेतला जाणार नाही. हिंसाचार घडवून निवडणुका लांबणीवर टाकण्याचा कोणताही डाव यशस्वी होवू देणार नाही. दरम्यान बीएनपीने जमात-ए-इस्लामीवर निवडणुकीचे वातावरण बिघडवल्याचा आरोप केला आणि हिंसाचारांच्या घटनांसाठी जमात ए इस्लामीला जबाबदार धरले आहे.

# राजदच्या जंगलराजमध्ये शून्य विकास

**प्रचारसभेतून मोदींचा हल्लाबोल** | **सरकार चालवण्याच्या नावाखाली झाली लूटमार**



**अररिया, ६ नोव्हेंबर**

१९९० ते २००५ या १५ वर्षांच्या काळात जंगल राज सरकारने बिहार पूर्णपणे उद्ध्वस्त केला. सरकार चालवण्याच्या नावाखाली केवळ लूटमार झाली. त्यांनी सत्तेवर असताना एकही एक्सप्रेसवे बांधला नाही, कोसी नदीवर पूल बांधला नाही, क्रीडा संकुले, वैद्यकीय महाविद्यालये, आयआयटी, आयआयएम यापैकी काहीही बांधलेले नाही, हे जंगलराजचे सत्य आहे असा हल्लाबोल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी प्रचारसभेतून राजदवर केला.

बिहारच्या अररिया येथील एका जाहीर सभेला संबोधित करताना पंतप्रधान मोदी म्हणाले, जंगल राज चालवणारे स्वतःला तुमचे पालक मानत होते. पण मोदी वेगळे आहेत. माझे पालक हे लोक आहेत. तुम्ही माझे स्वामी आहात, तुम्ही माझे रिमोट कंट्रोल आहात, आमच्यासाठी जनता हीच सर्वोच्च आहे. आज बिहारला विकसित राज्य बनवण्यासाठी मतदानाचा पहिला टप्पा होत आहे. बिहारच्या कानाकोपऱ्यातून समाज माध्यमावर मतदान केल्याचे छायाचित्र पोस्ट केले जात आहे. बिहारमधील मतदानासाठी तरुणांमध्येही अभूतपूर्व उत्साह आहे. मी सर्व मतदारांचे अभिनंदन मानतो आणि सर्वांना बाहेर पडून मतदान करण्याचे आवाहन करतो. आज, बिहारमध्ये एकच आवाज घुमत आहे: पुन्हा एकदा, एनडीए सरकार, पुन्हा एकदा, सुशासनाचे सरकार. या भावनेमागे माता आणि बहिणींच्या आशा आणि तरुणांची स्वप्ने आहेत. तरुणांनो, लक्षात ठेवा की तुमचे स्वप्न मोदींचा संकल्प आहे.

(वृत्तसंस्था)

# अनैतिक शब्दांचा वापर करणाऱ्या संकेतस्थळांवर बंदी घालण्याची तयारी सुरू

**नवी दिल्ली, ६ नोव्हेंबर**

सरकारने अनेक वेळा पोर्नोग्राफिक संकेतस्थळांवर बंदी घालण्याचा प्रयत्न केला आहे, परंतु त्यात यश आले नाही. या दरम्यान, केंद्र सरकार आता अनैतिक संबंधांशी संबंधित शब्दांचा वापर करणाऱ्या सामग्रीवर बंदी घालणारी सामग्री बंदी लागू करण्याची तयारी करत आहे. अशा संज्ञा आणि संबंधित सामग्रीवर बंदी घालण्यासाठी सरकार लवकरच इंटरनेट सेवा प्रदात्यांसाठी मार्गदर्शक तत्त्वे जारी करण्याचे उद्दिष्ट ठेवते.

आयटी मंत्रालयाच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, बाल पोर्नोग्राफी व्यतिरिक्त, इंटरनेटवर उपलब्ध असलेल्या इतर अनेक पोर्नोग्राफिक सामग्रीची विस्तृत श्रेणी आहे जी आंतरराष्ट्रीय स्तरावर बेकायदेशीर नाही. अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की भारतात या प्रकारच्या सामग्रीवर पूर्णपणे बंदी घालणे कठीण आहे.

आयटी मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की सरकार वेळोवेळी आवश्यकतेनुसार अशा सामग्रीवर बंदी घालते. तथापि, तंत्रज्ञान आणि इंटरनेटचे आंतरराष्ट्रीय स्वरूप पाहता, अशा सुमारे ४० दशलक्ष वेबसाइट्सवर बंदी घालणे सोपे काम नाही.

**सरकार लवकरच मार्गदर्शक तत्वे जारी करणार**

या प्रकरणाशी परिचित असलेल्या अधिकाऱ्याच्या मते, या प्रकारच्या कंटेंटवर पूर्णपणे बंदी घालण्यासाठी सरकार आयएसपी, इंडियन कॉम्प्युटर इमर्जन्सी रिस्पॉन्स टीम आणि आंतरराष्ट्रीय संस्थांशी सतत चर्चा करत आहे.

भारतीय समाजात निषिद्ध मानल्या जाणाऱ्या लैंगिक संबंधांसाठी वापरल्या जाणाऱ्या संज्ञा असलेल्या कंटेंटवर बंदी घालण्यासाठी लवकरच मार्गदर्शक तत्वे जारी केली जाण्याची शक्यता आहे हे लक्षात घेण्यासारखे आहे. असे अनेक शब्द आधीच ब्लॉक केले गेले आहेत आणि त्यानंतर दर्शक संख्या कमी झाली आहे. याची भरपाई करण्यासाठी, कंटेंट निर्माते नावे बदलून कंटेंट तयार करत आहेत. अशा कंटेंटला ब्लॉक करण्यासाठी देखील प्रयत्न केले जातील.

(वृत्तसंस्था)

# वलसाडमध्ये २२ कोटींचे अमली पदार्थ जप्त

**अहमदाबाद, ६ नोव्हेंबर**

महसूल गुप्तचर संचालनालय अर्थात् डीआरआयने गुजरातमधील वलसाड जिल्ह्यातील एका कारखान्यावर छापा टाकत २२ कोटींचे अल्प्राझोलम नावाचे अमली पदार्थ जप्त केले. या कारवाईत चार जणांना अटक करण्यात आली.

जप्त केलेले अमली पदार्थ तेलंगणात पाठविण्याची योजना होती, मात्र तत्पूर्वीच कारवाई करण्यात आली. डीआरआयच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, गोपनीय माहिती मिळाल्यानंतर आमच्या पथकाने कारखान्यावर लक्ष ठेवले. कारखान्यात अमली पदार्थ असल्याचे निदर्शनात आल्यानंतर छापा टाकण्यात आला आणि बेकायदेशीर औषध उत्पादन युनिटचा भंडाफोड झाला. रिॲक्टर, सेंट्रीफ्यूज, रेफ्रिजरेशन युनिट आणि हीटिंग मेंटल अशी उत्पादन उपकरणे यावेळी जप्त करण्यात आली. छाप्यात ९.५५ किलो अल्प्राझोलम आणि ४३१ किलो कच्चा माल आणि रसायने जप्त करण्यात आली. अटक केलेल्या चौघांमध्ये दोन मुख्य आरोपी, एक कर्मचारी आणि तेलंगणाहून औषधी खरेदी करण्यासाठी आलेल्या एका ग्राहकाचा समावेश आहे.

(वृत्तसंस्था)

# केरळमध्ये उभारणार देशातील पहिले न्यायालयीन शहर

## ६१ न्यायालये, न्यायाधीशांचे बंगले

**कोची, ६ नोव्हेंबर**

केरळमधील कोची येथे देशातील पहिले न्यायालयीन शहर बांधले जाणार आहे. कोची जिल्ह्यातील कलामसेरी येथे २७ एकर जागेवर हे न्यायालयीन शहर बांधले जाईल, ज्याचा अंदाजे खर्च १००० कोटी रुपये असेल आणि ते १० वर्षांत आकार घेईल.



हे न्यायालयीन शहर एकाच शहरात रहिवाशांना व्यापक न्यायालयीन सेवा आणि सुविधा प्रदान करेल. त्यात सर्व प्रकारच्या न्यायालयीन सेवा आणि प्रणाली असतील. केरळच्या सर्व संस्था आणि न्यायाधिकरण न्यायालये येथे असतील.

**एआय-सज्ज न्यायालय**

राज्याचे कायदा मंत्री पी. राजीव यांनी सांगितले की, १७ एकरच्या या विस्तीर्ण संकुलात १.२ दशलक्ष चौरस फूट उच्च न्यायालय संकुल असेल. शिवाय, हे न्यायालयीन शहर उपग्रह इंटरनेट-सक्षम न्यायालये, एआय-सक्षम न्यायालये, न्यायिक अकादमी आणि जलद खटल्यांचे निराकरण यासारख्या सुविधा प्रदान करेल.

केरळमधील कोची जिल्ह्यात बांधण्यात येणाऱ्या या न्यायिक शहराच्या प्रकल्पासाठी १,००० कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च येईल. १० वर्षांनंतर, या न्यायिक शहराचा आकार आणि सुविधा सर्वोच्च न्यायालयाच्या तुलनेत जास्त करण्याची योजना आहे. पूर्ण झाल्यानंतर, एर्नाकुलम येथे असलेले केरळ उच्च न्यायालय देखील न्यायिक शहरात स्थलांतरित केले जाईल.

**तीन टॉवर्स**

केरळमध्ये बांधण्यात येणाऱ्या या न्यायिक शहरात कलम १४, १९ आणि २१ वर आधारित तीन टॉवर्स असतील, जे संविधानाच्या मुख्य तत्त्वांनुसार समानता, स्वातंत्र्य आणि जीवनाच्या मूलभूत अधिकारांची हमी देतात. मुख्य टॉवर ७ मजली उंच असेल आणि इतर दोन टॉवर प्रत्येकी ६ मजली उंच असतील.

**६१ न्यायालये**

या न्यायिक शहरात ६१ न्यायालये असतील. याशिवाय, न्यायाधीशांचे बंगले, कायदा संस्था-महाविद्यालये, प्रशासकीय शाखा, चेंबर्स, मध्यस्थी केंद्र, भरती कक्ष, माहिती केंद्र, सभागृह, सर्व एकाच ठिकाणी असतील. त्याची रचना आता तयार केली जात आहे.

(वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### माधुरी दीक्षितच्या कॅनडा दौऱ्यावरून वाद



**नवी दिल्ली :** माधुरी दीक्षितचा कॅनडा दौरा वादाने वेढला गेला आहे. अभिनेत्रीने २ नोव्हेंबर रोजी कॅनडामध्ये कार्यक्रम सादर केला. तथापि, ती ७:३० वाजता होणाऱ्या कार्यक्रमासाठी १० वाजता पोहोचली, ज्यामुळे चाहते संतप्त झाले. शोच्या आयोजकांनी एक निवेदन जारी करून वादासाठी माधुरीला जबाबदार धरले आणि म्हटले की तिच्या टीमने तिला चुकीची माहिती दिली, ज्यामुळे ती उशिरा पोहोचली. आता, माधुरी दीक्षितच्या टीमने तिच्या कराराची एक प्रत जारी केली आहे, ज्यामध्ये स्पष्टपणे लिहिले आहे की माधुरीला फक्त ६० मिनिटे म्हणजेच १ तास स्टेजवर राहायचे होते, ज्यामध्ये चाहत्यांसोबत प्रश्नोत्तर सत्र देखील समाविष्ट होते. ही संपूर्ण घटना व्यवस्थापनाच्या चुकीमुळे घडली. माधुरीकडून कोणताही विलंब किंवा निष्काळजीपणा झाला नाही. ती दिलेल्या वेळेवरच आली, असे आता आयोजकांनी म्हटले आहे.

### ऐश्वर्या घेणार घटस्फोट



**मुंबई :** मनोरंजन जगतातील अनेक जोड्यांच्या घटस्फोटांच्या बातम्या सातत्याने येत आहेत. त्यात आता छोट्या पडद्यावरील अभिनेत्री ऐश्वर्या शर्मा हिची देखील भर पडली आहे. ऐश्वर्या आणि तिचा नवरा नील भट्ट यांनी लग्नाच्या अवघ्या चार वर्षातच घटस्फोटाचा निर्णय घेतला आहे. तसा अधिकृतपणे अर्जही दाखल केल्याचे समजते. हे दोघे 'गुम है किसी के प्यार में' या मालिकेच्या सेटवर भेटले होते. मालिकेदरम्यानच त्यांनी लग्न केले. रिॲलिटी शोमध्ये या जोडप्याला बरेच प्रेम मिळाले. मात्र, गेल्या काही महिन्यांपासून त्यांच्यात दुरावा निर्माण झाल्याची चर्चा होती आणि ते वेगळे राहत होते. मध्यंतरी नील एका वेगळ्याच तरुणीसोबत फिरताना दिसला तर ऐश्वर्याने एकटीनेच दिवाळी साजरी केली. या सर्व फोटो, व्हिडीओवरून दोघांमध्ये फाटल्याचे स्पष्ट झाले.

### पुष्करला मिळाला यूएईचा गोल्डन व्हिसा



**मुंबई :** दुबई हे अनेक भारतीय कलाकारांसाठी आवडीचे ठिकाण आहे. केवळ सुट्ट्या घालवण्यासाठी नव्हे तर व्यावसायिक कारणांसाठी आणि कायम वास्तव्यासाठी अनेक कलाकार तेथे स्थानांतरीत होत आहेत. आता मराठी अभिनेता पुष्कर जोग याला यूएईचा गोल्डन व्हिसा मिळाला आहे. त्याने फेसबुकवर पोस्ट शेअर करत याबद्दल माहिती दिली आहे. मुलीच्या चांगल्या भविष्यासाठी आणि तिच्या कल्याणासाठी यूएईचा गोल्डन व्हिसा मिळवल्याचे त्याने सांगितले. केवळ पुष्करच नाही तर अनेक कलाकारांनी दुबईला आपले दुसरे घर बनवले आहे. दाक्षिणात्य सुपरस्टार अजित कुमार, आर. माधवन, संजय दत्त, मौनी रॉय, विवेक ओबेरॉय यांनीही दुबईत घर घेतले आहे.

# भारतीय निवडणुका हा जागतिक चर्चेचा विषय

## आफ्रिकेतील खासदार भेटीवर येण्यास इच्छूक

**नवी दिल्ली, ६ नोव्हेंबर**

भारतीय निवडणूक आयोग सध्या बिहार विधानसभा निवडणुका घेण्यात व्यस्त आहे. मतदानाच्या बाबतीत ही एक मोठी निवडणूक आहे, ज्यामध्ये एकूण ७५ दशलक्ष मतदार सहभागी झाले आहेत. भारतीय निवडणूक आयोगाच्या यशस्वी आणि सुरळीत कामकाजाला जगभरात मान्यता मिळत आहे. निवडणूक जवळून पाहण्यासाठी भारताला भेट देण्याची इच्छा दक्षिण आफ्रिकेच्या खासदारांनी व्यक्त केली आहे.



निवडणूक आयोगाच्या प्रवक्त्याने या घटनेचे स्पष्टीकरण देताना सांगितले की, मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना दक्षिण आफ्रिकेतून फोन आला होता. हा फोन दक्षिण आफ्रिकेच्या निवडणूक आयोगाचे अध्यक्ष मोसोथो मोएप्पा यांचा होता. त्यांनी बिहार निवडणुकीसाठी मुख्य निवडणूक आयुक्तांना शुभेच्छा दिल्या आणि दक्षिण आफ्रिकेच्या खासदारांनी भारताला भेट देण्याची इच्छा व्यक्त केली.

प्रवक्त्यांच्या मते, मोएप्पा म्हणाले की, काही खासदार जगातील सर्वात पारदर्शक आणि कार्यक्षम निवडणूक प्रक्रियेचे बारकाईने निरीक्षण करण्यासाठी आणि त्याबद्दल जाणून घेण्यासाठी लवकरच भारताला भेट देऊ इच्छितात.

जगातील सर्वात मोठी लोकशाही सध्या एका मोठ्या राज्यातील विधानसभा निवडणुकांवर लक्ष ठेवून आहे. त्यामुळे, संपूर्ण जगाचे लक्ष आहे. ६ नोव्हेंबर रोजी, बिहार विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील मतदान पार पडले. यासाठी निवडणूक आयोगाचे अनेक अधिकारी हजर होते. पहिल्यांदाच, बिहारमधील सर्व मतदान केंद्रांवर सीसीटीव्हीद्वारे देखरेख ठेवली जात आहे. अधिकाऱ्यांच्या मते, मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार, निवडणूक आयुक्त एसएस संधू आणि विवेक जोशी संपूर्ण निवडणुकीचे निरीक्षण करत आहेत.

(वृत्तसंस्था)

# स्वातंत्र्याचे प्रेरणागीत 'वंदे मातरम्'



भारताच्या स्वातंत्र्यलढ्याचे प्रतिध्वनी करणारे एक असे गाणे आहे जे केवळ देशभक्तीची भावना जागृत करत नाही तर मातृभूमीला देवी म्हणून पूजण्याच्या परंपरेला देखील जिवंत करते. बंगाली कादंबरीतून ते संपूर्ण राष्ट्राचा आवाज बनले आणि ते ब्रिटिश राजवटीचा पाया हादरवणाऱ्या स्वातंत्र्य चळवळीचे प्रतीक झाले. चला इतिहासाची पाने उलटून पाहूया जिथे राष्ट्रवादाची ज्योत पहिल्यांदा प्रज्वलित झाली होती.

**उत्पत्ती: बंकिमचंद्रांच्या लेखणीतून जन्म**

'वंदे मातरम्'ची मुळे १९ व्या शतकातील बंगालमध्ये आहेत, जेव्हा भारत ब्रिटिश वसाहतवादी राजवटीने जळून खाक झाला होता. या गाण्याचे लेखक बंकिमचंद्र चट्टोपाध्याय होते, ज्यांना बंगाली साहित्याचे जनक म्हणून ओळखले जाते. बंकिमचंद्र एक प्रशासकीय अधिकारी होते, परंतु त्यांची कामे राष्ट्रवादाच्या प्रखरतेने भरलेली होती. हे गाणे ७ नोव्हेंबर १८७५ रोजी घरी बसलेले असताना रचले गेले. काही इतिहासकारांच्या मते, हे गाणे अचानक प्रेरणेने लिहिले गेले.



बंकिम यांनी ते संस्कृत आणि बंगाली भाषेच्या मिश्रणात रचले आहे, जिथे संस्कृत श्लोक मातृभूमीचे गौरव करतात आणि बंगाली भाग भावनिक खोली प्रदान करतो. गाण्याच्या पहिल्या ओळी आहेत:

**वंदे मातरम्**
**सुजलाम् सुफलाम् मलयाजशिताम्**
**शस्यशालाम् मातरम्**

हे गाणे प्रथम त्यांच्या प्रसिद्ध कादंबरी आनंदमठमध्ये प्रकाशित झाले, जे १८८२ मध्ये पूर्ण झाले आणि बंगाली मासिक बंगदर्शनमध्ये मालिकाबद्ध झाले. ही कादंबरी १८ व्या शतकातील संन्यासी बंडात घडली, जिथे भुकेल्या भिक्षूंनी ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीविरुद्ध बंड केले. 'वंदे मातरम्' हे कादंबरीतील भिक्षूंचे युद्धगीत आहे, ज्यामध्ये मातृभूमीला देवी दुर्गा म्हणून चित्रीत केले आहे. बंकिमचंद्रांनी त्यांच्या पुतण्याला हे गाणे रचण्यास प्रेरित केले, परंतु मूळ संगीत नंतर जादवपूर विद्यापीठातील संगीतकारांनी विकसित केले. या गाण्याचा उद्देश स्पष्ट होता: भारतीयांमध्ये मातृभूमीवरील प्रेम आणि परकीय राजवटीविरुद्ध संघर्षाची भावना जागृत करणे.

### राष्ट्रीय गीताची स्थिती: १९५० ची ऐतिहासिक घोषणा

स्वातंत्र्यानंतर 'वंदे मातरम्' ला राष्ट्रीय मान्यता मिळाली. २४ जानेवारी १९५० रोजी भारताच्या संविधान सभेने ते राष्ट्रगीत घोषित केले. डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या अध्यक्षतेखाली हा निर्णय घेण्यात आला. त्याच दिवशी 'जन गण मन्'ला राष्ट्रगीत करण्यात आले. कादंबरीच्या फक्त पहिल्या दोन कडव्यांना राष्ट्रगीत म्हणून स्वीकारण्यात आले. कारण संपूर्ण गाण्याला मुस्लिम लीगचा आक्षेप होता. जवाहरलाल नेहरू आणि मौलाना अबुल कलाम आझाद यांनी तडजोड केली. आज, सरकारी कार्यक्रमांमध्ये पहिले दोन कडवे गायले जातात. 'वंदे मातरम्' वादापासून वाचलेले नाही. २००६ मध्ये शताब्दी समारंभात काही मुस्लिम संघटनांनी धार्मिक कारणास्तव निषेध केला, परंतु सर्वोच्च न्यायालयाने ते देशभक्तीचे प्रतीक म्हणून ओळखले. या गाण्याचा वारसा चित्रपट, शाळा आणि क्रीडा स्पर्धांमध्ये जिवंत आहे.

### स्वातंत्र्य चळवळीतील भूमिका: ब्रिटिशांना अस्वस्थ करणारा नारा

वंदे मातरम हे केवळ एक गाणे नव्हते; ते स्वातंत्र्यलढ्याचे युद्धघोषक बनले. १८९६ मध्ये कलकत्ता काँग्रेस अधिवेशनात ते पहिल्यांदा सार्वजनिकरित्या गायले गेले, जेव्हा रवींद्रनाथ टागोर यांनी ते त्यांच्या स्वतःच्या सुरात गायले. टागोरांच्या आवाजाने हे गाणे अमर केले. १९०५ च्या बंगालच्या फाळणीदरम्यान, हे गाणे स्वदेशी चळवळीचे प्रतीक बनले. बाळ गंगाधर टिळक, लाला लजपत राय आणि बिपिन चंद्र पाल यांसारख्या नेत्यांनी ते रॅलींमध्ये गायले. ब्रिटिश सरकार इतके घाबरले की १९०७ मध्ये त्यांनी या गाण्यावर बंदी घातली. तरीही, अरबिंदो घोष आणि सुभाषचंद्र बोस यांसारख्या क्रांतिकारकांनी ते गुप्तपणे गायले. महात्मा गांधींनीही त्याचे कौतुक केले, परंतु संपूर्ण गाणे स्वीकारण्यास ते कचरले कारण त्यात हिंदू देवतांचे संदर्भ होते, जे मुस्लिम समुदायाला वेगळे करू शकते. तरीही, चळवळीवर त्याचा प्रभाव प्रचंड होता. १९३७ मध्ये, रवींद्रनाथ टागोर यांनी एका ऑर्केस्ट्रामध्ये ते सादर केले, ज्यामुळे ते जगाचे लक्ष वेधले गेले. त्या काळात भारत देश पारतंत्र्यात होता. पराधीनतेच्या अंधारात भारतीयांचा आत्मविश्वास हरवला होता. पण 'वंदे मातरम्'च्या प्रत्येक ओळीने लोकांच्या मनात पुन्हा रक्त उसळायला लागलं. प्रत्येक शब्दातून जणू आईच्या पदराचा स्पर्श जाणवत होता. त्या गीताने भारतीयांना आठवण करून, 'आपली मातृभूमी जिवंत आहे आणि तिचं रक्षण करायचं दायित्व आपल्या रक्तात आहे!'



त्या काळातील प्रत्येक स्वातंत्र्यसेवकाच्या तोंडात 'वंदे मातरम्'हा मंत्र होता. ब्रिटिशांची सत्ता हादरली कारण या दोन शब्दांत संपूर्ण भारत एकवटला होता. ज्यांच्या हातात तलवार नव्हती, त्यांनी 'वंदे मातरम्'च्या हाकेने लढा दिला. त्या हाकेत गोळी नव्हती, पण तर हृदयात झिरपणारा बाण होता.

## अग्रलेख...

# फटाके आणि हायड्रोजन बॉम्ब

बिहारमधील विधानसभा निवडणुकांचे रंगात आलेले राजकारण केवळ मतांची टक्केवारी, जाती-धर्मांची परंपरागत गणिते एवढ्या मर्यादित मुद्यांभोवती फिरणारे राहिलेले नाही. आता होत असलेली ही निवडणूक म्हणजे, भाजपाच्या राष्ट्रीय स्तरावरील राजनीतीला मिळणारा कौल असेल. काँग्रेस नेते व लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या निवडणूक राजनीतीचा बाजच वेगळा आहे. बिहारमधील निवडणुकांच्या तोंडावर त्यांनी उचलून धरलेल्या मतचोरीच्या मुद्याचा नवा अंक 'एच फाईल्स' या नावाने बुधवारी सादर करण्यात आला. हरयाणामध्ये २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत २५ लाख मतांची चोरी झाल्याचा व मतदार यादीत अनेक नावांची दुबार किंवा त्याहून अधिक वेळा नोंद झाल्याचा आरोप करून त्यास पुष्टी देणारे काही पुरावेही त्यांनी माध्यमांसमोर मांडले. हे सारे एक नियोजनबद्ध कारस्थान असल्याचा आरोप करून त्यांनी निवडणूक आयोगाला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याचा नवा प्रयत्न केला. त्यांचा हा नवा कथित हायड्रोजन बॉम्ब सत्ताधारी भाजपाला आणि केंद्रीय निवडणूक आयोगाला जोरदार धक्का देणार, अशी जोरदार हवा त्यांच्या पत्रकार परिषदेआधी काँग्रेस व भाजपाविरोधी आघाडीने तयारही केली होती; पण या पक्षांचाच अपेक्षाभंग झाला. निवडणूक आयोगाने राहुल गांधी यांच्या या आरोपांचे खंडन केले आहे.

मतदार यादीत दोष असेल तर काँग्रेसच्या बूथ स्तरावरील कार्यकर्त्यांनी त्यास वेळीच आक्षेप का घेतला नाही, निवडणुकीआधी प्रसिद्ध झालेल्या यादीबाबत एकदाही तक्रार किंवा आक्षेप नोंदविला नाही, अनेक वेळा मतदान करणाऱ्यांना रोखले नाही आणि मतदान केंद्रांतील त्रुटी दाखविल्या नाहीत, हा निवडणूक आयोगाचा खुलासा लोकशाही प्रक्रियेशी सुसंगत असाच आहे. राहुल गांधी यांनी माध्यमांसमोर कितीही आवेशांत कागदपत्रांचे गठ्ठे उघडले, मतदारांना समोर उभे करून मतचोरीच्या कहाण्या रचल्या, तरी ज्या लोकशाही यंत्रणेच्या कारभारास आव्हान देण्यासाठी न्यायालये हाच योग्य मार्ग ठरतो; तिकडे जाण्याची मात्र त्यांची तयारी नाही. आपण माध्यमांच्या साक्षीने देशासमोर जे काही उघड करीत आहोत, ते न्यायालयांस दिसत असल्याने न्यायालयाने याची दखल घ्यावी ही त्यांची अपेक्षा म्हणजे, लोकशाही यंत्रणांना आपल्या अपेक्षेनुसार वागविण्याचा व वाकविण्याचा प्रयत्न ठरू शकतो. राहुल गांधी यांना त्यांच्या आरोपांचे ठोस पुरावे घेऊन न्यायालयासमोर जावे लागेल. कारण लोकशाहीमध्ये तोच एक न्याय मिळविण्याचा न्याय्य मार्ग असतो. पण तसे होणार नसल्याने राहुल गांधींच्या कथित हायड्रोजन बॉम्बचा स्फोट तर होणे शक्य नाहीच; पण त्यांना अपेक्षित असलेला परिणामही साधता येणार नाही. हरयाणाच्या निवडणुकीतील गैरप्रकारांचे आरोप बिहार निवडणुकांच्या तोंडावर करण्यासाठी माध्यमांचा मंच वापरून बिहारी मतदारांच्या मनात निवडणूक यंत्रणा, सरकार, न्यायालये आदी लोकशाही व्यवस्थांविषयी संशयाचे ढग उभे करण्याचा आणि जनतेस संभ्रमित करून त्याचा तात्कालिक राजकीय फायदा घेण्याचा त्यांचा प्रयत्न दिसतो. ही नीती बिहारमध्ये तेजस्वी यादव यांच्या निवडणूक नीतीपेक्षा वरचढ ठरेल आणि या निवडणुकीत प्रभावी ठरू पाहणाऱ्या तेजस्वी यादव यांच्या प्रतिमेहून राहुल गांधी यांची प्रतिमा उजळण्याच्या प्रयत्नापलीकडे या कथित हायड्रोजन बॉम्बचा परिणाम होईल, अशी शक्यता धूसरच आहे. लोकशाहीतील कोणत्याही यंत्रणांची कार्यपद्धती संशयातीत असली पाहिजे आणि त्यांच्या कामगिरीवर कोणतेही बोट दाखविले जाऊ नये ही रामराज्याची संकल्पना आहे. राहुल गांधी यांनी न्यायालयात न जाता या यंत्रणांवर जाहीर आरोपांचे सत्र अवलंबिले असल्याने, त्यातून तावूनसुलाखून निघण्याकरिता आयोगास अग्निपरीक्षा देणे भाग पडावे, हाच या राजकारणाचा बाज दिसतो.

बिहारच्या विधानसभा निवडणुकीत भाजपाप्रणीत रालोआसमोर लालूप्रसाद यादव यांचे पुत्र तेजस्वी यादव यांनी मोठे आव्हान उभे केल्याची जोरदार हवा निर्माण करण्यात आली आहे. निवडणुकीच्या राजकारणात अशी रणनीती आखली जातेच. तेजस्वी यादव यांनीही प्रत्येक कुटुंबातील एका व्यक्तीस सरकारी नोकरी देण्याचे आश्वासन दिले आहे. 'बिहार का तेजस्वी प्रण' असे त्यांच्या आश्वासनाचे वर्णन केले जात आहे. मागच्या निवडणुकीतही त्यांनी दहा लाख रोजगारांची हमी दिली होती; पण हे रोजगार कोठून आणणार, याचा कोणताच ठोस आराखडा त्यांनी मांडला नाही. त्यामुळेच बेरोजगारीमुळे हतबल झालेल्या आणि बौद्धिक विकासाची आस असलेल्या युवक मतदारांना तेजस्वी यादव यांची ही घोषणा भुलवू शकली नाही. निवडणुकीआधी केल्या जाणाऱ्या अशा घोषणांतून पुढे येणाऱ्या काही प्रश्नांची उत्तरे तेजस्वी यादव यांच्याकडे नाहीत. या घोषणांचा राज्याच्या तिजोरीवर होणारा परिणाम कसा रोखणार याचा काहीच आराखडा त्यांच्याकडे नाही. त्यामुळे घोषणांच्या अंमलबजावणीबाबत जनतेच्या मनात विश्वास रुजविणे तेजस्वी यादव यांना सोपे नाही. एका बाजूला तेजस्वी यादव यांची आश्वासनांची खैरात, राहुल गांधी यांचा निवडणूक आयोगाविरुद्धचा संघर्ष आणि दुसरीकडे गेल्या दहा वर्षांच्या केंद्रातील सत्ताकाळात आणि नितीश कुमार यांच्या नेतृत्वाखालील सरकारच्या कारकीर्दीत बिहारच्या जनतेमध्ये झालेल्या मानसिक परिवर्तनाची कसोटी या निवडणुकीत पुन्हा लागणार आहे. गेल्या विधानसभा निवडणुकीतील भाजपाच्या विजयानंतर बुधवारी नवी दिल्लीत पक्षाच्या मुख्यालयाच्या प्रांगणात पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी आयोजित केलेल्या धन्यवाद बिहार मेळाव्यात पक्षाचे नेते आणि देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या विजयाचे नेमके विश्लेषण केले होते. तळागाळातील प्रत्येक माणसापर्यंत विकासाची फळे पोहोचून त्याच्या जगण्याला अर्थ प्राप्त करून देणे हा खरा विकास आहे, ही पक्षाची भावना मोदी यांनी त्या मेळाव्यात अधोरेखित केली होती. बिहारने ही भावना ओळखली, याचाही त्यांनी उल्लेख केला. बिहारचे राजकारण सामाजिक रचनेभोवती फिरत ठेवण्याचा भाजपेतर पक्षांच्या राजकारणाचा डाव या निवडणुकीत फसला होता. बिहार हे कर्तबगारांचे राज्य आहे. या राज्याने देशाला अनेक सनदी अधिकारी दिले. पोलिस सेवेत उल्लेखनीय काम करणारे अनेक अधिकारी बिहारमधूनच देशाच्या कानाकोपऱ्यात गेले. साहजिकच या राज्यातील प्रत्येक तरुणाच्या डोळ्यात उत्कर्षाची स्वप्ने कधीपासूनच रुजलेली आहेत; पण ती स्वप्ने साकारण्याच्या साधनांचा स्थानिक पातळीवर अभाव हे बौद्धिक विकासासमोरील मोठे आव्हान आहे. प्रशांत किशोर सारख्या नेत्याने आपल्या पक्षाचा प्रचारही या जाणिवेभोवती केंद्रीय ठेवण्याचा प्रयत्न चालविला आहे. भाजपाने समस्येच्या मुळाशी जाण्याचा निर्धार केला होता आणि बिहारमधील तरुणाला त्याच्या क्षमतांचा विकास घडविता येईल अशा शैक्षणिक सुविधा राज्यातच उपलब्ध करून देण्याची ग्वाहीदेखील दिली होती.

निवडणुकीआधीचे आडाखे आणि मतदारांची मानसिकता, मतदानाआधीची गणिते यांमध्ये खूप अंतर असते. बिहारच्या राजकारणाची गणिते राज्यातील सुमारे १४ टक्के यादव, सुमारे १८ टक्के मुस्लिम, ३० टक्के मागासवर्गीय, अनुसूचित जाती-जमाती, अन्य समाजाच्या मतपेट्यांवर केंद्रित होत असत. भाजपा आघाडीने या राजकारणास पूर्णविराम देऊन केवळ विकासाच्याच भाषेवर भर दिला. सर्व वयोगटांतील आणि समाजघटकांतील महिलांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी महिला केंद्रित विकास योजनांवर दिलेला भर आणि त्याच्या जोडीला नितीश कुमार यांच्या सरकारने आपल्या सत्ताकाळात विद्यार्थिनींसाठी राबविलेल्या शैक्षणिक योजना या मुद्यांनी जातिपातीच्या या प्रस्थापित राजकारणावर मात केली आहे. महिला हा भाजपाचा 'सायलेंट व्होटर' आहे, हे बिहारमधील महिलांनी भाजपाला दिलेल्या भरघोस पाठिंब्यावरून याआधीही सिद्ध झाले आहे. आता या निवडणुकीआधी बिहारमध्ये महिलांसाठी जाहीर केलेल्या पॅकेजमुळे यात भरच पडेल, असे चित्र विरोधकांनीही ओळखले आहे. बिहारच्या विधानसभा निवडणुकीतून उमटणारे राष्ट्रीय राजकारणाचे रंग राहुल गांधींचे भविष्य ठरविणार आहेत, यात मात्र शंका नाही.

## प्रासंगिक

परिमल नळकांडे

# वेदमंत्राहून आम्हां वंद्य, वंदे मातरम्।

समाजाला ऐक्याच्या सूत्रात बांधणारे व राष्ट्राचा सांस्कृतिक ठेवा म्हणून भारतीयांच्या हृदयी असलेले 'माते तुला वंदन असो' असा साधा-सरळ अर्थ असलेले शब्द ज्याला हिमालयाची उत्तुंगता, गंगेची निर्मलता लागू पडते असे 'वंदे मातरम्' हे गीत. अत्यंत सरल शब्द आणि तरल भावना असलेल्या या गीतांच्या शब्दात मधुरता जरी असली, तरी या शब्दांनी देवीदेवतांच्या हाती असलेल्या शत्रुसंहारक अस्त्रांचे रूप धारण केले. राष्ट्राच्या, चळवळीच्या जडणघडणीत अनेक व्यक्तींचे, संघटनांचे कर्तृत्व व कामगिरीचे मोठे योगदान राहिले आहे. केवळ या एका गीताने किंबहुना त्यातील किमान दोन शब्दांनी राष्ट्राच्या इतिहासाला वळण देण्याचे उदाहरण अपवादात्मकच असावे. ते दोन शब्द म्हणजे वंदे मातरम्! हे एक आश्चर्यच म्हणावं लागेल. क्रांती आणि अहिंसा या दोन्ही विचारांचं एकत्रीकरण असलेले हे शब्द व दोन्ही विचारधारा ज्या गीतासमोर नतमस्तक होतात ते हे गीत प्रचंड लोकप्रिय ठरलं आहे.

बंकिमचंद्र चट्टोपाध्य यांच्या अलौकिक प्रतिभेतून १८७५ मध्ये 'वंदे मातरम्' हे गीत निर्माण झाले. बंकिमचंद्रांनी आपल्या प्राचीन परंपरेचे भान ठेवत केलेले राष्ट्र चिंतन; या चिंतनातून समृद्ध देशाचे पाहिलेले स्वप्न आणि मातृभूमीच्या सर्व पुत्रांमध्ये एकत्वाची भावना ठेवून समर्पणाचा केलेला निर्धार ही या गीताची वैशिष्ट्ये. त्यामुळेच वंदे मातरम् हे चिरंतर टिकणारी साहित्यकृती आहे. या गीताच्या बळावरच अनेक सर्वसामान्यांनी स्वतःला स्वातंत्र्यलढ्यात झोकून दिले, अनेकांनी हौतात्म्य पत्करले, भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या यज्ञात स्वतःला समिधा म्हणून समर्पित केले म्हणून हे गीत केवळ साहित्यकृती न राहता त्याहीपेक्षा सर्वोच्च स्थानावर आसनस्थ झालेला दैवी मंत्र ठरला आहे.

आपली संस्कृती मातृप्रधान आहे. देशाला मातृभूमी असे संबोधणे असा आदर्श अथर्वऋषींनी अथर्ववेदामधील पृथ्वीसूक्तात घालून दिला होता. विस्मृतीत गेलेली ही कल्पना १८५० च्या सुमारास बंगाली प्रतिभावंत कवी व संपादक असलेल्या ईश्वरचंद्र गुप्त यांनी 'जननी भारत भूमी आर केन थाक तुम्ही' या कवितेतून पुनरुज्जीवित केली. त्यांचाच आदर्श डोळ्यासमोर ठेवून त्यांचे शिष्य बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांच्या अलौकिक प्रतिभेतून वंदे मातरम्च्या रूपाने अतीव सुंदर असा आविष्कार प्रकट झाला. बंकिमचंद्रांना बंगालमध्ये 'ऋषिबंकिम' असे संबोधले जाते. स्वतः बंकिमचंद्र ऋषितुल्य असल्यामुळे त्यांनी रचना केलेले 'वंदे मातरम्' या शब्दांना वेदमंत्रांचे स्थान मिळाले आहे. दरवर्षीप्रमाणे बंकिमचंद्र आपल्या जन्मगावी नौहाटी कांटलापाडा येथे १८७५ च्या आश्विन महिन्यात नवरात्र उत्सवानिमित्ताने गेले. अष्टमीच्या उत्तररात्री मां दुर्गेची पूजा करीत असताना त्या मूर्तीत त्यांना भारतमाता दिसल्याचा भास झाला आणि



राक्षस महिषासुराच्या जागी इंग्रज दिसू लागले. त्याचवेळी त्यांनी 'आमार दुर्गोत्सव' हा लेख नवमीच्या पहाटेला लिहिला; तेच 'वंदे मातरम्'चे प्रथम लिखित गद्य स्वरूप. या लेखानंतर अवघ्या एका महिन्याने कार्तिक शुद्ध नवमी ७ नोव्हेंबर १८७५ या दिवशी नौहाटी येथे बंकिमचंद्रांनी एक हाती 'वंदे मातरम्' संस्कृत भाषेमध्ये पद्य स्वरूपात लिहून पूर्ण केले. पुढे सात वर्षांनी १८८२ मध्ये 'आनंदमठ' कादंबरीत हे गीत त्यांनी कथानकात गुंफले. 'गीतांजली'कार गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांनी १८९६ मध्ये कलकत्ता येथील राष्ट्रीय सभेचे अधिवेशनात 'वंदे मातरम्' सादर करीत श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. चेतनेचा आवाज व राष्ट्राचा आत्मा वंदे मातरम् बनले. महर्षी अरबिंदो, मॅडम भिकाजी कामा, कवी सुब्रमण्यम भारती, लाला हरदयाल, लाला लजपत राय या महापुरुषांनी त्यांची वर्तमानपत्रे व मासिकांच्या नावामध्ये 'वंदे मातरम्'चा समावेश केला. महात्मा गांधीसुद्धा अनेक वर्षे आपल्या पत्राचा शेवट 'वंदे मातरम्'ने करीत असत.

वंगभंग चळवळीच्या दरम्यान कलकत्ता येथील टाऊन हॉलमध्ये २० ऑगस्ट १९०५ रोजी सभेत अचानक कोणीतरी 'वंदे मातरम्' अशी घोषणा केली आणि या दोन शब्दांच्या सामूहिक गर्जनेने अवघा आसमंत दुमदुमून गेला. या प्रसंगापासून हे गीत स्वातंत्र्यलढ्याचे युद्धघोष बनले व इंग्रज सरकारला धडकी भाडवणारे शब्दरूपी अस्त्र बनले. बंकिमचंद्र 'वंदे भारत' असे न लिहिता 'वंदे मातरम' असे लिहीत. कारण भारतीय संस्कृतीच्या राष्ट्रवादाचे सूत्र मातृ पूजनात आहे. आपल्या जन्मभूमीचे दृश्यात्मक दर्शन व्हावे, असे सामर्थ्य या शब्दात आहे. भारतभूमी माझी मातृभूमी आहे; तिच्यासाठी मी स्वतः सर्वस्व अर्पिल, अशी भावना 'वंदे मातरम्'च्या उच्चारणातूनच प्रत्येकाच्या मनात निर्माण होते.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाल्यानंतर २४ जानेवारी १९५० रोजी झालेल्या घटना समितीच्या शेवटच्या सभेत 'जन गण मन'ला राष्ट्रगीत म्हणून तर 'वंदे मातरम्'ला राष्ट्रीय गीताचा दर्जा देण्यात आला. संविधान सभेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी राष्ट्रगीत व राष्ट्रीय गीत यांना समान सन्मान दिला जावा, असे यावेळी सांगितले. समाजाच्या राष्ट्रीय चेतनेसाठी 'स्व'च्या आधारावर राष्ट्र उभारणीच्या कार्यात समाजाला सक्रिय करण्यासाठी 'वंदे मातरम्' या पवित्र गीताचे पठन कुटुंब प्रबोधनाचा भाग व्हावे त्यातून परम वैभवी राष्ट्र निर्मितीच्या दिशेने अग्रेसित होता येईल.?

संस्कारक्षम पिढी घडविण्यासाठी तसेच मातृभूमीच्या प्रति समर्पण भाव जागृत करून तो चिरंतन तेवत राहावा याकरिता बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी वंदे मातरम् ही जी अजरामर दैवी कलाकृतीचा मंत्र रचला त्याचे पठन व पारायणे प्रत्येक भारतीयाच्या कुटुंबात झाले तर विश्वव्यापी, विश्वगुरू 'भारत' याची देही याची डोळा आपण निश्चितच पाहू शकू, याचा सार्थ अभिमान मी भारतीय म्हणून प्रत्येकाला असेल. 'वंदे मातरम' हे भारत ह्या विश्वव्यापी राष्ट्राचे आत्मगीत असून त्याची प्रेरणा सर्वांना मिळत राहो व राष्ट्रीय चेतना व राष्ट्रनिर्मितीच्या या पवित्र वेळी या महान दैवी मंत्राच्या भावनेचा अंगीकार भारतीयांमध्ये होवो. भारतीय स्वातंत्र्यसंग्रामाला महान उद्देश देणाऱ्या व मातृभूमीला सुजलाम् सुफलाम् बनण्यासाठी प्रेरणास्रोत बनलेला हा मंत्र ज्याची 'नमस्ते सदा वसले मातृभूमे' ही पुढील आवृत्ती बनली. ज्यातून राष्ट्र प्रथम हा ध्यास घेणारे व्यक्तित्व निर्माण करण्याच्या दृष्टिकोनातून अविरत प्रयत्न होत आहेत. भारत माता ही नेतृत्वाची भूमी आहे. कर्तृत्वाची, गुरूंची भूमी आहे. अखिल विश्वाचे नेतृत्व करण्याची क्षमता असलेल्या या भारतभूमीचे मोठेपण निर्विवादपणे जगाने आज मान्य केले आहे; ते एकाच कारणाने, ते म्हणजे या भारतभूमीला आम्ही माता मानतो. तिला आम्ही सदैव नतमस्तक आहोत. म्हणूनच आज वंदे मातरम् या गीताचे १५० वर्षे पूर्ण होत असताना हे गीतही आपल्या ओठांवर सहज येते...

वेदमंत्राहून आम्हां वंद्य, वंदे मातरम्।

९८५०७८९५७४

## वेध

प्रफुल्ल क. व्यास

# इष्टाचा स्वीकार हीच श्रद्धा

आपण खरोखरच देवाची पूजा करतोय की, देवाच्या नावाने अधर्माचे तांडव करतोय, असा प्रश्न पडण्यासारखी परिस्थिती आजकालही उद्भवते. उदाहरण म्हणजे- नवस फेडण्याच्या नावाखाली नवजात बालकांना वेदना देण्याची प्रथा आजही अनेक ठिकाणी आहे. त्यातली एक प्रथा म्हणजे- देवाच्या कृपेची परतफेड म्हणून आई-वडील बाळाला थंड पाण्यात क्षणभर बुडवतात. त्याप्रसंगी भोवतालचे लोक टाळ्या वाजवतात, आरती म्हणतात आणि त्या लहान जिवाचे थरथरणारे शरीर त्या साऱ्यांच्या श्रद्धेसाठी एक माध्यम ठरते. अशी प्रथा कोणे एके काळी देवाला प्रसन्न करण्याच्या असोशीतून सुरू झाली असेलही. त्यावेळी आणि त्यानंतरदेखील बरेच काही घडले. त्या साऱ्यांचा उच्चार करण्याची आता गरज नाही. कारण ते दुरुस्त होऊ शकत नाही. गतकाळात काय झाले, याची उजळणी करण्यापेक्षा वर्तमान आणि भविष्य दुरुस्त करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

आपल्या समाजाने अनेक अनिष्ट प्रथा-परंपरा मागे सोडल्या. म्हणूनच आज भारतीयांचा बोलबाला जगभर आहे. श्रद्धा आणि संस्कृती न सोडताही हा समाज जगात नाव कमावता झाला, याचे कारण या समाजातील सामूहिक विवेकात दडलेले आहे. मात्र, आजच्या काळातही नदीत सोडलेले बाळ देवाच्या कृपेने वाचले तर देव पावतो आणि नशिबाने अपघात झाला तर देवाची मर्जी, असा प्रकार होत असेल तर ते धक्कादायक आणि धोकादायकही आहे. ईश्वरावरील श्रद्धा इतकी क्रूर आणि अमानुष असू शकत नाही. ईश्वराला फक्त माणुसकी हवी असते. माणसांचे आपसातले प्रेम हवे असते. श्रद्धेच्या नावाखाली त्याला कोणत्याही प्राणिमात्राला त्रास दिलेला चालत नाही. तरीही हे असे घडत असते तेव्हा धक्का बसतो. श्रद्धाळूंना देव पावतो, असे आपण म्हणतो तेव्हा ईश्वरी शक्तीवर विश्वास ठेवून आपले कर्म करीत असलेल्यांचे अंतिमतः कल्याण होते, असाच त्याचा साधा अर्थ असतो. पण, श्रद्धेला अविवेकाची काजळी चढते तेव्हा त्यातून अंधश्रद्धेचा जन्म होतो आणि असे अघोरी काही तरी घडते आणि अशा श्रद्धाभावावरच प्रश्नचिन्हे उपस्थित केली जाऊ लागतात. देवावरचा विश्वास, व्रत, उपवास आणि नवस यांमुळे अनेकांना मानसिक बळ मिळते हे खरे आहे. जीवनातील संकटांना सामोरे जाण्याचे धैर्य मिळते हेही खरे. पण, नवस फेडण्याच्या नावाखाली असे काही तरी अघोरी कृत्य होत असेल तर देवही त्यांना माफ करणार नाही. नवजात बालकांचा नवस फेडण्यासाठी केले जाणारे असले अघोरी प्रकार हे त्या कुटुंबासह साऱ्या समाजासाठी लांच्छनास्पद आहेत.



मध्यप्रदेशातील भैसदेही (जिल्हा बैतुल) येथे नवस फेडण्याच्या नावाखाली बालकांना नदीच्या पाण्यात सोडण्याची प्रथा आजही अस्तित्वात आहे. देवावर विश्वास ठेवणे आणि देवाच्या नावाने निरागसाच्या जिवाशी खेळणे यात फरक आहे. दुर्दैवाने अंधश्रद्ध व्यक्तींना यातील फरक कळत नाही. श्रद्धा माणसाला उन्नत करते तर अंधश्रद्धा अध:पतनाकडे नेते, हे अशा लोकांना समजावून सांगण्याची गरज आहे. नवस फेडण्याच्या नावाखाली बालकांना पाण्यात सोडण्यात कसलीही श्रद्धा नाही; ती मानवी मनाची भीती आणि पूर्णपणे अंधविश्वासच होय. काही परंपरा काळानुरूप बदलण्याची गरज असते. आधुनिक भारताला श्रद्धा हवी आहेच. डोळस श्रद्धा ही भारतीय समाजाची ओळख आहे, पण अंधश्रद्धा हा आपल्या समाजासाठी ठसठसता व्रण आहे, हेही तेवढेच खरे. नवस कोण्या एका जाती-धर्मातच केला जातो असे नाही. अडचणीत आलेली प्रत्येक व्यक्तू देवाचा धावा करते आणि इच्छा पूर्ण झाल्यावर त्याची परतफेडही करते, म्हणजे नवस फेडते. सश्रद्ध असलेल्या हिंदू समाजाची प्रतिमा प्रगतिशील आणि विज्ञानवादी समाज अशी आहे. अशा समाजाला बदनाम करण्यासाठी काही लोक नेहमीच टपलेले असतात. त्यामुळे असे प्रकार आपल्या भोवताली कुठेही घडत असतील, नजरेस येत असतील तर ते थांबविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. हिंदू समाजातील जाणत्या जनांची ही जबाबदारी आहे. आपला समाज प्रगत झाला याचा अर्थ प्रत्येकाच्या घरी श्रीमंती आली असा होत नसतो. समाज तेव्हाच खऱ्या अर्थाने प्रगत होतो, जेव्हा तो अनिष्टाला मागे सोडून इष्टाचा स्वीकार करतो आणि इष्टाचा स्वीकार हीच खरी ईश्वरी आराधना आणि हीच खरी श्रद्धा होय.

९८८१९०३७६५

## विशेष

मोरेश्वर बडगे

# विरोधी पक्ष लढूच शकत नाहीत!

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांचं बिगुल वाजलं आहे. २ डिसेंबर रोजी पहिल्या टप्प्यात नगर परिषद आणि नगर पंचायत निवडणुका होणार आहेत. मतदार याद्या सदोष असल्याचे कारण पुढे करून निवडणुका पुढे ढकलू मागणाऱ्या विरोधी पक्षांना हा तडाखा आहे. त्यांना आता लढावेच लागेल; पण लढणार कसे? संविधानाचे 'लाल पुस्तक' दाखवून राहुल गांधी यांनी लोकसभा निवडणुकीत जनतेला भुलवले. त्यामुळे महाराष्ट्रात भाजपाला खड्डा पडला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना नितीशकुमार, चंद्राबाबू नायडू यांची मदत घ्यावी लागली. विधानसभा निवडणुकीत कुठलाही नॅरेटिव्ह नव्हता. त्यामुळे विरोधकांनी मार खाल्ला. आता त्यांनी 'मत चोरी' नावाचा नवा मुद्दा शोधला आहे. मतदार याद्या सदोष आहेत, असे सांगून त्यांनी निवडणुकाच पुढे ढकला, याद्या दुरुस्त करून मग निवडणुका घ्या, असा धोशा चालवला आहे. लोकसभेत जिंकले तेव्हा विरोधकांना मतदार यादीतले दोष दिसले नाहीत. मुळात ते निवडणुकीला घाबरले आहेत. जनता आपल्याला जवळ करणार नाही, ही भीती त्यांना सतावते आहे. त्यातून हे नखरे सुरू झाले आहेत. पण निवडणुका होणार. विरोधकांना त्या लढाव्याच लागणार. नाही म्हणून सांगणार कोणाला? राजकीय पक्ष निवडणुकांसाठीच असतो. निवडणुकाच लढायच्या नाहीत म्हटले तर पक्षच संपतो. तुम्ही पाहाल. राज ठाकरेंपासून उद्धव ठाकरेंपर्यंत सारे लढतील. लढले नाही तर त्यांचेच लोक त्यांना सोडून बंडखोर म्हणून लढतील. शेवटी प्रत्येकाला आपापले राजकारण आहे.

शरद पवार कित्येक वर्षे सत्तेत होते. काही केले नाही. मराठा आरक्षणाचा प्रश्न त्यांना सोडवावा, असे वाटले नाही. मतदार याद्या सुधाराव्या, असे वाटले नाही. मात्र सत्ता गेली की मागायला हे मोकळे. मत चोरी विरोधी पक्षही रोखू शकतो. त्यासाठी निवडणूक आयोगाची गरज नाही. कोर्टात जायची गरज नाही. बुथवर चाणाक्ष पोलिंग एजंट ठेवले तर मत चोरी तिथल्या तिथे पकडता येते; पण हे करायची विरोधकांची तयारी नाही. त्यांना राजकारण करायचे आहे. प्रहारचे नेते बच्चू कडू चार वेळा आमदार होते. त्या काळात त्यांना शेतकरी आठवला नाही. आता रिकामपण आल्यावर शेतकऱ्यांचे आंदोलन चालवत आहेत. उद्धव ठाकरे, राज ठाकरे यांचीही अशीच अवस्था आहे. मुंबईमध्ये उद्धव यांचे देऊळ पाण्यात आहे. २५ वर्षे एकहाती राहिलेली मुंबई महापालिका हातची जाणार या जाणिवेने उद्धव अस्वस्थ आहेत. त्या मानसिकतेतूनच त्यांनी २० वर्षांपूर्वी वेगळे झालेल्या भावाला सोबत घेतले. तरीही माहोल सुधारत नाही हे पाहून त्यांनी लोकांमध्ये संभ्रमावस्था पसरवणे सुरू केले आहे. निवडणूक



आयोगासारख्या संवैधानिक संस्थेविषयी लोकांमध्ये संशय निर्माण केला जात आहे. निवडणूक आयोग सत्ताधाऱ्यांच्या हातचे बाहुले बनला, असे ते म्हणतात. त्या जोशात मतदार याद्यांची चिरफाड करताना ठाकरे बंधू थकत नाहीत. दुबार मतदारांचा विषय मांडताना विरोधकांनी केवळ मराठी माणसांचीच नावं सांगितली. हिंदू-मराठी माणसंच दोन-तीन वेळा नोंदणी करून भाजपाला जिंकवतात, असे त्यांना सुचवायचे आहे का? मतदार याद्यांमध्ये गफलत नाही, असे भाजपाने कधीही म्हटलेले नाही. पण विरोधकांनी लपवली ती मुस्लिम दुबार मतदारांची नावं भाजपा नेते आशिष शेलार यांनी उजेडात आणली. राष्ट्रवादीचे नेते रोहित पवार १२४३ मतांनी जिंकले. त्यांच्या मतदारसंघात दुबार मुसलमान मतदारांची संख्या ५५३२ आहे. नाना पटोले फक्त २०८ मतांनी जिंकले. तेथे मुसलमानांची दुबार मतं ४७७ आहेत. ही यादी ठाकरेंना का दिसली नाही? भोईर, पाटीलच का दिसले? मतदार याद्या सदोष आहे असे म्हणता, पण याच याद्यांच्या जोरावर महाराष्ट्र विकास आघाडीने लोकसभेच्या ३१ जागा जिंकल्या आहेत. तेव्हा तर कोणी ओरडा केला नाही. लोकसभेच्या वेळी होत्या त्याच मतदार याद्यांवर विधानसभा निवडणूक झाली. आपण जिंकलो तर सारे बरोबर. हरलो तर मतचोर हा विरोधकांचा शुद्ध कांगावा आहे. विरोधकांनी आखलेले हे 'फेक नॅरेटिव्ह' आहे. शेलारमामांनी ठाकरेंना बरोब्बर उघडे पाडले. मतदार याद्या निर्दोष असल्या पाहिजेत, असे साऱ्यांनाच वाटते. त्या आधार कार्डशी, बँक खात्याशी जोडल्या तरच ते होऊ शकते. पण तशी कोणाची इच्छा आहे? त्या ऐवजी मोर्चा काढणेच विरोधकांना आवडते.

मतदार याद्यांमधील घोळाकडे लक्ष वेधण्यासाठी ठाकरे बंधूंनी मुंबईत मोर्चा काढला. या मोर्चाला 'सत्याचा मोर्चा' असे नाव दिले गेले. सत्य शोधावं लागणाऱ्या या मोर्चात मुलूखमैदान तोफ म्हणून ओळखले जाणारे उबाठाचे खासदार संजय राऊत नव्हते. 'गंभीर आजार झाल्याने दोन महिने आपण सार्वजनिक जीवनात दिसणार नाही' असे संजय राऊत यांनी मागेच जाहीर केले होते. मात्र पूर्ण मोर्चात त्यांचे नाव घेण्याची इच्छाही कोणाला झाली नाही हे नवलच. सकाळी नित्यनियमाने सत्ताधाऱ्यांविरोधात राऊत सडकून टीका करत. गेली सहा वर्षे ते ही गोष्ट नित्यनियमाने करत आले आहेत. सत्ताधारी 'सकाळचा भोंगा' म्हणून त्यांची टिंगल उडवतात तो भाग वेगळा. पण हा भोंगा सध्या बंद आहे. नियती कोणाला चुकली? असे म्हटले जाते तेच खरे. मात्र त्यांची दखल सर्वप्रथम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घ्यावी हेही नवलच. 'तुमच्या तब्येतीत सुधारणा होवो यासाठी मी प्रार्थना करतो' असे ट्विट मोदींनी केले. दैनिकाचा जाहिरात व्यवस्थापक, वार्ताहर, पुढे कार्यकारी संपादक, नंतर शिवसेनेचे राज्यसभा सदस्य या विविध रूपात राऊतांची ओळख द्यावी लागेल. बाळासाहेब ठाकरे यांच्या जवळचे ते होते. आताही उद्धव ठाकरे यांचा चेहरा म्हणूनच त्यांच्याकडे पाहिले जाते. चांगल्या आणि वाईट अर्थाने त्यांनी शिवसेनेला सदा चर्चेत ठेवले. असा मोहरा निवडणुकांच्या ऐन रणधुमाळीत मैदानात नाही, याचा उबाठाला नक्कीच फटका बसणार आहे. राऊत यांना नक्की काय झाले हे अजून बाहेर आलेले नाही. मात्र, त्यांची जागा कोण घेणार याची महाराष्ट्राला उत्सुकता आहे. आंदोलनाचा विषय येतो तेव्हा एक गोष्ट स्पष्टपणे जाणवते. मुळात विरोधी पक्षच उरला नाही. आंदोलन करणार कोण? जनतेची लढाई लढणे हा मूळ धर्म विरोधी पक्ष विसरले. आताही आंदोलनं होतात; पण ती टीव्हीवरच्या कॅमेऱ्यापुरती. कॅमेरे बंद झाला की आंदोलन संपते. पूर्वी जॉर्ज फर्नांडिस, मृणाल गोरे, अहिल्या रांगणेकर आदी नेते लाठ्या खात रस्त्यावर आडवे होत. आताच्या हायफाय आंदोलकांना साधेही खरचटत नाही. पण म्हणून आंदोलनं संपली अशातला भाग नाही. आंदोलनं होतात. विरोधी पक्ष त्यात उतरतच नाही. मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणासाठी तब्बल तीन वर्षे आंदोलन केले. पण विरोधी पक्षाने बघ्याचीच भूमिका घेतली. बच्चू कडू यांच्या शेतकऱ्यांच्या ताज्या आंदोलनात विरोधकांनी झोकून देणे अपेक्षित होते, पण विरोधी पक्ष अलिप्त राहिले. त्यामुळे अपेक्षित रिझल्ट मिळत नाहीत. मनोज जरांगे पाटील यांच्यासाठी निघालेला जीआर फुसका निघाला आणि कडू यांच्या हाती कर्जमाफीचे गाजर आले. अण्णा हजारे यांच्या लोकपाल आंदोलनात भाजपा पूर्ण ताकदीने उतरला होता. लोकचळवळ उभी करण्याकरिता प्रचंड मेहनत करावी लागते. तसली आंदोलन हल्ली दुर्मिळ झाली आहेत.

९८२२२६२७३५

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## वन विभागाला जागे करण्याची गरज

केंद्र सरकार जनतेच्या हितासाठी कटिबद्ध आहे. मात्र राज्यातील वाढते राजकारण सामान्य माणसाला विचार करायला लावणारे आहे. शिक्षणाचे माहेरघर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुणे जिल्ह्यात सध्या ठिकठिकाणी बिबट्या हा वन्यप्राणी आढळून येतो आहे. जिल्हयतील खेड, शिरुर आदी तालुक्यात बिबट्यांनी काही शेतकऱ्यांवर हल्ला केल्याचीही जोरदार चर्चा सुरू आहे. विशेष म्हणजे ''कुत्रे कमी आणि बिबट जास्त'' अशी टीकाही अनेकांकडून होत आहे. वनविभाग सतर्क असून यासाठी पुरेपुर प्रयत्न सुरू आहेत. मात्र या बाबीकडे लक्ष देण्याची गरज आहे. अनेक ठिकाणी शाळा, महाविद्यालये गावाबाहेर असल्याने धोका संभवण्याची शक्यता नाकारता येत नाही. परराज्यातून बिबटे राज्यात येत नाही ना, असा प्रश्नही मनात येतो. आजही ग्रामीण भागात, शेतशिवारात वन्यप्राण्यांचा मोठा हैदोस पाहायला मिळतो आहे. रानडुक्कर, रोही, माकडे यांच्यामुळे शेतपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. शेतात अनेकदा शेतकऱ्यांवरही हल्ले होतात. माणसाचे जीवन एवढे स्वस्त झाले का? मंत्रिमहोदय आणि वनविभागाने तातडीने लक्ष देण्याची गरज आहे. मानवी वस्तीमध्ये राहून प्रामाणिकपणे जगणारे पाळीव कुत्रे यांची संख्या कमी होणार नाहीत. त्यांच्यावरही बिबट्यांचे हल्ले होणार नाहीत याची काळजी घेणे आवश्यक आहे. तातडीने सापळे रचून खुलेआम फिरणाऱ्या बिबट्यांचा बंदोबस्त करावा,



## वाचक पत्रे

**सचिन नागरे**/९६०४३२१४३२

●● ●●

## पालिका निवडणुकीचा उत्सव प्रारंभ

नगर पालिका निवडणुकीचा बिगुल वाजला आहे. शहरात राजकीय चर्चा, उमेदवारांची धावपळ, कार्यकर्त्यांची लगबग, पोस्टर-बॅनरची गर्दी आणि सोशल मीडियावर सुरू झालेले प्रचारयुद्ध या सर्वांमुळे आता वातावरणात एक वेगळाच 'उत्सव' जाणवू लागला आहे. होय, हा उत्सव आहे लोकशाहीचा, जनतेच्या सत्ताधिकाराचा आणि नागरी जबाबदारीचा! नगर पालिका निवडणुका म्हणजे केवळ सत्तेचा बदल नाही, तर शहराच्या भविष्याची दिशा ठरवणारा निर्णायक टप्पा आहे. रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, नाल्या, उद्याने, बाजारपेठा ही केवळ सेवा नाहीत; हीच आपल्या नागरिकांच्या दैनंदिन जीवनाची गती आहेत. त्यामुळे मतदारांची निवड, त्यांचा विचार आणि निर्णय या सर्वांची किंमत प्रचंड आहे. आजची निवडणूक जनतेसाठी एक आरसा आहे. या आरशात उमेदवारांचे वचन, कामगिरी, प्रामाणिकता आणि जनतेशी असलेला संवाद स्पष्टपणे दिसतो. गेल्या पाच वर्षांत कोण खरंच जनतेसोबत उभा राहिला, कोण फक्त निवडणुकीच्या वेळीच दिसतो आणि कोणी खऱ्या अर्थाने विकासाला दिशा दिली हे सर्व मतदार ओळखू शकतात. आजच्या राजकीय वातावरणात प्रचाराचे माध्यम बदलले आहे. एकेकाळी घराघरापर्यंत जाऊन घेतलेला संवाद आता सोशल मीडियावरच्या पोस्ट आणि व्हिडीओंमध्ये परिवर्तित झाला आहे. परंतु जनतेच्या मनात पोहोचणारी गोष्ट अजूनही तीच आहे प्रामाणिकपणा आणि कामाची नोंद. या बळावरच उमेदवार निवडून येतील, हे लक्षात असले पाहिजे.

**मुनीश्वर मलेवार**/७७४४०१०७८७

●● ●●

रविवारची पत्रे व वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

## आजचे संघगीत-३९

शुक्रवार, ७ नोव्हेंबर २०२५

### करी बांधु या पवित्र कंकण

करी बांधु या पवित्र कंकण ॥धृ.॥

इतिहासाच्या पानोपानी पूर्व दिव्य ते बसले लपुनी
रम्य भविष्याची त्यामधुनी भव्य मंदिरे पुनश्च उभवुन ॥१॥

निजरुधिराची अर्घ्य अर्जुन ज्यांनी केले स्वराष्ट्रपूजन
कृतज्ञतेने तयांस वंदुन कर्तव्याचे करू जागरण ॥२॥

स्वार्थाचे ओलांडुन कुंपण व्यक्तित्वाचा कोषहि फोडुन
विसरुन अवघे अपुले मीपण विराट साक्षात्कार जागवुन ॥३॥

जो हिंदू तो अवघा माझा, घोष एक हा फिरून गर्जा
मुक्तिमार्ग हा एकच समजा, अन् सर्वांना द्या समजावुन ॥४॥

ध्वजराजाला साक्ष ठेवुनी आज बोलु या निश्चयवाणी
शुभसंकल्पा हीच पर्वणी राहिल निष्ठा उरी चिरंतन ॥५॥

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/





# आगामी निवडणुकीसाठी सर्व ताकदीनिशी सज्ज व्हा : उपमुख्यमंत्री अजित पवार

## सोलापूर शहर जिल्ह्याची मुंबईत झाली आढावा बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.६ नोव्हेंबर-**

राज्यातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून सोलापूर शहर जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची ताकद वाढवा. निवडणुकीसाठी सर्व ताकदीनिशी सज्ज व्हा. अशा सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सोलापूर शहर जिल्हाच्या अनुषंगाने मुंबईत बोलावलेल्या आढावा बैठकीत दिल्या.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सोलापूर शहर जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अधिक बळकट करण्यासाठी प्रत्येक पदाधिकाऱ्यांनी प्रयत्न केले पाहिजे.सर्व ताकद पणाला लावा असे आवाहन देखील अजित पवार यांनी केले.

बैठकीस प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, सोलापूर जिल्ह्याचे संपर्क मंत्री तथा कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा तथा राष्ट्रवादीचे नेते रूपाली चाकणकर, सोलापूर शहराध्यक्ष संतोष पवार, जिल्हाध्यक्ष उमेश पाटील, प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव, आनंद चंदनशिवे, सचिव प्रमोद भोसले, आनंद मस्तारे, इरफान शेख आदींसह प्रमुख पदाधिकारी, नेतेमंडळी आणि कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. आढावा बैठकीत सोलापूर शहराचे अध्यक्ष संतोष पवार यांनी शहराच्या कार्याचा आढावा अजित पवार यांच्यासमोर सादर केला. शहराच्या निवडणुकीसाठी सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्ते सज्ज असून, महापालिका निवडणुकीसाठी सर्वच्या सर्व जागा लढण्याची तयारी आहे. सर्व ताकद लावून निवडणूक लढवू आणि जिंकू असा आशावाद देखील पवार यांनी या बैठकीत व्यक्त केला. त्यानंतर संजय शिंदे आणि कल्याण काळे यांनी देखील जिल्हास्तरावरील नगरपरिषद आणि नगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने आपल्या कार्याचा आढावा बैठकीत सादर केला. त्यांनी देखील आगामी निवडणुका स्वबळावर जिंकण्याचे योजना आखल्या असून, जास्तीत जास्त जागा जिंकून आणण्याचे आश्वासन यावेळी दिले. निवडणुकीच्या त्या अनुषंगाने सर्व पदाधिकारी कार्यकर्ते कार्य करत असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. तदनंतर प्रदेश उपाध्यक्ष म्हणून किसन जाधव आणि आनंद चंदनशिवे यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले. या बैठकीस सोलापूर शहर जिल्ह्यातील पदाधिकारी उपस्थित होते.

# व्हॉईस ऑफ मीडिया सोलापूर जिल्हाध्यक्षपदी बालाजी फुगारे; उपाध्यक्षपदी तौफिक नदाफ

**मुंबई, दि. ६ नोव्हेंबर-**

व्हॉईस ऑफ मीडिया आणि व्ही.ओ.एम. इंटरनॅशनल फोरम या पत्रकारांच्या जागतिक संघटनेची सोलापूर जिल्हाध्यक्षपदी बालाजी फुगारे तर उपाध्यक्षपदी तौफिक नदाफ यांची निवड झाली.



बालाजी फुगारे



तौफिक नदाफ

संघटनेची सोलापूर जिल्हा नूतन कार्यकारिणी जाहीर झाली आहे. यात सोलापूर जिल्ह्यातील अनेक पदाधिकाऱ्यांचा राज्य कार्यकारिणीतही समावेश करण्यात आला आहे. संस्थापक अध्यक्ष संदीप काळे आणि प्रदेशाध्यक्ष अनिल म्हस्के यांच्या उपस्थितीत पंढरपूर येथे झालेल्या बैठकीत ही निवड करण्यात आली. **अन्य पदाधिकारी असे :** राज्य संघटक सुरज सरवदे, सोलापूर महानगराध्य धनराज बगले, सोलापूर ग्रामीण जिल्हाध्यक्ष माऊली डांगे, राज्य कार्यकारिणी सदस्य सौरभ वाघमारे, मंदार लोहकरे आणि रवी लव्हेकर. विविध तालुक्याचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्य असे : सुरज कौलगे, गणेश गांडुळे (पंढरपूर), सचिन राठोड (उत्तर सोलापूर), अरिफ नदाफ, राजदत्त रसाळगेकर (दक्षिण सोलापूर) , जहूर सय्यद, मैनुद्दीन नदाफ, उजेफ इनामदार (खजिनदार, सोलापूर शहर मध्य), शितलकुमार मोठे, हर्षवर्धन गाडे (करमाळा), सिद्धेश्वर माने, शब्बीर मुलानी (सांगोला), बाळकृष्ण गायकवाड (माढा), स्वागत खपाले, अण्णा भोसले (माळशिरस), रोहिदास भोरकडे, बापू मासाळ (मंगळवेढा),

**पंढरपूर शहर :** जगदीश डांगे, नागेश काळे, गोपाळ माळी (सचिव), पूजा खपाले (प्रसिद्धीप्रमुख), समाधान व्हनसाळे (खजिनदार), अजित देशपांडे (कार्याध्यक्ष). सदस्य : श्रीराम थेटे, माऊली लोखंडे, तेजस गांजाळे, संदीप बागल, अमोल माने आणि सूर्यकांत माने. **मोहोळ :** विजय पुजारी, नानासाहेब ननवरे , वैभव जावळे (खजिनदार), वसीम शेख (सचिव), भैय्यासाहेब कांबळे (सहसचिव), सदस्य- पद्माकर सोनटक्के, बाळासाहेब पारवे, दिनेश सातपुते, योगेश शिंदे सोमनाथ मुसंडे.

**सोलापूर शहर :** धनराज बगले, विजय पारसेकर. सदस्य : रश्मी मोहोळकर, आकाश इंगळे, तेजस मुद्दे, राजेश भोई, कोकणे दत्तात्रय संपकाळ, चेतन लिघादे, भावना मंगलपल्ली, अक्षदा चव्हाण, दत्ता केरे आणि मंजुषा दोरकर.

पान १ वरुन

# शेतकरी मदतीपासून वंचित

बाधित क्षेत्र ६ लाख ०४ हजार ६४१.४३ हेक्टर इतके असून, या सर्वांचा एकूण अपेक्षित निधी ८६७ कोटी ३७ लाख ६३ हजार ८५५ इतका असून, याचा फायनल अहवाल शासनाकडे नुकताच पाठविला आणि त्यास पूर्णपणे मंजुरीही मिळाली आहे. त्यानुसार पूर्ण रक्कम मंजुरीचा जीआरही आला आहे. यानुसार आता शेतकऱ्यांच्या खात्यावर थेट रक्कम जमा होवू लागली असून, अॅग्रीस्टॅक केलेल्या सर्वच शेतकऱ्यांना थेट मदत मिळत आहे. ही रक्कम मिळविण्यासाठी आता ई-केवायसीचीही गरज नाही. यामुळे शेतकऱ्यांनी अॅग्रीस्टॅकमध्ये आपले नाव नोंदवून नुकसान भरपाई आपल्या बँक खात्यावर पाडून घ्यावी, असेही आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले आहे. जिल्ह्यात ६ लाख ९० हजार ७३६ इतके पीएम किसान सन्मान योजनेत शेतकरी समाविष्ट आहेत; यातील ६ लाख ५३ हजार १०७ शेतकऱ्यांनी अॅग्रीस्टॅक केलेला आहे. यामुळे याद्या जसजशा अपलोड होत आहेत; त्याच धर्तीवर शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसेही पडत राहणार आहेत. हे पैसे दिल्लीतून येत असल्याने सर्व शेतकऱ्यांची टॅली करूनच ते पैसे टाकत असल्याने पैसे मिळण्यास विलंब लागत आहे. असाही निर्वाळा जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिला आहे. यामुळे शेतकऱ्यांनी कसलाही गैरसमज करून घेवू नये, सर्वच शेतकऱ्यांच्या खात्यावर हे पैसे येणार असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. या महापुरात अनेकांची शेती खरडून गेली आहे; अनेकांचा ऊस व फळबागा वाहून गेल्या आहेत; विहिरी बुजल्या आहेत, अशा शेतकऱ्यांना येत्या थोड्याच दिवसात पैसे मिळणार आहेत. अतिवृष्टीची नुकसान भरपाई झाल्यावर या शेतकऱ्यांना शासनाकडून मदतीचा हात मिळणार असल्याचेही जिल्हाधिकारी यांनी स्पष्ट केले.

# अभ्यासाच्या टेंन्शनमुळे तरूणीची आत्महत्या

**सोलापूर, दि. ६ नोव्हेंबर -**

अभ्यासाच्या टेंन्शनमुळे सुरतगाव (ता. तुळजापूर) येथे २१ वर्षिय तरूणीने विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केली. ही घटना बुधवारी रात्री ११ च्या सुमारास घडली. कल्पना गजेंद्र बोचरे (वय २१, रा. सुरतगाव, ता. तुळजापूर, जि. धाराशिव) असे आत्महत्या केलेल्या तरूणीचे नाव आहे. कल्पना बोचरे या बारामती येथील एका महाविद्यालयात बी कॉमच्या दुसऱ्या वर्गात शिक्षण घेत होत्या. ५ नोव्हेंबर रोजी रात्री ११ च्या सुमारास राहत्या घरी असताना कल्पना बोचरे हिने अभ्यासाच्या टेंन्शनमुळे तणावातून पिकावर फवारणी करण्याचे कीटकनाशक औषध प्राशन केले. त्यामुळे कल्पनाला त्रास होऊ लागल्याने मामा कृषणा यांनी उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉ. ओंकार तलकोकुल यांनी घोषित केले.


## कळंब नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक - २०२५

### मतदान केंद्रनिहाय मतदान यादी प्रसिध्दी सुचना

या सुचनेद्वारे कळंब शहरातील सर्व नागरीकांना कळविण्यात येते की, कळंब नगर परिषदेची सार्वत्रिक निवडणूक-२०२५ कामी मा. राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र राज्य यांच्या आदेशाद्वारे मतदार यादीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आलेला होता. त्यानुषंगाने आज दिनांक ०७/११/२०२५ रोजी मतदान केंद्र निहाय मतदार यादी प्रसिध्द करणेकरीता मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य यांचे निर्देशानुसार मतदान केंद्र निहाय मतदार यादी प्रसिध्द करण्यात येत आहे. सदर मतदान केंद्र निहाय मतदार यादी नगर परिषदेचे अधिकृत संकेतस्थळ : https:mahaulb.in/MahaULB/index-home आणि नगर परिषद कळंब कार्यालयात पाहणीसाठी उपलब्ध राहील. सदर वेबसाईटवरुन मतदार यादी डाऊनलोड करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

**ठिकाण : कळंब**
**दिनांक : ०७/११/२०२५**

**सही/-**
**मुख्याधिकारी,**
**नगर परिषद कळंब**

## खरेदीपुर्व जाहीर नोटीस

तमाम जनतेस डी. सोलापूर, सब डी व ता. बार्शी येथील व आसपास भागातील रहिवाशी यांना या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन :- डी. सोलापूर सब.डी.व ता. बार्शीपैकी शहर बार्शी म्यु. पल हद्दीतील मौजे नाईकवाडी प्लॉट, परंडा रोड, १०० फुटी रस्त्या जवळ असलेला आर.सी.सी. बंगा त्याचा सर्वे नं. ४१७/१ब४ याचा जुना गट सर्वे नं. ९१८ व नवीन गट क्र. ९२४ यातील पूर्वेकडील प्लॉट क्रमांक ५ याचे एकूण क्षेत्र १६५० चौ.फुट १५३.२८७ व १५३.२८७ व १.५३२८ आर चौ.मी. यास याचे चतु:सिमा पूर्व-प्लॉट नं-१६ श्री गायकवाड यांचे घर, दक्षिणेस-प्लॉट नं- ६ श्री गांधी, पश्चिमेस-सदर प्लॉट नं. ५ पैकी उर्वरित क्षेत्र १६५० चौ. मी. उत्तरेस- अंतर्गत रस्ता २० फुट येणेप्रमाणे चतु:सिमेतील आतील बांधकाम असलेला बंगला व त्यातील सर्व फर्निचर सह व वहिवाटीच्या हक्कासह व या जागेची पाणी, वागणूक उत्तर बाजूने आहे. आतील सर्व तदंगभूत वस्तु हक्कासह येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत ही समीना अस्लम शेख रा. नाईकवाडी प्लॉट, बार्शी जी. सोलापूर यांच्या मालकीची कब्जे वहिवाटीची असून त्यांनी आमचे अशीलास कायमखुश खरेदी देण्याचे ठरवून ईसार अन्वये इसारा पोटी रक्कम घेतलेली आहे. समीना अस्लम शेख यांनी सदरची मिळकत ही निर्वेध निर्जोखमि व बिनबोजाची असल्याबाबत आमचे अशिलास खात्री दिली आहे.

सबब या जाहिर नोटिसिने तमाम जनतेस कळविण्यात येते की, ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ८ दिवसाच्या आत वर नमूद मिळकतीबाबत कोणाचे काही हक्क, अधिकार, पोटगी, भाडेपट्टा, करारनामा, इसारपावती, कुलमुखत्यार, साठेखत, खरेदीखत, बक्षीसपत्र, मृत्यूपत्र, गहाणखत, बँक प्रकरण, चोळी-बांगडी ई. काही व्यवहार असल्यास मुदतीत आवश्यक त्या सर्व कागदपत्रासह खाली नमूद पत्त्यावर सक्षम भेटून खात्री करून पटवून घ्यावी. मुदतीत कोणाची काही तक्रार न आल्यास सदरची मिळकत निर्वेध निजोखमी व बिनबोजाची आहे असे समजून ग्रहित धरून आमचे अशील खरेदीबाबतचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाची काही एक तक्रार चालणार नाही म्हणून ही जाहीर नोटीस प्रसिद्ध केली आहे.

**ही जाहीर नोटीस दिली तारीख - ०६/११/२०२५**

**सही/-**

**सही/-**
**अॅड. अक्षय ना. बिडबाग**
जिल्हा व अति. सत्र न्यायालय, बार्शी
Reg.No. MAH/8545/2021
Adv.Code-2765(M-7972788123)

## जाहीर प्रसिद्धीकरण

दि. कि. अ. नं. ११०/२०२५
पुढील नेमली ता. १३/११/२०२५
नि.नं.६

बार्शी येथील मा. दिवाणी न्यायाधिश सो. कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
(मे. एच.यु.यु.पाटील सो यांचे कोर्टात)

चंद्रकांत कल्याण आरगडे, वय ३१ वर्ष- अर्जदार
धंदा. शेती, रा. तावडी, ता. बार्शी
जि. सोलापूर
विरूध्द
कोणी नाही ...सा.वाला

ज्याअर्थी अर्जदार हे वर नमूद ठिकाणचा रहिवासी असून त्याचे कल्याण लक्ष्मण आरगडे हे वडिल होते तर लिलावती कल्याण आरगडे ही आई होती. सदर अर्जदाराचे वडिल कल्याण लक्ष्मण आरगडे हे दि. ६/४/२०२१ रोजी मौजे तावडी ता. बार्शी येथे मयत झालेले असून अर्जदाराची आई लिलावती कल्याण आरगडे या दि. ६/८/२०२१ रोजी श्रीराम हॉस्पीटल बार्शी येथे उपचारादरम्यान मयत झालेली आहे. मयत कल्याण लक्ष्मण आरगडे व लिलावती कल्याण आरगडे यांना यातील अर्जदार हेच एकमेव कायदेशीर वारस असून अर्जदाराशिवाय मयतास अन्य कोणतीही कायदेशीर वारस नाही अर्जदारास त्यांचे कायदेशीर अडचणीचे निवारणाकरीता अर्जदारास कायदेशीर वारस असलेबाबत वारस/हेअरशिप प्रमाणपत्राची गरज भासलेली आहे. सदर वारस/हेअरशिप अर्जदाराकडे नसलेले अर्जदारास अनेक कायदेशीर अडचणीस सामोरे जावे लागत आहे असे कथन करून अर्जदाराने वारस/हेअरशिप प्रमाणपत्राची मागणी केली आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रसिद्धीकरणाने कळविण्यात येते की, अर्जदारांचे वर नमूद मागणी संबंधाने, कथनासंबंधाने वा अन्य कोणाचे कांही कायदेशीर हक्क हितसंबंध, आक्षेप असलेस वा मयतास अन्य कोणी वारस असलेस संबंधीतानी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसाचे आत अथवा पुढील नेमले ता. १३/११/२०२५ रोजी मे. कोर्टात स्वतः वा माहितगार अॅडव्होकेट मार्फत हजर होवून आपले म्हणणे, हरकती, तक्रारी लेखी स्वरूपात सादर करावयात. मुदतीत कोणाचेही तक्रारी, हरकती न आल्यास प्रकरणी मे. कोटाचे पुढील योग्य ते हुकुम होतील. हे जाहीर प्रसिद्धीकरण आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिद्ध केले असे ता. १७/१०/२०२५

**वरिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय, क. स्तर, बार्शी

**सही**
**सहा. अधिक्षक**
दिवाणी न्यायालय क. स्तर, बार्शी

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः शहर सोलापूर, तालुका उत्तर सोलापूर येथील तसेच आजूबाजूच्या परिसरातील लोकांना आमच्या अशिलांनी दिलेल्या माहिती व कागदपत्रावरून या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

डि।। व सब डि।। सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिका ग.व.सु. हद्दीतील **पेठ-शास्त्री नगर क झोपडपट्टी** या नावाने ओळखल्या जाणाऱ्या नगरातील झोपडी घर नं. १७२ ही मिळकत घरजागा आमचे अशिल **१) शशिकांत वसंत कटकधोंड, २) विजय वसंत कटकधोंड** यांचे मयत वडिल **कै. वसंत रखमाजी कटकधोंड** यांचे नावावर असून याची नोंद सोलापूर महानगरपालिकेच्या ग.व.सु. विभागाचे कर आकारणी विभागास नोंद आह. तसेच आमचे अशिलांचे वडील **कै. यशोदा रखमाजी कटकधोंड** यांच दि. २४/०७/२०१७ रोजी मृत्यु झालेला आहे व तसेच त्यांचे आई **यशोदा वसंत कटकधोंड** हिचेही दि. २५/११/२०२२ रोजी मृत्यु झालेला आहे. या दोघांचे मृत्युपश्चात वर नमुद आमचे दोघे अशिल वारस आहेत. त्यांचेशिवाय अन्य कोणीही वारस नाही.

सदरहू घरजागेत आमचे अशिल १) शशिकांत वसंत कटकधोंड, २) विजय वसंत कटकधोंड हे दोघेच कायमस्वरूपी राहणेस आहेत. सदरहू घर नं. १७२ शास्त्रीनगर क झोपडपट्टी या मिळकतीवरील आमचे अशिलाचे वडिल कै. वसंत रखमाजी कटकधोंड यांचे नाव कमी करून अशिल **१) शशिकांत वसंत कटकधोंड, २) विजय वसंत कटकधोंड** यांचे नावाची वारस नोंद करणेकामी सो.म.पा.चे कर आकारणी ग.व.सु. विभागाचे दप्तरी वारस नोंद होऊन त्यांचे नावे कर पावती मिळावे याकरिता आमचे अशिल म.न.पा.कडे अर्ज दाखल करणार आहेत.

तरी सदरहू घरजागेवर आमचे अशिला व्यतिरिक्त इतर कोणाचाही कुठल्याही प्रकारचे हक्क व अधिकार असेल अथवा इतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध, गहाण, दान, बक्षिस, लीज, करार. मदार, टाच, जप्ती, बोजा, पोटगी, बक्षिसपत्र, खरेदीखत अगर इतर हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसाचे आत मुदतीत कोणाचेही कसलेही हरकत व तक्रार न आल्यास ही घरजागा निर्वेध, निजोखमी असू समजून आमचे अशिल त्यांचे नावाची वारस नोंद करून घेतील व त्यानंतर कोणाचेही व कसल्याही प्रकारचे तक्रार व हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**ही जाहीर नोटीस दिली तारीख - ६/११/२०२५**

**सही/-**
**ढेकणे एस. एम. (अॅडव्होकेट)**
रा. १२६-अे वाणी गल्ली बाळे,
ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर
(अशिलातर्फे अॅडव्होकेट)

## सावधानतेची जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः मौजे भोसरे, ता. माढा, जि. सोलापूर येथील व परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

अ) डि. सोलापूर सब डि. व ता. माढा पैकी भोसरे येथील बिनशेती मिळकत गट नंबर ४७/५/९ क्षेत्र ०० हे. ०२.७८.५६ आर चौ.मी. आकार ०२ रू. ८० पैसे ही मिळकत आमचे अशिलांचे पती व वडील उमेश विठ्ठल शेळके व त्यांचे भाऊ उदय विठ्ठल शेळके यांनी एकत्र कुटुंबाच्या उत्पन्नातून खरेदीखत दस्त क्रमांक २११६/२००५ अन्वये सामाईकात खरेदी केलेली आहे. त्यानंतर उदय विठ्ठल शेळके यांनी त्यांचे हिश्याची दक्षिणेकडील संपूर्ण मिळकत त्यांचा मुलगा आदित्य उदय शेळके याचे नावे बक्षीसपत्र दस्त क्रमांक ३५१९/२०१८ अन्वये दिनांक १९/०७/२०१८ रोजी केलेली आहे. बक्षीसपत्र करून देणार यांचे नाव कमी करणे क्रमप्राप्त असताना देखील गट नंबर ४७/५/९ मधील उर्वरीत क्षेत्रावर आमचे अशिलांचे नावाबरोबर उदय विठ्ठल शेळके यांचे नावाची नोंद पोकळ स्वरूपात राहिलेली आहे. तसेच दरम्यानचे कालावधीत आमचे अशिलांचे पती व वडील उमेश शेळके हे मयत झालेनंतर त्यांचे वारसदार म्हणून आमचे अशिलांचे नावाची नोंद सदर क्षेत्रावर झालेली आहे.

तसेच ब) मौजे भोसरे, ता. माढा, जि. सोलापूर येथील बिनशेती गट नंबर ४७/५/२ क्षेत्र ०० हे. ०२.७८.७३ आर चौ.मी. आकार ०५ रू. ६० पैसे ही मिळकत आमचे अशिलांचे सासरे व आजोबा विठ्ठल त्रिंबक शेळके यांचे नावे असून सदरची मिळकत ही एकत्र कुटुंबाचे उत्पन्नातून विठ्ठल त्रिंबक शेळके यांचे नावे खरेदी केलेली आहे. सदर मिळकतीमध्ये आमचे अशिलांचे पती व वडीलांनी तसेच सासरे व दिर यांनी एकत्रात २ बीएचके घराचे आर.सी.सी बांधकाम केलेले असून सदर घरामध्ये आमचे अशिल व त्यांचे सासू, सासरे व दिर एकत्रात राहण्यास आहेत.

सदर वर नमूद दोन्ही मिळकतींमध्ये आमचे अशिलांचा कायदेशीर अविभक्त हक्क हिस्सा असून सदर मिळकतीचे अद्याप सरस निरस मानाने वाटप विभाजन झालेले नाही. असे असताना सदर उदय विठ्ठल शेळके हे बेकायदेशीरपणे त्यांचे नाव वर कलम अ मध्ये नमूद केलेल्या मिळकतीचे ७/१२ पत्रकी असलेला गैरफायदा घेऊन तसेच वर कलम ब मध्ये नमूद केलेल्या मिळकतीमधील आमचे अशिलांचा कायदेशीर हक्क हिस्सा डावलण्याच्या उद्देशाने विठ्ठल त्रिंबक शेळके हे उदय शेळके याचेशी संगनमत करून सदर मिळकतीमधील क्षेत्र व घर विक्री हस्तांतर करण्याच्या प्रयत्नात असून तशी आमचे अशिलांना धमकी दिलेली आहे. यापूर्वी कुटुंबाच्या उत्पन्नातून मौजे चौभेपिंपरी, ता. माढा येथील आमचे अशिलांचे सासरे यांचे नावे खरेदी केलेली मिळकत आमचे अशिलांचे परस्पर विक्री करून विल्हेवाट लावलेली आहे. आमचे अशिल हे वर नमूद मिळकतीमधील त्यांचा असणारा कायदेशीर हक्क हिस्सा वाटून विभागून मिळणेसाठी योग्य त्या न्यायालयात कायदेशीर दाद मागणार आहेत. तसेच एम.आय.डी.सी. कुर्डूवाडी येथील प्लॉट बाबत देखील वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता दिवाणी न्यायालयात वाद प्रलंबित आहे.

तरी या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, वर नमूद मिळकतीबाबत उदय विठ्ठल शेळके व विठ्ठल त्रिंबक शेळके यांचेसोबत कोणीही साठेखत, खरेदीखत, गहाण, दान, बक्षीसपत्र, लीज, लीन, भाडेकरार, बटईपत्र, नोटरी दस्त, ईसारपावती या अथवा तत्सम स्वरूपाचा कोणत्याही प्रकारचा दस्त नोंदविण्यात येवू नये तसेच कोणत्याही वित्तीय संस्थेने, खाजगी सावकाराने, बँकेने वर नमूद मिळकतीवर कर्ज देऊ नये. याउपरही कोणी तसा व्यवहार केलेस तो मुलतः रद्दबातल ठरणार असून तो आमचे अशिलांचे वर नमूद मिळकतीमधील कायदेशीर हक्कांवर मुळीच बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली असे. तारीख - ०६/११/२०२५

**सही/-**
**अशिलातर्फे अॅडव्होकेट धनाजी पी. बागल**
बी.एस.एल.एल.एल.बी
ऑफीस महात्मा फुले शॉपिंग सेंटर गाळा नं. ११
गांधी चौक, कुर्डुवाडी ता. माढा. जि. सोलापूर
मो-९८९०६१६८६५

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः शहर बार्शी व ता. बार्शी, जि. सोलापूर येथील आसपासचे परिसरातील लोकांना कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन-डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी बार्शी शहर नगरपरिषद हद्दीतील वि.क्र. ३९ मधील मिळकत याचा तपशील:- **जुना गट नं. ९१३, याचा नवीन गट नं. ९१९/१ यापैकी गुंठेवारी निमाधीन झालेला प्लॉट नं. १०**, याचे एकूण क्षेत्रफळ हे. १६५.०० चौ. मी. **यापैकी दक्षिण बाजूचा प्लॉट याचे क्षेत्रफळ हे. ९२.९३ चौ. मी.** आहे असा खुला प्लॉट. **यासी चतु:सीमा पूर्वेस** :- ०६.०० मी रूंदीचा रस्ता, दक्षिणेस :- ०६.०० मी रूंदीचा रस्ता, **पश्चिमेस** :- प्लॉट नं. ११, **उत्तरेस** :- प्लॉट नं. १० पैकी उर्वरित प्लॉट क्षेत्र, येणे प्रमाणे चतु:सीमा पूर्वक खुला प्लॉट, जाणेयेणे साठी रस्ता व पाणी वागणूक जागेच्या **पूर्व आणि दक्षिण** बाजूच्या रस्त्याने जाते व आहे. येणे प्रमाणे तदंगभूत वस्तू हक्कासह खुला प्लॉट.

सदर प्लॉट हा **सौ. सुनिता नवनाथ पायघन** यांच्या खरेदी मालकीचा असून प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीस आहे व सदर प्लॉटच्या ७/१२ हक्कापत्रकी त्यांच्या नावाची नोंद आहे. सदरचा प्लॉट ते विक्री करू इच्छितात, **गुंठेवारी निमाधीन** प्लॉट विक्री निघाले बाबत आमचे अशिलास समजलेने आमच्या अशिलाने योग्य ती किंमत देऊ केलेने **सौ. सुनिता नवनाथ पायघन** यांनी सदरचा गुंठेवारी निमाधीन प्लॉट विक्री करणे बाबतचा करार आमच्या अशीलाशी केला. त्या व्यवहारापोटी आमच्या अशिलाकडून साक्षीदारासमक्ष इसार रक्कम स्वीकारली आहे, व खरेदीखत करून देण्याचा व्यवहार आमच्या अशील बरोबर ठरविला आहे.

सदर खुला प्लॉटवर कोणाचेही कसलेही हक्क, हितसंबंध, लीज, दान, गहाण, टाच, बोजा, अशाप्रकारे हक्क, हितसंबधं असल्यास सदरची **नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ दिवसाचे आत** आमचे वकिलांना खाली दिलेल्या पत्त्यावरती प्रत्यक्ष भेटून कागदोपत्री पुराव्यानिशी आपला हक्क शाबित करावा, अन्यथा मुदतीनंतर आमचे अशील कोणाची कसलीही हरकत नाही असे गृहीत धरून खुला प्लॉट/मिळकत बिनबोजाची, क्लिअर टायटल आहे असे गृहीत धरून सदर मिळकत/खुला प्लॉट खरेदी करतील. खरेदी नंतर कोणाची कसलेही हरकत आलेस आमचे अशीलाच्या हक्कावर व अधिकारावर ती बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये या करिता खरेदीपूर्वक जाहीर नोटीस दिली.

**ता. ०६/११/२०२५**

**सही/-**
**अॅड. कुलदिप संजय क्षीरसागर**
ऑफिस पत्ता :- गाळा नं. ५१, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉम्लेक्स, बार्शी. ता. बार्शी, जि. सोलापूर
(अशिलातर्फे अॅडव्होकेट)


## सोलापूर विमानतळ परिसरात

# पतंगबाजी, लेझर लाईट, हॅलोजन वापरण्यास मज्जाव

**सोलापूर :** सोलापूर विमानतळ परिसरात पतंगबाजी, लेझर लाईट, हॅलोजन वापरण्यास तसेच मांसाहाराचे वेस्टेज टाकण्यास पोलिस आयुक्तालयाकडून मज्जाव करण्यात आला आहे. असे करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचा इशारा पोलिस आयुक्तालयाकडून देण्यात आला आहे. विमानतळ परिसरात कोणीही पतंगबाजी अथवा पतंग उडवणार नाही, लेझर लाईट शारपी लाईट अथवा हवेतील हॅलोजन प्रकाश ज्योत टाकणारे लाईट वापरण्यास बंदी आहे. तसेच विमानतळ संरक्षक भिंतीवरून कोणीही आत जाणार नाही. विमानतळ परिसरातील मटण विक्रेते यांच्या दुकानातील वेस्टेज विमानतळ संरक्षक भिंती लगत टाकताना आढळून आल्यास कडक कारवाई करून दुकानचा परवाना कायमस्वरूपी रद्द करण्यात येईल. विमानतळ परिसरातील घरावर किंवा उंच जागेवर कोणत्याही प्रकारचा झेंडा अथवा पताका लावू नये.


## टी. सी. हरवली आहे

कान्होपात्रा उत्तमराव पोले या नावाची टी.सी.हरवली आहे. चाकूर येथून अहमदपूरकडे दि. २८ ऑक्टोंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता बसने अहमदपूरकडे प्रवास करीत असताना संत गोविंदबाबा विद्यालय, लातूर रोडची कान्होपात्रा उत्तमराव पोले या नावाची टि.सी. व इतर शैक्षणिक साहित्य हरवले आहेत. टि. सी. व कागदपत्रे सापडल्यास खालील मोबाईल नंबरवर संपर्क करावा. **कान्होपात्रा उत्तमराव पोले ८४५९७७९६५९**

## सोलापुर महानगरपालिका, सोलापुर

**''इंद्रभुवन'' पुण्यश्लोक अप्पासाहेब वारद पथ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, रेल्वे लाईन्स, सोलापुर - ४१३ ००१**

### जाहिर प्रसिध्दीकरण

सोलापुर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात स्मार्ट सिटी अंतर्गत होम मैदान लगत स्ट्रीट बाजार ची जागा ''Ready to Eat Food Stall'' स्थापनेसाठी ०३ वर्षे कालावधीसाठी भाडेतत्वावर देण्यात येणार आहे. सदर जागा भाड्याने देण्यासाठी ऑफलाइन लिलाव प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. तरी इच्छुकांनी लिलाव प्रक्रियेत सहभाग नोंदवावे.

**अटी व शर्ती (संक्षिप्त):**

१. सदर ठिकाणी एकुण ४५ स्टॉल्स करिता ऑफलाईन लिलाव प्रक्रिया राबविण्यात येत असुन त्यापैकी ०३ स्टॉल्स हे दिव्यांगाकरिता राखीव ठेवण्यात येत आहे.
२. सदर ठिकाणी १५ चौ. मी. स्टॉलकरिता प्रति महिना र.रु.१,५०९/- व ०९ चौ.मी. स्टॉलकरिता प्रति महिना र.रु.९०५/- इतके भाडे निश्चित केले आहे.
३. इच्छुकांनी प्रवेश फी र.रु.२०००/- मनपाच्या कॅश विभागात दि. १४/११/२०२५ अखेर दुपारी १.०० वाजेपर्यंत भरणा करणे आवश्यक आहे.
४. ऑफलाईन लिलाव प्रक्रिया दि. १७/११/२०२५ रोजी होम मैदान स्ट्रीट बाजार येथे सकाळी ११.०० वाजता घेण्यात येणार आहे.
५. लिलाव प्रक्रिया हि प्रत्यक्ष उपस्थितीत पार पाडणार असल्याने येताना ओळखपत्र (आधार/पॅन) ची छायांकित प्रत सोबत आणणे आवश्यक आहे.
६. सर्वोच्च बोली लावणारा पात्र उमेदवार म्हणून निवडला जाईल.
७. निवड झालेल्या बोलीदाराने निश्चित मुदतीत अनामत रक्कम भरुन करारनामा पूर्ण करणे आवश्यक राहील.
८. जागेचा वापर फक्त Ready to Eat Food Stall या हेतूसाठीच करता येईल.
९. मनपाला कोणत्याही कारणास्तव लिलाव रद्द करण्याचा अधिकार राहील.
१०. संपूर्ण अटी व शर्तीची माहिती मनपा कार्यालयात उपलब्ध आहे.

**सही/-**
**(आशिष सुमन सुधाकरराव लोकरे)**
**उपायुक्त तथा नियंत्रण अधिकारी**
**भुमी व मालमत्ता कार्यालय, सो.म.पा.**

## जामश्री रिअलटी लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय : फतेहचंद दमाणी नगर, स्टेशन रोड, सोलापूर, महाराष्ट्र – 413 001 सीआयएन : L17111PN1907PLC000258
दूरध्वनी : 91 22 43152424 इमेल आयडी: jammill1907@gmail.com वेबसाइट: www.jamshri.in

**30 सप्टेंबर 2025 रोजी संपलेल्या तिमाही आणि अर्धवर्षाच्या कालावधी करीता अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्षाचे विवरण** (रु. लाख EPS सोडून)

| अ. क्र. | तपशील | संपलेली तिमाही | | | संपलेल अर्धवर्ष | | संपलेल वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 30.09.2025 (अलेखापरिक्षित) | 30.06.2025 (अलेखापरिक्षित) | 30.09.2024 (अलेखापरिक्षित) | 30.09.2025 (अलेखापरिक्षित) | 30.09.2024 (अलेखापरिक्षित) | 31.03.2025 (लेखापरिक्षित) |
| 1 | एकूण महसूल उत्पन्न | 225.36 | 229.63 | 212.78 | 454.99 | 473.32 | 905.46 |
| 2 | कर आणि अपवादात्मक बाबीं पूर्वीच्या अखंडित परिचलना करीता कालावधीसाठी नफा/(तोटा) | (3.31) | 14.82 | (66.91) | 11.51 | (61.14) | (136.92) |
| 3 | कर आणि अपवादात्मक बाबीं पश्च्यात अखंडित परिचलना करीता कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) | (3.31) | 14.82 | (34.48) | 11.51 | (28.71) | (104.50) |
| 4 | कर पश्चात खंडित परिचलना करीता कालावधीसाठी निव्वळ नफा/ (तोटा) | (4.62) | (5.82) | (4.86) | (10.44) | (9.68) | (19.30) |
| 5 | कर पश्च्यात खंडित परिचलना करीता कालावधीसाठी निव्वळ नफा /(तोटा) | (4.62) | (5.82) | (4.86) | (10.44) | (9.68) | (19.30) |
| 6 | कालावधीसाठी एकूण व्यापक उत्पन्न (समावेश नफा / (तोटा) (करपश्च्यात) कालावधीसाठी आणि इतर व्यापक उत्पन ( करपश्च्यात)) | (7.93) | 9.00 | (39.34) | 1.07 | (38.39) | (111.64) |
| 7 | समभाग भांडवल | 698.65 | 698.65 | 698.65 | 698.65 | 698.65 | 698.65 |
| | प्रति समभाग प्राप्ती प्रत्येकी रु 10/ अखंडित परिचलना करीता मूलभूत व सौम्यिकृत | | | | | | |
| | प्रति शेअर कमाई प्रति समभाग प्राप्ती प्रत्येकी रु 10/- | (0.05) | 0.21 | (0.49) | 0.16 | (0.41) | (1.50) |
| | खंडित परिचलना करीता मूलभूत व सौम्यिकृत प्रति शेअर कमाई | (0.07) | (0.08) | (0.07) | (0.15) | (0.14) | (0.28) |

टिप :अ) उक्त अलेखापरीक्षित आर्थिक निष्कर्षाचा लेखापरीक्षक समितीने आढावा घेतला आहे संचालक मंडळाने त्यांच्या नोव्हेंबर 05, 2025 रोजी घेण्यात आलेल्या सभेत त्यांला मंजूरी दिली आहे.
ब) उक्त निष्कर्ष कंपन्या (इंडियन अकाउंटिंग स्टँडर्डस्) नियम, 2015 सुधारीत असल्याप्रमाणे आणि अधिधिनयमाच्या इतर संबंधित तरतूदींसह वाचाव्याच्या कंपन्या अधिनियम, 2013 च्या कलम 133 च्या अनुषंगाने कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने अधिसूचीत केल्याप्रमाणे इंडियन अकाउंटिंग स्टँडर्डस् (आयएनडी) नुसार तयार करण्यात आलेले आहेत.
क) 30 सप्टेंबर 2025 रोजी संपलेल्या तिमाही आणि अर्ध वर्षाचा आर्थिक निष्कर्षाच्या बीएसईकडे दाखल केलेल्या सविस्तर प्रारुपाचा उक्त एक उतारा आहे. संपूर्ण प्रारुप बीएसईची वेबसाइट www.bseindia.com आणि कंपनीची वेबसाइट www.jamshri.in वर उपलब्ध आहे.

तारीख: **05.11.2025**
ठिकाण : सोलापूर

**जामश्री रिअलटी लिमिटेड करीता**
**सही**
**राजेश दामाणी**
**संयुक्त व्यवस्थापकीय संचालक**

## ट्रूहोम फायनान्स लिमिटेड

**(पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात )**

**नोंदणीकृत कार्यालय:** श्रीनिवास टॉवर, पहिला मजला, दरवाजा क्र.५,जुना क्र.११दुसरी लेन, सेनाटोफ रोड, अलवरपेट, तेनमपेट, चेन्नई-६०००१८
**मुख्य कार्यालय.** लेव्हल ३, वोक्हार्ट टॉवर्स, ईस्ट विंग सी-२ ब्लॉक,वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
**वेबसाइट:** www.truhomefinance.in

### भौतिक ताबा सूचना

जसे की, निम्नस्वाक्षरीदार हे हे ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)प्राधिकृत अधिकारी आहेत आणि सिक्युरिटायझेशन अॅण्ड रिकन्स्ट्रकशन ऑफ फिनान्शिअल अॅसेट्स अॅण्ड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इन्टेरेस्ट अॅक्ट, २००२ च्या (उक्त कायदा ) तरतुदींच्या अंतर्गत आणि उक्त कायद्याचे कलम १३(१२) सहवाचिता सिक्युरिटी इन्टेरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स , २००२ ( उक्त नियम ) नियम ३ यांद्वारे मिळालेल्या अधिकारांचा वापर करून त्यांनी कर्जदार/सह-कर्जदार/तारणकर्ता यांना ज्यांचे तपशील खालील कोष्टकात नमूद करण्यात आले आहेत, उक्त मागणी सूचनेत नमूद केलेल्या रक्कमेची परतफेड करण्यासाठी मागणी सूचना जारी केली होती.

कर्जदारांनी रक्कम परतफेड करण्यात अयशस्वी झाल्यामुळे, कर्जदारांना आणि सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येत आहे की अधिकृत अधिकारी ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वी श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड) यांनी सदर कायद्याच्या कलम १३(४) आणि नियम ८ अंतर्गत दिलेल्या अधिकारांचा वापर करून येथे वर्णन केलेल्या मालमत्तेचा ०५/११/२०२५ रोजी भौतिक ताबा घेतला आहे.

कर्जदाराला विशेषतः आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे मालमत्तेशी व्यवहार करू नये अशी ताकीद देण्यात येत आहे आणि मालमत्तेशी संबंधित कोणताही व्यवहार ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वी श्रीराम हाऊसिंग फायनान्स लि) कडून येथे नमूद केलेल्यारकमेसाठी व्याजासह शुल्क आकारला जाईल.कर्जदाराचे लक्ष कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (८) च्या तरतुदींकडे आकर्षित केले जाते, उपलब्ध वेळेनुसार, सुरक्षित मालमत्ता परत मिळविण्यासाठी.

**कर्जदाराचे नाव व पत्ता**

**1. श्री. स्वप्नील नागनाथ गायकवाड**
**2. श्री नागनाथ विठ्ठल गायकवाड,**
**3. श्रीमती माया नागनाथ गायकवाड**
**सर्वांचा रहिवासी पत्ता असलेला पत्ता: प्लॉट क्र. 33, सर्व्हे क्र. 355/1/D/1, वाखरी, वाल्मिकी नगर, सूर्योदय इंग्रजी माध्यम शाळेजवळ, ता. पंढरपूर, सोलापूर, जि. सोलापूर, महाराष्ट्र–४१३३०४ तसेच येथे: आर/ओ एटी: पोहरगाव, झेडपी जवळ. शाळा, ता. पंढरपूर, सोलापूर, जि. सोलापूर, महाराष्ट्र – ४१३३०४**

**थकबाकी रक्कम**

मागणी सूचना दिनांक: २४.०८.२०२३.
दिनांक ०९/०८/२०२३ रोजी कर्ज खाते क्र. SHLHSOLR0000320 अंतर्गत रु.२६,८०,५१६/- (रुपये सव्वीस लाख ऐंशी हजार पाचशे सोळा फक्त) आणि पुढील व्याज आणि इतर खर्च, शुल्क आणि खर्चासह.

**मालमत्तेचे वर्णन**

ग्रामपंचायत घर मालमत्ता क्रमांक १८०८ असलेल्या स्थावर मालमत्तेचा तो सर्व तुकडा आणि भूखंड क्रमांक ३३ ची जमीन सुमारे १५२८.०० चौ. फूट क्षेत्रफळ असलेली जमीन, म्हणजेच/ १४२.८६ चौ. मीटर, सर्व्हे क्रमांक ३५५/१/डी/१/३३, मौजे वाखरी, ता. पंढरपूर, जि. सोलापूर, उपनिबंधक यांच्या हद्दीत सोलापूर, जि. सोलापूर – ४१३३०४
आणि त्याची सीमा खालीलप्रमाणे आहे: उत्तरेकडे:- रस्ता, दक्षिणेकडे:- गट क्रमांक ३५५/अ/४/२, पूर्वेकडे:- प्लॉट क्रमांक ३२, पश्चिमेकडे:- प्लॉट क्रमांक ३३

ठिकाण - पंढरपूर
दिनांक: ०५.११.२०२५

स्वाक्षरी /- प्राधिकृत अधिकारी
ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात )

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# भारताचा ऑस्ट्रेलियावर दणदणीत विजय

### चौथा टी-२० आंतरराष्ट्रीय सामना ● मालिकेत २-१ अशी आघाडी

◆ **कॅरारा, ६ नोव्हेंबर**

गुरुवारी येथे खेळल्या गेलेल्या चुरशीच्या चौथ्या टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यात भारतीय गोलंदाज- डावखुरा फिरकी गोलंदाज अक्षर पटेल, वॉशिंग्टन सुंदर आणि मध्यम गती गोलंदाज शिवम दुबेने आपल्या कौशल्याची चुणूक दाखवित ऑस्ट्रेलियावर ४८ धावांनी रोमहर्षक विजय नोंदविला.

या विजयाबरोबरच भारताने पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेत २-१ अशी आघाडी घेतली. आता मालिकेतील पाचवा आणि अंतिम टी-२० सामना शनिवारी ब्रिस्बेन येथे खेळविला जाणार आहे.

ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून भारताला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केले व २० षटकांत ८ बाद १६७ धावांवर रोखले. विजयासाठी १६८ धावांचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाला भारतीय गोलंदाजांनी आपला हिसका दाखविला व त्यांना लक्ष्य गाठण्याआधीच १८.२ षटकांत ११९ धावांतच गुंडाळले.

अभिषेक शर्मा (२१ चेंडूत २८) व शुभमन गिलने (३९ चेंडूत ४६) पहिल्या गड्यासाठी ५६ धावांची भागीदारी केली.




महत्त्वपूर्ण दोन बळी टिपणाऱ्या अक्षर पटेलचे अभिनंदन करताना सूर्यकुमार यादव, जितेश शर्मा, बुमराह व शिवम दुबे

ॲडम झम्पाचा सामना करण्यासाठी तिसऱ्या क्रमांकावर बढती मिळालेला शिवम दुबे (१८ चेंडूत २२) मोठा प्रभाव पाडू शकला नाही, तर कर्णधार सूर्यकुमार यादव (१० चेंडूत २०) दोन षट्कार मारून बाद झाला.

वेगवान गोलंदाज नॅथन एलिस (४ षटकांत २१ धावांत ३ बळी) हा ऑस्ट्रेलियन गोलंदाजांचा पर्याय होता, त्याने आपल्या वैविध्यपूर्ण गोलंदाजी शैलीचा वापर केला. झॅम्पाने आपल्या चार षटकांत ४५ धावा दिल्या, पण त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे त्याने धोकादायक अभिषेकसह तीन बळी घेतले. अभिषेकने झॅम्पाच्या गोलंदाजीवर जास्तीत जास्त धावा काढल्या. डावखुरा वेगवान गोलंदाज बेन द्वारशुइसच्या दुसऱ्या चेंडूवर अभिषेक बाद होऊ शकला असता, पण झेव्हियर बार्टलेटने संधी गमावली.

अभिषेकचा मित्र आणि सलामीचा जोडीदार शुभमन गिल या मालिकेत अद्याप प्रभाव पाडू शकलेला नाही. त्याला त्याच्या धावांसाठी कठोर परिश्रम करावे लागले. त्याने मार्कस स्टोयनिसला जबरदस्त फटका मारून काही दबाव कमी केला आणि नंतर एलिसच्या हळूवार चेंडूला बळी पडला. त्यानंतर विकेट पडत राहिल्या, त्यामुळे डावाचा प्रवाह खराब झाला. अक्षर पटेलने (११ चेंडूत नाबाद २१) शेवटच्या दिशेने आवश्यक चौकार मारले आणि एकूण धावसंख्या १६० च्या पुढे नेली. शेवटच्या पाच षटकांत भारताने ४२ धावांत चार फलंदाज गमावले.

विजयासाठी धावांचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाने सावधपणे सुरुवात केली. सलामीवीर मिचेल मार्श (३०) व मॅथ्यू शॉर्टने (२५) पहिल्या गड्यासाठी ३७ धावांची भागीदारी केली, परंतु त्यानंतर भारतीय गोलंदाजांनी नियमित अंतराने ऑस्ट्रेलियन फलंदाजांना तंबूत परत पाठविले. सलामी जोडीसह जोश इंग्लिस (१२), टिम डेव्हिड (१४), जोश फिलिप (१०) व मार्कस स्टोयनिस (१७) तेवढे दोन अंकी धावा काढू शकले, परंतु इतर फलंदाज एक अंकी किंवा शून्यावरच बाद झाले व याबरोबरच ऑस्ट्रेलियाचा संपूर्ण संघ १८.२ षटकांत ११९ धावात गारद झाला. भारताकडून वॉशिंग्टन सुंदरने ३ बळी, अक्षर पटेल व शिवम दुबेने प्रत्येकी २ बळी, तर अर्शदीप सिंग, जसप्रीत बुमराह व वरुण चक्रवर्तीने प्रत्येकी १ बळी टिपला. ◂(वृत्तसंस्था)



गुरुवारी नवी दिल्लीतील राष्ट्रपती भवनात वन-डे विश्वचषक विजेत्या महिला क्रिकेट संघासोबत राष्ट्रपदी द्रौपदी मुर्मू

# विश्वविजेत्या महिला क्रिकेटपटूंनी राष्ट्रपती मुर्मू यांना दिली जर्सी भेट

◆ **नवी दिल्ली, ६ नोव्हेंबर**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी गुरुवारी राष्ट्रपती भवनात विश्वचषक विजेत्या भारतीय महिला क्रिकेट संघाची भेट घेतली, यावेळी कर्णधार हरमनप्रीत कौरने त्यांना सर्व खेळाडूंनी स्वाक्षरी केलेली संघाची जर्सी भेट दिली.

नवी मुंबई येथे रविवारी झालेल्या महिला वन-डे विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेचा ५२ धावांनी पराभव करून भारताने महिला क्रिकेटमध्ये पहिले जागतिक विजेतेपद पटकावले.

राष्ट्रपती मुर्मू यांनी संघाचे त्यांच्या ऐतिहासिक कामगिरीबद्दल अभिनंदन केले, असे सांगत खेळाडूंनी केवळ इतिहास घडविला नाही, तर तरुण पिढीसमोर आदर्श सुद्धा निर्माण केला आहे. भारतीय महिला क्रिकेट संघ हा भारताचे प्रतिबिंब आहे. ते वेगवेगळ्या प्रदेशांचे, वेगवेगळ्या सामाजिक पार्श्वभूमींचे, वेगवेगळ्या परिस्थितींचे प्रतिनिधित्व करतात, पण ते एकच संघ आहेत, असे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू म्हणाल्या. संवादादरम्यान, कर्णधार हरमनप्रीत कौरने राष्ट्रपतींना विश्वचषक ट्रॉफी देखील सादर केली. या संघाने बुधवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली होती. ◂(वृत्तसंस्था)

### भारतीय खेळांसाठी महत्त्वाचा क्षण : अमोल मुझुमदार



हरमनप्रीत कौर आणि तिच्या संघाचे पहिले विश्वचषक विजेतेपद हे केवळ देशातील क्रिकेटसाठी एक महत्त्वाचा टप्पा नाही, तर भारतीय खेळांसाठी एक महत्त्वाचा क्षण आहे, असे महिला संघाचे मुख्य प्रशिक्षक अमोल मुझुमदार यांनी म्हटले आहे. गत आठवड्यात नवी मुंबईत दक्षिण आफ्रिकेवर ५२ धावांनी विजय मिळवून भारतीय महिला क्रिकेट संघाने आपला पहिला विश्वचषक विजेतेपद पटकावला आणि देशाच्या क्रीडा इतिहासात एक सुवर्ण अध्याय लिहिला. या विजयाचे वर्णन भारतातील महिला क्रिकेटसाठी एक महत्त्वाचा क्षण म्हणून केले जाते, जो पुरुष संघाच्या १९८३ च्या विश्वचषक विजयाशी समांतर आहे.१९८३ च्या क्षणाबद्दल बोलताना, मला वाटते की हा महिला विश्वचषक केवळ भारतीय पुरुष आणि महिला क्रिकेटसाठीच नव्हे, तर भारतीय खेळांसाठी एक महत्त्वाचा क्षण असावा, असे मुझुमदार यांनी सांगितले.

## महत्त्वाचे

### विदित गुजरातीचा फॉस्टिनो ओरोवर विजय

**पणजी** : भारताचा ग्रॅण्डमास्टर विदित गुजरातीने दुसऱ्या जलद डावामध्ये अर्जेंटिनाच्या १२ वर्षीय फॉस्टिनो ओरोचा बचाव मोडून काढण्यात यश मिळवले, तर प्रणव व्ही. आणि प्रणेश एम. यांनीही गुरुवारी येथे झालेल्या फिडे विश्वचषक २०२५ बुद्धिबळ स्पर्धेच्या तिसऱ्या फेरीत आपापल्या प्रतिस्पर्ध्यांवर मात करून तिसऱ्या फेरीत प्रवेश केला. ३१ वर्षीय विदितने १२ वर्षीय ओरोवर दुसऱ्या जलद डावांत ५२ चालींमध्ये विजय मिळविला. प्रणवने नॉर्वेच्या आर्यन तारीचा पराभव केला, तर प्रणेशने जर्मनीच्या दिमित्रीज कोलार्सचा पराभव करून पुढील फेरीत विश्वविजेत्या गुकेश डी, अर्जुन एरिगासी, पी. हरिकृष्णा, कार्तिक वेंकटरमन आणि दिप्तयन घोष यांच्यासोबत सहभागी झाला. फॉस्टिनोविरुद्ध खेळणे आव्हानात्मक होते. हा सामना सोपा नव्हता, परंतु विजय मिळविला. पुढील फेरीसाठी पात्र होणे चांगले वाटते, असे विदित म्हणाला. फॉस्टिनोची बुद्धिबळ खेळण्याची पद्धत खूप वेगळी आहे, कारण तो संगणकांसह खेळात तरबेज झाला आहे. मागील पिढीपेक्षा त्यांच्याकडे खूप जास्त अनुभव आहे, असे तो म्हणाला.



### सायव्हर-ब्रंटला पहिले स्थान देण्याचा निर्णय हरमनप्रीतचा

**नवी दिल्ली** : दोन वेळा वूमेन्स प्रीमियर लीग विजेत्या मुंबई इंडियन्सकडून (एमआय) नेहमीच हरमनप्रीत कौर आणि नॅट सायव्हर-ब्रंट सारख्या खेळाडूंना कायम ठेवण्याची अपेक्षा होती, परंतु भारतीय कर्णधाराच्या आधी इंग्लंडच्या कर्णधाराचे नाव पहिल्या रिटेन्शन निवडीमध्ये असल्याने अनेकांना आश्चर्य वाटले. शिवाय, २०२५ च्या वर्ल्ड प्रीमियर लीगमध्ये प्लेअर ऑफ द टूर्नामेंटचा सन्मान जिंकणारी अष्टपैलू नॅटला कर्णधार हरमनप्रीतपेक्षा जास्त किमतीत (३.५ कोटी रुपये) राखण्यात आले आहे, त्याची रिटेन्शन रक्कम २.५ कोटी रुपये आहे. महिला एकदिवसीय विश्वचषक विजेत्या कर्णधार हरमनप्रीतने मुंबई इंडियन्स रिटेन्शन यादीत नॅटला पहिले स्थान देण्याचा निर्णय अलिकडेच घेतला होता. हरमनप्रीत २०२६ साठी एक उत्तम संघ असण्यावर लक्ष केंद्रित करू इच्छिते आणि यामुळेच, तिने निर्णय घेतला की नॅट ही एमआयची पहिली रिटेन केलेली खेळाडू असेल तर ती फ्रॅन्चायझीसाठी दुसरी निवड असेल, असे सूत्रांनी सांगितले. नॅट आणि हरमनप्रीतनंतर मुंबई इंडियन्सने वेस्ट इंडीजची कर्णधार हेली मॅथ्यूज, तसेच भारताची अष्टपैलू अमनजोत कौर आणि अनकॅप्ड यष्टिरक्षक-फलंदाज जी. कमलिनी यांना कायम ठेवले आहे, त्यांनी या वर्षी १९ महिला २० विश्वचषक जिंकला आणि २०२५ च्या हंगामात सर्वांना प्रभावित केले.

### आमदार चषक बुद्धिबळ स्पर्धा रविवारी

**सोलापूर, दि. ६ नोव्हेंबर-**



अक्कलकोटचे लोकप्रिय आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन जगदीश मंगल कार्यालय येथे रविवार ९ नोव्हेंबरला केले आहे. ८, ९, १०, १३, १७, २५ व खुल्या गटात या स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले असून यात खेळाडूंना रोख बक्षीस व चषक मिळून २५ हजार रुपयांची बक्षीसे देण्यात येणार आहेत. या स्पर्धेचे आयोजन विकास नवनाथ कदम यांनी केले असून या स्पर्धेत जास्तीत जास्त खेळाडूंनी भाग घ्यावा, असे आवाहन सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशनचे सचिव शरद नाईक यांनी केले आहे

### सिद्धेश्वर कन्या प्रशालेच्या अनुष्का दीक्षितची राज्य कराटे स्पर्धेसाठी निवड

**सोलापूर, दि. ६ नोव्हेंबर-**



येथील सिद्धेश्वर कन्या प्रशालेच्या अनुष्का दीक्षितने बारामती येथे झालेल्या पुणे विभागीय शालेय कराटे स्पर्धेत १४ वर्षांखालील १८ ते २२ या वजनी गटातून अजिंक्यपद मिळविले. या कामगिरीवर तिची राज्य स्पर्धेसाठी निवड झाली. तिला क्रीडा शिक्षक गुरुसिद्ध होर्तीकर, प्रचिता जोगदंडे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे शालेय शिक्षण समितीचे चेअरमन धर्मराज काडादी, भीमाशंकरजी पटणे, गुरुराज माळगे, डॉ राजशेखर येळीकर, ॲड. रेवणसिद्ध पाटील, चनबसप्पा नाडगौडा, प्रभुराज मैंदर्गीकर, विलास कारभारी, पशुपतिनाथ माशाळ, समन्वयक संतोष पाटील, मुख्याध्यापिका संगीता गोटे, पर्यवेक्षिका सुनिता वाले यांनी अभिनंदन केले.

# रुद्रशक्ती गुरुकुलचे राज्य योंगमुडो स्पर्धेसाठी ९ विद्यार्थी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ नोव्हेंबर-**

जिल्हास्तरीय योंगमुडो निवड चाचणी स्पर्धेतून राज्य स्पर्धेसाठी रुद्रशक्ती गुरुकुलच्या ९ खेळाडूची निवड झाली. हे छत्रपती संभाजीनगर येथे १६ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या राज्य स्पर्धेत भाग घेतील. त्यांना मुख्य प्रशिक्षक विवेक मिस्कीन व योगीनाथ फुलारी यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे योंगमुडो असोसिएशन ऑफ महाराष्ट्राचे सचिव नागेश शेट्टीकर व महाराष्ट्र अध्यक्ष रोहित नारकर, सोलापूर अध्यक्ष अनिल विपत यांनी शुभेच्छा दिल्या.

**निवडलेले खेळाडू :** सोनाक्षी माडे, योगिता सरवदे, गौरी माळी, आदिती नल्ला, मान्यता रोहिटे, दुर्वा रोहिटे, ममता अलशेट्टी, वैभवी आळगुंडगी, वैभव माडे.





# इंग्लिश स्कूल वेळापूरला दुहेरी मुकुट

### शालेय जिल्हा खो-खो : पुणे विभागासाठी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. ६ नोव्हेंबर-**

शालेय जिल्हा खो-खो स्पर्धेत १९ वर्षांखालील मुले व मुलींच्या गटात वेळापूरच्या इंग्लिश स्कूलने विजेतेपद पटकावित दुहेरी मुकुट संपादिला.

वसुंधरा कला महाविद्यालय जुळे सोलापूर येथे झालेल्या स्पर्धेत त्यांनी ही कामगिरी केली. मुलींनी अंतीम सामन्यात सांगोला (शिवणे) संघावर १ डाव १२ गुणांनी दणदणीत विजय मिळविला. मुलांनी मंद्रूप संघाचा एक डाव सात गुणांनी पराभव केला. या कामगिरीवर दोन्ही संघाची इंदापूर (पळसदेव) येथे होणाऱ्या पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. संघास क्रीडा शिक्षक सतीश कदम, शिवाजी जाधव, प्रशिक्षक सोमनाथ बनसोडे, अर्धनारी नटेश्वर क्रिडा मंडळाचे अध्यक्ष जावेद मुलाणी, वेळापूरचे सरपंच रजनिश बनसोडे यांचे म ार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थेचे अध्यक्ष ॲड. सुजित कदम, उपाध्यक्ष डॉ. सुभाष कदम, संस्थेच्या संचालिका डॉ. मीनाक्षी कदम, सचिवा डॉ. प्रियदर्शनी महाडिक, संचालिका तेजस्विनी कदम, शाळा समिती चेअरमन प्रतापराव पाटील, प्राचार्य आर बी पवार, उपमुख्याध्यापक शिवशरण पठाण, पर्यवेक्षक बी. एस. सावळे यांनी अभिनंदन केले.

# टीम इंडियाची उपकर्णधार स्मृती मंधानाच्या घरी पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली भेट

**तभा वृत्तसेवा**
**सांगली, दि. ६ नोव्हेंबर-**



महिला विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात टीम इंडियाने दक्षिण आफ्रिकेला नमवत ऐतिहासिक विजय मिळवला. टीम इंडियाची उपकर्णधार आणि सांगलीची कन्या स्मृती मंधानाच्या घरी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री तथा पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी जाऊन तिच्या आई-वडिलांचे विशेष अभिनंदन केले. याप्रसंगी जिल्हाधिकारी अशोक काकडे देखील उपस्थित होते.

चंद्रकांत पाटील स्मृती मंधानाच्या वडिलांना म्हणाले, बाबा, स्मृती आणि तिच्या टीमने जी अतुलनीय कामगिरी केली, त्यामुळे प्रत्येक भारतीय अभिमान व्यक्त करत आहे. ह्या मुलींच्या कामगिरी मुळे ग्रामीण भागातील प्रत्येक मुलगी आकाशाला गवसणी घालेल, असा विश्वास यावेळी पाटील यांनी व्यक्त केला.

टीम इंडियाची उपकर्णधार आणि अनुभवी ओपनर स्मृती मानधना हिने संपूर्ण वर्ल्ड कप स्पर्धेत जबरदस्त सातत्य राखलं. तिने ९ मॅचेसमध्ये ५४.२५ च्या एव्हरेजने एकूण ४३४ रन्स केल्या आणि वर्ल्ड कपच्या एकाच एडिशनमध्ये सर्वाधिक रन्स करण्याचा मिताली राजचा भारतीय रेकॉर्ड मोडला. तिच्या परफॉर्मन्समध्ये १ सेंच्युरी आणि ४ फिफ्टींचा समावेश आहे. तिने प्रतिका रावलसोबत अनेक महत्त्वाच्या पार्टनरशिप्स केल्या. विशेषतः न्यूझीलंडविरुद्धच्या महत्त्वपूर्ण मॅचमध्ये तिने ९५ बॉलमध्ये १०९ धावांची शानदार सेंच्युरी ठोकली, ज्यामुळे टीम इंडियाने उपांत्य फेरीत प्रवेश केला. अंतिम मॅचमध्येही तिने ४५ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली.

# सोलापूरचा शोएब कुरेशी 'एनके श्री'चा मानकरी

## तीन जिल्ह्याच्या शरीरसौष्ठव स्पर्धेत स्पर्धकांचा उच्चांक

### बेस्ट पोझर हजरतअली शेख , मोस्ट इम्प्रुव्हड लातूरचा विनायक बसाने

**सोलापूर, दि. ६ नोव्हेंबर-**

सोलापूर, धाराशिव व लातूर जिल्हा मर्यादित शरीरसौष्ठव स्पर्धेत येथील शोएब कुरेशी एनके श्री चा मानकरी ठरला. सहा गटातील प्रथम विजेत्यामध्ये पुन्हा स्पर्धा झाली व यामध्ये शोएब सरस ठरला. त्याला २१ हजार, सन्मान चिन्ह व सन्मान पत्र देऊन गौरविण्यात आले. बेस्ट पोझरचा मान येथील हजरतअली शेख याने तर मोस्ट इम्प्रुव्हडचा मान लातूरच्या विनायक बसाने याने मिळविला.

नागेश करजगी युथ फाऊंडेशनच्या वतीने, सोलापूर जिल्हा शरीर सौष्ठव संघटनेच्या मान्यतेने यश करजगी यांच्या वाढदिवसानिमित्त ही स्पर्धा आयोजित केली होती. यात १३० खेळाडूंनी सहभाग नोंदविला आजपर्यंतच्या स्पर्धेमधील हा उच्चांक होता.

या स्पर्धेचे उद्घाटन कुमार करजगी, यशराज करजगी व सोलापूर जिल्हा संघटनेचे अध्यक्ष राजकुमार सुरवसे यांच्या हस्ते करण्यात आले. विविध ६ वजनी गटातून १ लाखांची रोख बक्षीसे देण्यात आली. प्रत्येक गटात ४, ३, अडीच व २ हजार, सन्मान चिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रमोद काटे, नजीर शेख, गोरख गडसिंग, शकील बडेघर, शरणकुमार कुंभार, शफी शेतसंदी व रतिकांत पाटील यांनी काम पाहिले.



बक्षीस वितरण किसन जाधव, अमोल शिंदे, बिजू प्रधाने व बाळासाहेब तोडकरी यांच्या हस्ते करण्यात आले. या स्पर्धा यशस्वी होण्यासाठी आरिफ मदवार यांनी परिश्रम घेतले.

**विविध वजनी गटाचे अंतिम निकाल (प्रथम चार)**

**५५ किलो :** काशिनाथ देवकते (होटगी), जमीर शेख (मोहोळ), तौफिक चांदा (सोलापूर), विकी राठोड (सोरेगाव).

**६० किलो :** निखिल कांबळे (अहमदपूर), फुरकान रजभरे ( सोलापूर),योगेश जाधव (बार्शी), आकाश वाघमारे (सोलापूर).

**६५ किलो :** विनायक बसाने (लातूर), रितेश फटफटवाले (सोलापूर), विलास बेलदार (मोहोळ), लक्ष्मण कंधारे (लातूर).

**७० किलो :** शहाबाद नदाफ (सोलापूर), नितेश चव्हाण (वेळापूर), हजरत अली शेख (सोलापूर), अमन शेख (करमाळा).

**७५ किलो :** साद रजानी (सोलापूर), अफ्रीद शेख (लातूर), निखिल चव्हाण, जावेद शेख (सोलापूर).

**७५ किलोवरील :** शोएब कुरेशी (सोलापूर), तेजस मुळे (लातूर),अक्षय काळे (सोलापूर), लक्ष सुरवसे (पंढरपूर).




# सोलापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनची हॅटट्रिक

### महाराष्ट्र क्रिकेट संघटनेकडून सलग तिसऱ्यांदा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ नोव्हेंबर-**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनने सोलापूर डिस्ट्रिक्ट क्रिकेट असोसिएशनचा सलग तिसऱ्यांदा सन्मान केला.

गेली सलग तीन वर्षे सोलापूर डिस्ट्रिक्ट क्रिकेट असोसिएशनने महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनकडून दिलेल्या सामन्यात, स्पर्धामध्ये उत्तम नियोजन केले होते. तसेच या वर्षी इंदिरा गांधी स्टेडियमचा विशेष करार, सोलापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनने केलेल्या नवनवीन योजना, तसेच महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे वरिष्ठ गट, १९, २३ मुला-मुलींचे सराव सामने यशस्वीरित्या घेतल्यामुळे महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या वार्षिक सभेमध्ये हा विशेष सत्कार करण्यात आला.

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष आमदार रोहीत पवार यांनी सोलापूरची विशेष प्रशंसा केली. कोल्हापूरचे माजी खासदार छत्रपती राजे संभाजी यांच्या हस्ते हा सत्कार करण्यात आला. यावेळी राज्य संघटनेचे सचिव कमलेश पिसाळ, अपेक्स कौन्सिल सदस्य श्री. बोबडे, चेअरमन सचिन मुळे, खजिनदार संजय बजाज, श्री. भांडारकर, श्री. वझे, अतुल गायकवाड, विनायक द्रविड, श्री. मुथा, सुहास पटवर्धन, सुशील शेवाळे, राजू काने,श्री.देशमुख, नीता कदम-कापरे आदी उपस्थित होते.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...

### श्रीराम सेना व प्रणीन फाउंडेशन यांच्या मार्फत १८ देशी गोवंशांना जीवनदान

**सोलापूर, दि. ६ नोव्हेंबर-**

श्रीराम सेना व प्रणीन फाउंडेशनच्या प्रयत्नातून १८ देशी गोवंशांना जीवनदान मिळाल्याचे वृत्त प्रसिध्दीस देण्यात आले आहे. मंगळवेढा पोलीस स्टेशनच्या हद्दीतील मंगळवेढा मरवडे रोडवरील पडवळे चहा कॅन्टीन पासून थोड्या अंतरावर ३ नोव्हेंबर रोजी रात्री ८ वाजताच्या दरम्यान श्रीराम सेना मोहोळ तालुका अध्यक्ष अमोल चौगुले यांना एक टाटा कंपनीच्या ९०९ हे वाहन क्रमांक घ.२८.इ.६३४३ या वाहनातून अवैधरित्या गोवंशाची क्रूरतेने, निर्दयतेने व अमानवीयतेने वाहतूक होत असल्याचा संशय आला. सदरील या टाटा कंपनीच्या चार चाकी वाहनाचा अमोल चौगुले यांनी तात्काळ पाठलाग सुरू करून सदरील गाडी मंगळवेढा मरवडे रोडवरील पडवळे चहा कॅन्टीन पासून काही अंतरावर अडविली. गाडीची पाहणी केली असता. वाहनामध्ये १४ नंदी(बैल) व ४ देशी गाई असे एकूण १८ देशी गोवंश होते. कुठल्याही प्रकारच्या चारा पाण्याची व्यवस्था न करता सोबत जनावरांच्या वाहतुकीचा परवाना नव्हता. गुरांच्या प्राथमिक औषधोपचारासाठी लागणारे मेडिकल किट न बाळगता अगदी दाटीवाटीने कोंबून गाडीतील गोवंशाला दोरखंडाने बांधलेले असल्याचे निदर्शनास आले. गोरक्षकांनी त्वरित महाराष्ट्र स्टेट कंट्रोल ११२ नंबरवर याची सविस्तर माहिती दिली. गाडीतील गुरांची एकंदरीत अवस्था पाहून अमोल चौगुले यांनी श्रीराम सेना सोलापूर जिल्हा अध्यक्ष शितल परदेशी यांना कॉल करून सदरील गाडीची माहिती कळविली. घटनास्थळावर मंगळवेढा पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी व कर्मचारी दाखल झाले. कायदेशीरित्या संबंधित प्रकरणातील अवैध गोवंश तस्करी करणारे हे वाहन मंगळवेढा पोलीस स्टेशनमध्ये आणून दाखल करण्यात आले. तसेच या वाहनातील १४ नंदी (बैल) व ४ देशी गाईंना मंद्रूप येथील श्रीकृष्ण गोशाळा येथे सुखरूपरीत्या सोडण्यात आले. या कारवाईत चालक सिद्धाराम बीरप्पा पुजारी यासोबत इतर तीन इसमावर गुन्हा नोंद करण्यात आला. या कारवाईत मंगळवेढा पोलीस स्टेशनचे पिसे व ठाणे अंमलदार रवींद्र बाबर यांचे सहकार्य लाभले. ही कारवाई यशस्वी करण्यासाठी श्रीराम सेना मोहोळ तालुका अध्यक्ष अमोल चौगुले, जिल्हाध्यक्ष शितल परदेशी व गोरक्षक प्रशांत परदेशी, अनिकेत गोरंट्याल, गणेश बिज्जरगी, शुभम फलमारी यांचे सहकार्य लाभले.



### राज्यस्तरीय सौंदर्यवती स्पर्धेत सांगोल्याची सायली कांबळे प्रथम

**सांगोला, दि. ६ नोव्हेंबर -**

दरवर्षी प्रमाणे विटा शहरात गवळी प्रतिष्ठानच्या वतीने विटा महोत्सवात विविध कार्यक्रमाबरोबरच राज्यस्तरीय सौंदर्यवती स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धेत सांगोल्यातील सायली कांबळे हिने प्रथम क्रमांक पटकावला. या स्पर्धेत ४० सौंदर्यवतींनी सहभाग नोंदवला होता. सदर स्पर्धेत सायली कांबळे हिची नीलम बाबर यांनी रंगभूषा व वेशभूषा केले होती. स्पर्धेत सायली कांबळे हिने उत्कृष्ट सादरीकरण करून प्रथम क्रमांकाचे सौंदर्यवती पारितोषिक ११ हजार रुपये व सन्मान चिन्ह प्राप्त केले. त्यांच्या यशाबद्दल आमदार सुरेश खाडे व गवळी प्रतिष्ठानचे अध्यक्ष नितीन गवळी यांचे हस्ते सन्मान करण्यात आला. सायली कांबळे ही मिशन हॉस्पिटल, मिरज येथे वैद्यकीय शिक्षण घेत असून सांगोला महाविद्यालयाचे प्रा.डॉ. विधीन कांबळे यांची ती कन्या आहे. सायली कांबळे आणि नीलम बाबर यांचे या यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे.

### पहाटे फिरण्यास गेलेल्याचा मोटार सायकलच्या धडकेत मृत्यू

**बार्शी, दि.६ नोव्हेंबर-**



बार्शी शहरातील परांडा रोडवर आज (दि. ६ नोव्हेंबर) पहाटेच्या सुमारास भरधाव मोटारसायकलने पाठीमागून दिलेल्या जोरदार धडकेत एकाचा जागीच मृत्यू झाला. मृताचे नाव संजय मारुती अनभुले (वय ५५, रा. नाईकवाडी प्लॉट, बार्शी) असे आहे. फिर्यादी विजय मारुती अनभुले (वय ५३) यांनी दिलेल्या माहितीनुसार, ते स्वतः महाराष्ट्र विद्यालय, बार्शी येथे नोकरीस असून, दररोज सकाळी भाऊ संजय अनभुले व मावस चुलते भास्कर डिसले यांच्यासह बार्शी-परांडा रोडवर वॉकसाठी जात असतात. आजही पहाटे पाचच्या सुमारास तिघेजण वॉकसाठी गेले होते. सकाळी सहा वाजताच्या दरम्यान परांडा रोडवरील पटेल यांच्या पॅरागॉन चप्पल शोरुमजवळ येताच, मागून भरधाव वेगात आलेल्या हिरो कंपनीच्या एच.एफ. डिलक्स ( एमएच १३ सीआर ८३६६) या मोटारसायकलने संजय अनभुले यांना जोरात धडक दिली. धडकेत ते रस्त्यावर कोसळले. विजय अनभुले व भास्कर डिसले यांनी तातडीने हॉस्पिटल येथे नेले, मात्र डॉक्टरांनी तपासून संजय अनभुले यांना मृत घोषित केले. अपघातानंतर नागरिकांनी मोटारसायकल व दोन्ही युवकांना पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले. मोटारसायकल चालवणाऱ्या युवकाचे नाव लहू पवार (वय १९, रा. इंद्रानगर, पारशीक खारेगाव, ठाणे) असे असून त्यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सुरु आहे. या घटनेमुळे बार्शी शहरात हळहळ व्यक्त होत आहे.

## निधन वृत्त...

### पद्मावती दोशी



**माळशिरस, दि. ६, नोव्हेंबर -**

येथील पद्मावती दोशी (वय ८८ वर्ष )यांचे निधन झाले . त्यांचे पाश्चात दोन मुले, तीन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे.त्या रासायनीक खताचे व्यापारी व हनुमान शिक्षण संस्थेचे व रामदेव देवस्थानचे सचिव रामभाऊ दोशी व भरत दोशी यांच्या मातोश्री होत्या.

### प्रसाद हरिदास



**पंढरपूर, दि. ६ नोव्हेंबर -**

येथील प्रसिद्ध छायाचित्रकार प्रसाद उर्फ कान्हा हरिभाऊ हरिदास (वय-३४) यांचे बुधवारी (ता.५) हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी, एक मुलगी, दोन बहिणी असा परिवार आहे. एक उत्तम छायाचित्रकाराचे अकाली निधन झाल्यामुळे मोठी हळहळ व्यक्त होत आहे.

# द्राक्ष बागांवर 'न भुतो न भविष्यती' संकट!

### जिल्ह्यातील बागायतदार शेतकरी संकटात

**तभा वृत्तसेवा । अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि. ६ नोव्हेंबर-**



नैसर्गिक संकटांमुळे द्राक्ष पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नाशिकच्या निफाड तालुक्यातील काही शेतकऱ्यांनी आपल्या द्राक्षाच्या बागांवर कुऱ्हाडीचे घाव घालून ती वैतागाने उद्ध्वस्त केल्याचे ज्वलंत उदाहरण आहे. नाशिक विभागात ८० टक्के द्राक्ष बागांचे यंदा नुकसान झाले असून, पुणे विभागातही यंदा अतिवृष्टीमुळेच ५० टक्केच्यावर आताच नुकसान झाल्याने द्राक्ष बागायतदार जाम वैतागले असून, यंदा 'न भुतो न भविष्यती' संकट आल्याची खंतही काही शेतकऱ्यांनी आज (दि. ६) दैनिक तरूण भारतशी संवाद साधताना व्यक्त केली.

नाशिकप्रमाणेच पुणे विभागात विशेषतः सोलापूर जिल्ह्यातही या नैसर्गिक संकटांमुळे झालेल्या नुकसानीमुळे बळीराजा हवालदिल झाला आहे. ऑक्टोबरच्या द्राक्ष छाटणीनंतर आता नेमकी प्लॉवरिंग स्टेज आणि घड निर्मितीची प्रक्रिया सुरु होती. परतीचा पाऊस सारखाच कोसळत असल्याने शेतकरी बांधवांनी पोटच्या लेकराप्रमाणे जपलेल्या द्राक्षाची मुळे सडून गेली, घड गळून जात आहेत. सूर्यप्रकाश नसल्यामुळे फलधारणा झाली नाही आणि त्यामुळेच द्राक्ष बागेवरती काही जणांनी कुऱ्हाडीचे घाव घालून आपला संताप व्यक्त केला. हे सध्याचे भीषण वास्तव आहे. या बागांवर लाखो रुपये खर्च करूनही हाती काहीच न लागल्याने अनेकजण बागा मोडण्याचे टोकाचे निर्णय घेवू लागले आहेत. यामुळे महाराष्ट्रातील कृषी संकटाचा आणि शेतकऱ्यांच्या हतबलतेचा मुद्दा पुन्हा एकदा समोर आला आहे. सोलापूर जिल्ह्यात बदललेल्या हवामानामुळे द्राक्ष उत्पादक शेतकरी मोठ्या चिंतेत आहेत. पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील काही भागात अवकाळी पाऊस आणि सकाळी पडणाऱ्या दाट धुक्यामुळे द्राक्ष बागांवर दुहेरी संकट ओढवले आहे. 'बदलत्या हवामानामुळे द्राक्ष बागांवरती बुरशीजन्य आजारांचा प्रादुर्भाव देखील वाढला आहे,' ज्यामुळे शेतकऱ्यांच्या अडचणीत आणखी भर पडली आहे.

या बुरशीजन्य रोगांपासून द्राक्षांचे संरक्षण करण्यासाठी शेतकऱ्यांना अतिरिक्त औषधांची फवारणी करावी लागत आहे. यामुळे त्यांच्या उत्पादन खर्चात मोठी वाढ झाली आहे. एकीकडे अवकाळी पावसाचा थेट फटका आणि दुसरीकडे रोगांचा वाढता प्रादुर्भाव, या दुहेरी संकटामुळे द्राक्ष उत्पादक शेतकरी हवालदिल झाला असून, मोठ्या आर्थिक नुकसानीच्या भीतीने ग्रासला आहे. यामुळे द्राक्ष बागायदार शेतकऱ्यांचा शासन स्तरावर विचार करून त्यांना मदतीचा हात द्यावा, अशी अपेक्षा द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांची आहे.

**कसं सोसावं हे सारं...!**

माझ्यासह अनेक मोठ्या शेतकऱ्यांच्या २० ते ४० एकराच्या आसपास द्राक्ष बागा आहेत. छोट्या-छोट्या कंपन्या चालविल्याप्रमाणे या बागात आमच्याकडे कामगार काम करतात. या कामगारांचा पगार, बागांवरील फवारण्या, आंतरमशागती, खते आदींवर सारखाच लाखांवर खर्च होतो. गत महिन्यात बागांच्या छाटण्या केल्या. किमान नोव्हेंबरमध्ये तरी पाऊस थांबेल...अशी आशा होती मात्र सारख्या पडणाऱ्या पावसाने प्लॉवरिंग स्टेज आणि घडांचे मोठे नुकसान केले आहे. आताच ५० टक्के बागांचे नुकसान झाले आहे. भविष्यात हाती काय लागते का नाही? याची टांगती तलवार आहे...यामुळे कसं सोसावं हे सारं....अशीच आमची द्राक्ष बागायदारांची अवस्था झाली आहे.

**- हनुमंत गवळी, संचालक, द्राक्ष बागायतदार संघ (पुणे विभाग)**

## मंगळवेढा-पंढरपूर मधील विमा प्रलंबित मागण्यांवर सकारात्मक निर्णय : आ.समाधान आवताडे

**तभा वृतसेवा,**
**मंगळवेढा, दि.६ नोव्हेंबर -**



जिल्ह्यातील नैसर्गिक आपत्ती व काढणी पश्चात नुकसान झालेल्या खरीप हंगामातील पिकांच्या प्रधानमंत्री पीक विमा योजना अंतर्गत विमा कंपनी आणि प्रशासनाने शेतकऱ्यांना जास्तीत जास्त विमा लाभ मिळवून द्यावा अशी सूचना आ. समाधान आवताडे यांनी केली.

शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाई बाबत तक्रार निवारण करण्याच्या उद्देशाने तसेच प्रलंबित प्रश्नांबाबत मंत्रालयात बैठक पार पडली. सदर बैठकीस कृषी विभागाचे अप्पर मुख्य सचिव विकास चंद्र रस्तोगी, अव्वर सचिव श्रीकांत जांभवडेकर, कृषी उपसंचालक शांत धनवडे, ओरिएंट इन्शुरन्स कंपनीचे राज्य व्यवस्थापक विनायक दीक्षित, शेतकरी प्रतिनिधी सरोज काझी इतर अधिकारी वर्ग उपस्थित होते.

२०२३ च्या खरीप हंगामात मंगळवेढा-पंढरपूर मतदार संघातील ४२ हजार ४६० शेतकऱ्यांनी ८३ हजार ९१ विमा अर्ज भरले होते. त्यापैकी ४६ हजार ४४६ शेतकऱ्यांना १६ कोटी २६ लाख नुकसान भरपाई मिळाली. परंतु याच हंगामातील ४ हजार ५०३ शेतकऱ्यांचे ५ कोटी ७१ लाख रुपयांचे विमा दावे नाकारण्यात आले. अद्यापही पीक विमा निधी शेतकऱ्यांना मिळाला नाही. कंपनीचे म्हणणे अयोग्य असून शेतकऱ्यांना मदत गरजेची आहे.

नैसर्गिक आपत्ती नुकसान आणि काढणी पश्चात नोंदी केलेल्या सर्वच शेतकऱ्यांना पिकविम्याचा लाभ मिळाला पाहिजे. कंपनी प्रतिनिधी अथवा सर्व्हेयर यांनी प्रत्यक्ष पाहणी करणे आवश्यक होते. ज्या भागात पर्जन्यमान कमी दाखविले त्या भागात प्रत्यक्ष पाहणी केली असून शेतकऱ्यांची मागणी रास्त असल्याचे आ.आवताडे म्हणाले.

## कार्तिकी यात्रेत तब्बल सहा लाख भाविकांनी घेतले मुख आणि पदस्पर्श दर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.६ नोव्हेंबर -**

कार्तिकी यात्रेच्या काळात सुमारे २ लाख ५४ हजार ५३५ भाविकांनी पदस्पर्श दर्शन तर ३ लाख ३७ हजार ३३४ भाविकांनी मुखदर्शन असे एकुण ५ लाख ९१ हजार ८६९ भाविकांनी विठुरायाच्या दर्शनाचा लाभ घेतल्याची माहिती मंदिर समितीचे व्यवस्थापक पृथ्वीराज राऊत यांनी दिली.

**कार्तिकी यात्रा २०२५ दरम्यान एकूण ११ दिवसांच्या कालावधीत भाविकांची खालीलप्रमाणे नोंद**

पदस्पर्शदर्शन भाविक संख्या : २ लाख ५४ हजार ५३५, मुखदर्शन भाविक संख्या : ३ लाख ३७ हजार ३३४, एकूण दर्शन घेतलेले भाविक : ५ लाख ९१ हजार ८६९ श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समितीच्या नियोजनबद्ध व्यवस्थापनामुळे व प्रशासनच्या मदतीने यात्रा यशस्वीपणे पार पडली अशी माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.



श्री क्षेत्र पंढरपूर येथे दरवर्षीप्रमाणे यंदा कार्तिकी यात्रा २०२५ मोठ्या उत्साहात पार पडली. यात्रेच्या कालावधीत श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समितीच्या वतीने भाविकांच्या सोयीसाठी विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या.भाविकांच्या सेवेसाठी चहा व पाणी वाटप केंद्रे, उपवास खिचडी वाटप, लाइव्ह दर्शन व्यवस्था, डिजिटल सूचना फलक व बोर्ड, सुरक्षेसाठी सीसीटीव्ही कॅमेरे, दर्शन रांगेत सुरक्षा रक्षकांची नेमणूक, तसेच वैद्यकीय सुविधा अशा सर्व सोयी-सुविधांचा समावेश होता.या सर्व सोयींमुळे भाविकांनी अत्यंत आनंदाने आणि समाधानाने श्री विठ्ठल व श्री रुक्मिणी मातांचे दर्शन घेतले अशी माहिती प्रभारी व्यवस्थापक पृथ्वीराज राऊत यांनी दिली.



## उर्वरित विकासकामांसाठी भाजपमध्ये

**विक्रमसिंह शिंदे : भाजप आपल्याला नवीन नाही; कन्हेरगांव गावभेट दौऱ्याप्रसंगी प्रतिपादन**

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि.६ नोव्हेबर-**

माढा तालुक्यातील ऊर्वरीत विकासकामे मार्गी लावण्यासाठी भाजप मध्ये गेलो आहोत.दादांच्या माध्यमातून राहिलेली विकासकामे पूर्ण करण्याचा मानस असल्याचे प्रतिपादन माजी सभापती विक्रमसिंह शिंदे यांनी केले.

कन्हेरगांव (ता.माढा) येथे गावभेट दौऱ्याप्रसंगी ते बोलत होते. ते म्हणाले की, माजी आ.दादांनी राज्यात शिवसेना-भाजप युतीचे सरकार असताना शासनाच्या बरोबर जाण्याचा निर्णय घेऊन भीमा-सीना प्रकल्प मंजूर करून तालुक्यातील विकासाला चालना दिली. या माध्यमातून तालुक्यात हजारो एकर शेती बागायत झाली. अनेक विकास कामे मार्गी लागली होती. यामुळे भाजप आपल्याला नवीन नाही असे त्यांनी सांगितले.

यावेळी उपसरपंच लिंबाजी मोरे, विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्याचे संचालक शिवाजी डोके, कन्हेरगांवचे माजी उपसरपंच धनंजय मोरे, अकोले खुर्द येथील संभाजी उर्फ गोटू पाटील, सरपंच श्रीकांत बनसोडे, माजी चेअरमन नागेश मोरे, सोमनाथ कदम, दादासाहेब खोचरे, रामलिंग खोचरे, हनुमंत पाटील, ग्रामपंचायत सदस्य बाळासाहेब पाटील, योगेश खोचरे, गणेश माने, समाधान चव्हाण, दशरथ चव्हाण, तुषार काशीद, रतिलाल केदार, सचिन माने, जोतीराम भरगंडे, रावसाहेब डोके, नागेश माने, सोमनाथ लोखंडे , अमोल मोरे, धनाजी माने, आप्पासाहेब कोळी, प्रकाश माने, शिवाजी पाटील, विलास कदम, महादेव मोरे, वैजनाथ चव्हाण, किरण खोचरे, बिभीषण मोरे, विशाल पवार, शंभूराजे डोके उपस्थित होते.

यावेळी उपसरपंच लिंबाजी मोरे व संचालक शिवाजी डोके यांच्या हस्ते शिंदे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी कन्हेरगांवचे माजी उपसरपंच धनंजय मोरे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा. हनुमंत पाटील यांनी आभार मानले. यावेळी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सांगोला नगरपरिषद निवडणुकीसाठी ३३ हजार ६९८ मतदार

**निवडणूक निर्णय अधिकारी संतोष कणसे यांची माहिती**



**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.६ नोव्हेंबर -**

सांगोला नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी एकूण मतदार संख्या ३३ हजार ६९८ असून यामध्ये स्त्री मतदार संख्या १६ हजार ८३८, पुरुष मतदार संख्या १६ हजार ८५८ व इतर २ अशी असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार संतोष कणसे यांनी दिली. सांगोला नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक - २०२५ अनुषंगाने तालुकास्तरीय अधिकारी, राजकीय प्रतिनिधी व पत्रकार बांधव यांची बैठक पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर सभागृह येथे संपन्न झाली. यावेळी सहा.निवडणूक निर्णय अधिकारी तथा मुख्याधिकारी डॉ. सुधीर गवळी, सहा.निवडणूक निर्णय अधिकारी तथा नायब तहसीलदार सोमनाथ साळुंखे, सांगोला पोलीस निरीक्षक विनोद घुगे, नगरपरिषदचे कार्यालयीन अधीक्षक सचिन पाडे उपस्थित होते.

नामनिर्देशन पत्र राज्य निवडणूक आयोगाच्या वेबसाईटवर भरण्याचा कालावधी दि.१० ते १७ नोव्हेंबर (दु.२ पर्यंत), नामनिर्देशन पत्रे स्वीकारण्याचा कालावधी दि.१० ते १७ नोव्हेंबर (दु.३ पर्यंत) रविवार या सुट्टीच्या दिवशी नाम निर्देशन पत्र स्वीकारण्यात येणार नाहीत.

नामनिर्देशन पत्राची छाननी व वैदरीत्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्याचा दि.१८ नोव्हेंबर स.११ वाजेपासून, नामनिर्देशन पत्रे मागे घेण्याचा अंतिम दिनांक अपील नसेल तेथे दि.१९ ते २१ नोव्हेंबर दु.३ वाजेपर्यंत, अपील असल्यास दि.२५ नोव्हेंबर पर्यंत, निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा तसेच अंतिमरीत्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्याचा दि.२६ नोव्हेंबर, मतदानाचा दि.२ डिसेंबर स.७.३० पासून ते सायं.५.३० पर्यंत, मतमोजणी व निकाल जाहीर करण्याचा दि.३ डिसेंबर स.१० वाजल्यापासून, शासन राजपत्रात निकाल प्रसिद्ध करणे दि.१० डिसेंबर पूर्वी कलम १९ मधील तरतुदीनुसार अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी संतोष कणसे यांनी दिली. यावेळी निवडणूक विषयक आचारसंहिते बाबत मार्गदर्शन करून लोकसभा, विधानसभा प्रमाणे सांगोला नगरपालिका या निवडणुका शांततेत पार पाडाव्यात असे आवाहन सांगोला पोलीस निरीक्षक विनोद घुगे यांनी केले.

एकूण मतदान केंद्र संख्या ४० आहे. तसेच खर्च मर्यादा थेट नगराध्यक्ष यांच्यासाठी ७ लाख ५० हजार तर सदस्य यांच्यासाठी २ लाख ५० हजार इतकी आहे. आचार संहिता कालावधी हा दि.४ नोव्हेंबर ते ३ डिसेंबर असून, जाहीर प्रचार कालावधी हा दि.२७ ते ३० नोव्हेंबर पर्यंत आहे. जाहीर प्रचाराची ठिकाणे छत्रपती शिवाजी महाराज चौक, नेहरू चौक, जय भवानी चौक, महात्मा फुले चौक, न्यू इंग्लिश स्कूल मैदान ही आहेत.

**- डॉ.सुधीर गवळी, सहा.निवडणूक निर्णय अधिकारी**

## डॉ. रेवती कामत आणि आरती कुंडलकर यांच्या शास्त्रीय संगीत मैफिलीने पंढरपूरकर तृप्त

**नादब्रह्म कला फाऊंडेशन आणि आरती मंडप मनमाडकर परिवार यांचे वतीने आयोजन**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.६ नोव्हेंबर -**





अभिजात भारतीय शास्त्रीय संगीताचा प्रचार आणि प्रसारासाठी नादब्रह्म कला फाऊंडेशन करकंब आणि आरती मंडप मनमाडकर परिवार यांचे वतीने आयोजित करण्यात आलेल्या डॉ. रेवती कामत आणि आरती कुंडलकर यांच्या सुश्राव्य अभिजात शास्त्रीय संगीताच्या मैफिलीला पंढरपूरकरांचा उत्तम प्रतिसाद मिळाला.

सुरुवातीला आरती कुंडलकर, डॉ. रेवती कामत, सुयोग कुंडलकर,संजय देशपांडे, डॉ.अनिल जोशी, शुभांगी जोशी, डॉ.विनय भोपटकर, भगवान भाऊ मनमाडकर,शुभांगी मनमाडकर, ज्ञानेश्वर दुधाणे, रामदास रोंगे, डॉ.प्रसाद कुलकर्णी यांचे हस्ते विठूरायाच्या प्रतिमेचे पूजन आणि दीपप्रज्वलन करण्यात आले. प्रास्ताविक ज्ञानेश्वर दुधाणे यांनी करत त्रैमासिक संगीत मैफिलीचा उद्देश सांगत पण पं.शौनक अभिषेकी यांच्या मार्गदर्शनाखाली तरंगिणी सांस्कृतिक प्रतिष्ठान पुणे यांचे वतीने मार्च २०२६ मध्ये पं.जितेंद्र अभिषेकी संगीत महोत्सव होणार असल्याचे सांगितले. त्यानंतर प्रथम सत्रात डॉ.रेवती कामत यांच्या गायनाने मैफिलीला सुरूवात केली. त्यांनी राग बिहागडा विलंबित तीनतालात सादर करत रसिकांना मंत्रमुग्ध केले. नंतर बंदिश,तराणा आणि तुकाराम महाराजांचा अभंग सादर केला. त्यानंतर द्वितीय सत्रामध्ये आरती ठाकूर -कुंडलकर यांच्या गायनाला सुरुवात झाली त्यांनी सुरुवातीला राग मधुकंस विलंबित ऐकताला मध्ये आए री शाम सुंदरवा सादर करत राग जनसमोहिनी मधील मत्त तालातील बंदिश आणि डॉ प्रभाताई अत्रे यांच्या अजरामर कलावती मधील बंदिशी तन मन धन तोपे वारु, सादर करत सुखा लागी करीशी तळमळ ,अभंग सादर करत सादर करत विठूरायाच्या गजराने भैरवी सादर केली. यावेळी आरती कुंडलकर यांनी आपल्या स्वरांनी गुरु डॉ प्रभाताई अत्रे यांची क्षणाक्षणाला आठवण करुन देत मैफिल रंगवत कार्यक्रमाची सांगता केली. त्यांना तितकीच सुंदर आणि उठावदार साथसंगत हार्मोनियम - सुयोग कुंडलकर, तबला- संजय देशपांडे, पखवाज- ज्ञानेश्वर दुधाणे, टाळ - माऊली खरात आणि तानपुरा- पारुल पारमार यांनी करत कार्यक्रमाला रंगत आणली. यावेळी पंढरपूर आणि पंचक्रोशीतील कलासाधक कलाप्रेमी आणि कला रसिक श्रोत्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा आस्वाद घेतला. कार्यक्रम अगदी वेळेवर सुरू केला आणि पुढेही अशाच पध्दतीने वेळेवर कार्यक्रम सुरू करावा सांगत कार्यक्रम आयोजकांच्या वतीने यशस्वी केला. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन आरती मनमाडकर यांनी करत राजेश खिस्ते यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ज्ञानेश्वर दुधाणे, धनंजय मनमाडकर, ज्ञानेश्वर खरात, डॉ.अनिल जोशी शुभांगी जोशी, निलेश सावळे, माधुरी सावळे यांनी परिश्रम घेत कार्यक्रम यशस्वी केला.

## महत्वाचे...



### महादेव मंदिरात मैत्रेय क्लबतर्फे दीपोत्सव

**सोलापूर, दि. ६ नोव्हेंबर-**

मैत्रेय क्लबतर्फे महादेव मंदिर परिसरात आनंदात दीपोत्सव दी.५ नोव्हेंबर रोजी महादेव नगर श्रीशैल नगर जुळे सोलापूर येथे साजरा करण्यात आला. मंदिर परिसर दिव्यांच्या प्रकाशाने उजळून निघाला होता. या वेळी अनेक भक्तांनी उपस्थित राहून भगवान महादेवाच्या चरणी दीपप्रज्वलन केले. कार्यक्रमाची सुरुवात महादेव पूजनाने झाली. त्यानंतर सर्व सदस्य आणि नागरिकांनी एकत्र येऊन मंदिर परिसरात दिवे लावले. दीपोत्सवाच्या निमित्ताने समाजात एकता, शांतता आणि सकारात्मकतेचा संदेश देण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन मैत्रेय क्लबच्या सदस्यांनी मोठ्या उत्साहाने केले. क्लबचे पदाधिकारी यांनी सांगितले की, ''दीपोत्सव हा फक्त प्रकाशाचा नव्हे, तर सेवा, श्रद्धा आणि संस्कृतीचा उत्सव आहे. कार्यक्रमाला मान्यवर वैजिनाथ हत्तुरे, सुरेश कामशेट्टी सोलापूर मैत्रेय क्लब चे संचालक सुधाकर कामशेट्टी नीलकंठ पटणे नवनाथ गुरव चिदानंद पटणे अंकुश माळी नरेंद्र कामशेट्टी अशोक पाटणे आणि नागरिक, महिला, युवा वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी सर्वांनी हर हर महादेवच्या जयघोषात दीपोत्सवाची सांगता करण्यात आले.



### विडी घरकुल गोविंदराज नगरात दीपोत्सव आणि संगीत संध्या कार्यक्रमात रसिक तल्लीन

**सोलापूर, दि. ६ नोव्हेंबर-**

गोविंदराज नगर गणेशोत्सव मंडळ आणि अवनी डेव्हलपर्स अँड कन्स्ट्रक्शन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दीपावली कार्तिक एकादशीनिमित्त भव्य दीपोत्सव आणि वेणूज् संगीत संध्या या कार्यक्रमाने तेथील परिसर भक्तीत तल्लीन झाले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन अवनी डेव्हलपर्सचे संचालक लक्ष्मण सिध्दूल, चार्टर्ड अकौंटंट चंद्रकांत इंजामुरी आणि अरिहंत स्कूलचे संस्थापक डॉ. अजय पोन्नम, यांच्या हस्ते दिपप्रज्वलनाने करण्यात आले. लहान मुलांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनी या संगीत संध्या कार्यक्रम तल्लीन होऊन मनमोकळेपणाने नृत्य करीत आनंद लुटला. या कार्यक्रमाने परिसरातील वातावरण अगदी भक्तीमय झाला.यामुळे आनंद, भक्तीभाव आणि ऐक्याची भावना अनुभवायला मिळाली. या कार्यक्रमास विशेष उपस्थिती डॉ सुर्यप्रकाश कोठे, विभागीय खाण खनिज अधिकारी भानुचंद्र कोलप्याक, माजी नगरसेवक विठ्ठल कोटा, वासू यलदंडी, नरेश कोलप्याक, दिपक दोंता, अमर गुर्रम, निशांत पोरे, दिपीका यलदंडी यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी वेणूज् आर्केस्टाचे वेणुगोपाल उत्तूर, महेश चव्हाण, रविंद्र तुम्मनपल्ली, नरेश आरसिद, अनुराधा गंगुल, वर्षा सोनवले यांनी तेलुगु, मराठी, कन्नड आणि हिंदी गाण्याने कार्यक्रमाची मैफील रंगवली. यावेळी रसिकांच्या वन्स मोअर प्रतिसादाने गायकांचीही प्रशंसा झाली. यावेळी रसिकांना आणि विडी घरकुल परिसरातील नागरिकांना मनसोक्त आनंद घेता आला. यावेळी अवनी डेव्हलपर्सचे संचालक लक्ष्मण सिध्दूल आणि हिरालाल माकम यांनीही आपल्यातील कला यावेळी सादर करून वाह ..वाह.. मिळवली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी मंडळाचे सर्व पदाधिकारी व सदस्यांनी परिश्रम घेतले.

# शेत जमिनीतून वळवला नाल्याचा प्रवाह

- **महापालिका कर्मचारी, विकासकानी संगनमतातून प्रताप केल्याचा आरोप**
- **सद्गुरु प्रभाकर स्वामी महाराज मंदिर ट्रस्टची महापालिका आयुक्तांकडे तक्रार चौकशी करून संबंधितांवर तातडीने गुन्हे दाखल करण्याची मागणी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.६ नोव्हेंबर-**

जुना कारंबा नाका जवळील श्री. सद्गुरू प्रभाकर स्वामी महाराज मंदिर सार्वजनिक ट्रस्टीच्या तब्बल दीड एकर शेत जमिनीवरून बेकायदेशीरिता बनावट नकाशाच्या आधारे महापालिका कर्मचारी आणि बिल्डर (विकासका)च्या संगनमतातून नाला (ओढा) वळविण्यात आला असल्याची तक्रार ट्रस्टी बाळकृष्ण शिंगाडे यांनी आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्याकडे केली आहे.

दरम्यान, संबंधितांवर फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात यावा. ओढ्याचे पात्र पुर्ववत करण्यात यावे. ते ले-आऊट रद्द करण्यात यावे, अशी मागणी केली आहे. श्री सद्गुरू प्रभाकर स्वामी महाराज मंदिर सार्वजनिक ट्रस्ट तर्फे चिफ ट्रस्टी मोहन बोड्डू व मॅनेजिंग ट्रस्टी बाळकृष्ण शिंगाडे यांनी



यासंदर्भात आयुक्तांकडे तक्रार दिली आहे. दरम्यान, आज त्यांनी आवश्यक ते पुरावे आणि कागदपत्रेही सादर केली आहेत. शहरातील जुना कारंबा नाका परिसरात श्री. सद्गुरू प्रभाकर स्वामी महाराज मंदिर सार्वजनिक ट्रस्टच्या मालकीची गट नं. २१ हि ६ एकर शेतजमीन कसबे सोलापूरमध्ये आहे. त्यापैकी तब्बल दीड एकर शेत जमिनीवर बेकायदेशीर हा ओढा वळविला आहे. या ठिकाणी महापालिका आयुक्त यांच्या बनावट आदेशाच्या आधारे व आदेश नसताना सोलापूर महापालिका कर्मचारी, अधिकारी व विकासक नंदकिशोर पंचारिया यांनी संगनमतानी दिशाभूल करून सरकारी रस्त्याची व डी.पी. रोडच्या जमिनीमधून मोठा सांड पाण्याच्या ओढा तब्बल ९० अंशामध्ये दोन ठिकाणी जवळ जवळ १०० फुट इतका वळवला आहे, असा खळबळजनक आरोप आणि तक्रार ट्रस्टीने केली आहे. येथील कसबे सोलापूर येथील गट नं. २१ चे दक्षिणेस व सि.स. नं.टी.पी. ४ फायनल प्लॉट नं.३३ व ३४ चे उत्तरेस असलेला नैसर्गिक ओढ्याचे पात्र बेकायदेशीर रित्या वळवून फायनल प्लॉट नं. ३३ व ३४ मध्ये बेकायदेशीर रित्या ले-आऊट मंजुर करून घेतला आहे व दक्षिणेकडील डि.पी. रोड व ओढापडची जागा हडप केली आहे, असा आरोप केला आहे. ट्रस्टीच्या शेत जमिनीवरून तब्बल दीड एकर परिसरात हा ओढा वळविला असल्याने शेतजमीन नापीक झाली आहे. केली पाच वर्षापासून ट्रस्टीला हे नुकसान सहन करावे लागत आहे. प्रभाकर स्वामी महाराज मंदिर सार्वजनिक ट्रस्टच्या जमीनीमधून आयुक्त यांचा कोणताही आदेशा नसताना फसवणुक, नुकसान करण्याच्या उद्देशाने व सरकारी रस्त्याची जमीन हडप करण्याच्या उद्देशाने बेकायदेशीर रित्या सांड पाण्याचा मोठा ओढा वळवून ट्रस्टच्या जमिनीचे नुकसान केले. बोगस नकाशे व आदेश दाखवून बनावट ले-आऊट मंजुर करून घेतले असा आरोप ट्रस्ट पदाधिकाऱ्यांनी केला आहे. हे ले-आऊट रद्द करून ओढयाचे पात्र पुर्ववतची मागणी केली आहे. बेकायदेशीर रित्या ओढयाचे पात्र वळवल्याप्रकरणी नंदकिशोर पंचारिया व पालिकेचे संबंधित कर्मचारी अधिकारी यांच्यावर फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात यावा. ओढ्याचे पात्र पुर्ववत करण्यात यावे.टी. पी. ४ फायनल प्लॉट नं. ३३ व ३४ मधील ले-आऊट रद्द करण्यात यावे, अशी मागणी ट्रस्टी बाळकृष्ण शिंगाडे केली आहे.

## पानगावजवळ अपघात; दुचाकीस्वाराचा मृत्यू

**बार्शी, दि. ६ नोव्हेंबर-**

बार्शी-सोलापूर मार्गावरील पानगाव येथील शिंदे वस्तीजवळ दुचाकी व टेम्पो यांच्यात झालेल्या भीषण अपघातात दुचाकीस्वाराचा जागीच ठार झाला. हा अपघात मंगळवारी सायंकाळी झाला. मृत व्यक्तीचे नाव नितीन महादेव वरपे (वय ३७, रा. मसा, ता. कळंब,जि. धाराशिव) असे आहे.



फिर्यादी गजानन दिपक काटकर (वय ३०, रा. जुने रेल्वे स्टेशन रोड, बार्शी) यांच्या दिलेल्या माहितीनुसार,ओडिशा राज्यातील टेम्पो चालक बसंता कुमार परिदा (रा. हारिपुर, जि. नयागढ) हा त्याचा टेम्पो क्रमांक (ओडी ०२ सी क्यू ५६७६) निष्काळजीपणे चालवत होता. शिंदे वस्तीजवळ समोरुन येत असलेल्या नितीन वरपे यांच्या दुचाकी क्रमांक एमएच १३ ईएच ८७१४ ला जोरदार धडक दिली. यामध्ये नितीन वरपे गंभीर जखमी होऊन जागीच ठार झाले. बार्शी तालुका पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पाहणी केली. टेम्पो चालक बसंताकुमार परिदा याच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला.







# सोलापूर बाजार समितीत सोयाबीनची ५२३ क्विंटल आवक; दर पोहोचला ४५०० रुपयांवर

● **साठवणुकीची ज्वारी बाजारात दाखल; सुमारे ४१ क्विंटलला सरासरी ३,२०५ रुपयांचा दर**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.६ नोव्हेंबर**

सोलापूर सिद्धेश्वर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये गुरुवार दि.६ नोव्हेंबर रोजी सोयाबीनची सुमारे ५२३ क्विंटल इतकी आवक आली होती. लिलावात सोयाबीनला सर्वात कमी ३,५०० रुपये तर सर्वाधिक ४,५१५ रुपये आणि सरासरी ४,२०० रुपये असा प्रति क्विंटल दर मिळाला.

सोयाबीन नंतर सर्वात जास्त पिकवले जाणारे कडधान्य म्हणून उडदाकडे पाहिले जाते. उडदाचा उतारा देखील मोठ्या प्रमाणात मिळत असल्याने, शेतकरी उडीद पेरतो. बाजार समितीत उडदाची सुमारे १५० पिशव्या आवक आली होती.

उडदाला सर्वात कमी २,८०० रुपये, सर्वाधिक ७,२०० रुपये तर सरासरी ५,२०० प्रतिक्विंटल असा दर मिळाला. तर जिल्ह्यात तुरीचे उत्पादन क्षेत्र देखील बऱ्यापैकी आहे. तूरची ८५ पिशव्या आवक बाजारात आली होती. तुरीला सर्वाधिक ७,००० रुपये तर सर्वात कमी ५,८०० रुपये आणि सरासरी ६,४०० रुपये असा प्रतिक्विंटल दर प्राप्त झाला. त्याचप्रमाणे लोकल हरभऱ्याला कमीत कमी ५,५०० रुपये तर सर्वाधिक ६,००० रुपये तर अण्णगिरी हरभऱ्याला ६,००० ते ६,१०० रुपये प्रति क्विंटल असा दर मिळाला. कडधान्याच्या खरेदीसाठी राज्य शासनाकडून हमीभाव खरेदी केंद्र सुरू केले जाणार आहे. केंद्र सुरू करण्यासाठी लवकरच रजिस्ट्रेशन सुरू होणार असल्याचे सांगण्यात येत आहे. त्याच्या प्रतिक्षेत शेतकरी असल्याचे दिसत आहे.

**साठवणुकीची ज्वारी बाजारात**

कडधान्याच्या आवक झाल्यानंतर बाजारपेठेत ज्वारीची देखील आवक वाढत आहे. सध्या बाजारात साठवणुकीची ज्वारी विक्रीसाठी दाखल होत आहे. गुरुवारी बाजार समितीत साठवणुकीतील मालदांडी ज्वारीची आवक सुमारे ४१ क्विंटल इतकी होती. लिलावात ज्वारीला बोली लावण्यात आली. आडते आणि खरेदीदार यांच्या बोलीतून ज्वारीला कमीत कमी २,३१० ते सर्वाधिक ३,७४८ रुपये तर सरासरी ३२०५ रुपये प्रति क्विंटल असा दर मिळाला.

**प्रतीनुसार सोयाबीनचे दर :** गेल्या काही दिवसांपूर्वी सोयाबीनचे दर चार हजारापर्यंत होते. सध्या बाजारात आवक आणि दर दोन्ही वाढत आहेत. चांगल्या दर्जाचा शेतमाल विक्रीसाठी येत असल्याने खरेदीदार देखील यामध्ये उत्सुकता दाखवत आहेत. लिलावात कडधान्याला चांगला दर मिळत आहे. अतिवृष्टीमुळे सोयाबीन भिजले तरी, सोयाबीन वळवून शेतकरी बाजारपेठेत विक्रीसाठी आणत आहेत.

**- सुनील माने, खरेदीदार**

**सोयाबीन प्रमाणेच ज्वारीला देखील भाव :** सोलापूर सिद्धेश्वर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये सोयाबीन तसेच ज्वारीच्या उत्पादनाला चांगले दर मिळत आहेत. साठवणुकीची ज्वारी बाजारात विक्रीसाठी दाखल आहे. ज्वारीला देखील चांगला दर मिळत असल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधान आहे. अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या हाताशी आलेला सोयाबीन उडीद तूर खराब झाल्याने दर प्रतवारीनुसार ठरत आहेत.

**- बसवराज इटकळे, अडते**

**भाव वाढीची अपेक्षा :** सोयाबीनचे हमीभाव केंद्र सुरू होणार आहे. केंद्रामध्ये सोयाबीनला चांगला दर मिळेल अशी आशा आहे. ज्वारीचे दर सध्या वाढत आहेत. अशीच दर वाढीच्या पेक्षा आहे.

**- औदुंबर मस्के, शेतकरी**

## ज्ञान आणि कर्माच्या संयोगातूनच मानवी जीवनाची धन्यता

- **ह. भ. प. चैतन्य महाराज देगलूरकर**
- **विकास सहकारी बँकेच्या 'वाग्यज्ञ' ला सोलापूरकरांचा उदंड प्रतिसाद**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.६ नोव्हेंबर**

ज्ञान आणि कर्माच्या संयोगातूनच मानवी जीवनाची धन्यता साध्य होते, असे प्रतिपादन ज्ञानेश्वरीचे गाढे अभ्यासक ह. भ. प. चैतन्य महाराज देगलूरकर यांनी केले. विकास सहकारी बँकेतर्फे हेरिटेज लॉन्स येथे आयोजित तीन दिवसीय 'वाग्यज्ञ' च्या दुसऱ्या दिवशी गुरूवारी ह.भ.प. देगलूरकर महाराजांनी मार्गदर्शन केले.

यंदाच्यावर्षी ह. भ. प. चैतन्य महाराज देगलूरकर 'म्हणोनि जेथ श्री श्रीमंतु (कर्तुत्व आणि कृपा) या श्री ज्ञानेश्वरीतील १८ व्या अध्यायातील ओवीवर प्रवचन केले. यावेळी त्यांनी मानवी जीवनातील ज्ञान आणि कर्माची व्याख्या, महत्व आणि गरज विशद केली. ह. भ. प. चैतन्य महाराज देगलूरकर म्हणाले, योगेश्वर श्रीकृष्ण ज्ञानाचे प्रतीक आहेत. तर धनुर्धारी अर्जुन कर्तव्याचे प्रतीक आहेत. केवळ ज्ञानमार्ग, केवळ कर्ममार्ग किंवा फक्त आंधळी भक्ती उपयोगाची नाही. या तिन्हीच्या समन्वयातून मानवी जीवन संपन्न होते. परमार्थ ही दिखाव्याची बाब नाही तर ती प्रत्यक्ष जगण्याची बाब असते. अनुभव नसलेले ज्ञान ही केवळ माहिती असते. कर्मासोबत असलेले ज्ञान जीवनात समृद्धी आणते. ज्ञानच मनुष्याला वस्तुस्थितीची जाणीव करून करून देते, असेही ह. भ. प. चैतन्य महाराज देगलूरकर यांनी सांगितले. कर्म हे ज्ञानाचे साधन झाले पाहिजे. ज्ञान आणि कर्म दोन्ही महत्वाचे आहे. पण ज्ञानाचे महत्व अधिक असते. तथापि ज्ञानाचा अधिकार प्रत्येकाला आहे. पण ज्ञानाला निष्काम कर्माची जोड दिल्यामुळे मनुष्याला विशेषत्वाची प्राप्ती होते, असेही ह.भ.प. चैतन्य महाराज देगलूरकर म्हणाले.

संजीव कुसुरकर यांनी प्रास्ताविक केले. याप्रसंगी विकास सहकारी बँकेचे अध्यक्ष कमलकिशोर राठी, उपाध्यक्ष राजगोपाल चंडक, ज्येष्ठ संचालक राजगोपाल मिणियार, हरीनिवास जाजू, पांडुरंग मंत्री, मनीष बलदवा, ज्योती आसावा, प्रवीण बजाज, सुनील माहेश्वरी आदी उपस्थित होते. संजीव कुसुरकर यांनी सूत्रसंचालन केले.

**सोलापूरकरांनी उपस्थित राहण्याचे आवाहन**

ह. भ. प. चैतन्य महाराज देगलूरकर यांच्या रसाळ वाणीतून होणाऱ्या 'वाग्यज्ञ' चा शुक्रवारी समारोप होणार आहे. सायंकाळी ६.३० वाजता गांधीनगर येथील हेरिटेज लॉन्स येथे सोलापूरकरांनी उपस्थित रहावे, असे आवाहन विकास सहकारी बँकेतर्फे करण्यात आले आहे.

# सराफ दुकानावर दरोड्याचा प्रयत्न करणाऱ्या चौघांना अटक

- **शहर गुन्हे शाखेची कारवाई; अन्य दोघे फरार**
- **अल्पवयीन मुलाचाही गुन्ह्यात समावेश**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ६ नोंव्हेबर -**

सोलापूर शहरातील आरटीओ कार्यालय परिसरातील समर्थ ज्वेलर्सवर दरोड्याचा प्रयत्न करणाऱ्या गुन्हेगारांच्या टोळीतील चौघांना शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांना अटक केली आहे. या गुन्ह्यात एका अल्पवयीन मुलाचा समावेश असल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाले असून या टोळीतील अन्य दोघे अद्याप फरार आहेत. या गुन्ह्यात पोलिसांनी दरोड्याचे कलम वाढविले आहेत.

साहिल दशरथ गायकवाड, समर्थ समीर गायकवाड, सार्थक दशरथ गायकवाड आणि अनिकेत पांडुरंग गायकवाड (सर्व रा. भैरू वस्ती, लिमयेवाडी, सोलापूर) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. याप्रकरणात अजिंक्य चव्हाण (रा. वारजे माळेवाडभ, जि. पुणे) आणि विशाल जाधव (रा. तुळजापूर) हे दोघे फरार आहेत. विजापूर रोडवरील आरटीओ कार्यालय परिसरातील गणेश नगर बस



स्टॉपजवळ दिपक दिगंबर वेदपाठक यांचे समर्थ ज्वेलर्स नावाचे दुकान आहे. १ नोव्हेंबर रोजी रात्री पावणे आठच्या सुमारास वेदपाठक यांच्या समर्थ ज्वेलर्स या दुकानात मोटारसायकलवरून आलेल्या चोरट्यांनी कोयता व पिस्टलचा धाक दाखवित वेदपाठक व दुकानातील कर्मचाऱ्यांना दमदाटी करीत दुकानातील सोन्याचे दागिने लुटण्याचा प्रयत्न केला.

यावेळी चोरट्यांनी कोयत्याने मारून दुकानातील काचे फोडून १० हजारांचे नुकसान केले होते. याबाबत विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेताना शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी घटनास्थळाच्या परिसरातील तसेच शहराच्या विविध भागातील सुमारे १२५ सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या चित्रीकरणाची तपासणी करून संशयित आरोपींची ओळख पटविली. या गुन्ह्यातील संशयित तीन गुन्हेगार हे एमएच १३ ईए २५७८ क्रमांकाच्या दुचाकीवर यतीमखान्याजवळील मोकळ्या मैदानात थांबल्याची माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर पोलिसांनी तिघांना ताब्यात घेतले. त्यांनी त्यांची नावे साहिल, समर्थ, सार्थक अशी सांगितली. या तिघांकडे करण्यात आलेल्या चौकशीमध्ये त्यांनी हा गुन्हा त्यांच्या एका अल्पवयीन साथीदार मुलासह अजिंक्य चव्हाण व विशाल जाधव याच्या मदतीने केला असल्याचे सांगितले. तिघांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी अनिकेत यास अटक केली.

या चौघांकडून पोलिसांनी दोन दुचाकी, एक कोयता, दोन मोबाईल असा मुद्देमाल जप्त केला आहे. पोलिस आयुक्त एम राजकुमार, उपायुक्त डॉ. अश्विनी पाटील, सहायक आयुक्त राजन माने, पोलिस निरीक्षक अरविंद माने यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक शैलेश खेडकर, शंकर धायगुडे, विजय पाटील, मुकेश गायकवाड, निलेश पाटील-सोनवणे, तुकाराम घाडगे, दत्तात्रय काळे यांच्या कर्मचाऱ्यांनी केली.

**अजिंक्य, साहिल व विधीसंघर्षित बालक पोलिसांच्या रेकॉर्डवरील**

या गुन्ह्यातील आरोपी अजिंक्य चव्हाण याचे पुणे येथे रेकॉर्ड आहे. त्याच्याविरुध्द पुणे पोलिसांकडे गुन्हे दाखल आहेत. तर साहिल गायकवाड आणि अजिंक्य चव्हाण यांच्याविरुध्द वळसंग पोलिस ठाण्यात जबरी चोरीचा गुन्हा दाखल आहे. तसेच विधीसंघर्षित बालकदेखील रेकॉर्डवरील असल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाले.

**अशी घडली घटना...दिशाभूल करण्यासाठी दुचाकीचा कलर बदलला...**

दरोड्याचा गुन्हा करण्यापूर्वी यातील सर्व आरोपी हे दमाणी नगर परिसरातील गोल्ड जिम समोरील मैदानात एकत्र आले. त्याठिकाणी समर्थ ज्वेलर्स दुकान लुटण्याचा कट रचला. त्यावेळी अजिंक्य चव्हाण याने त्याच्याकडे पिस्टल व ३ काडतुसे आणि साहिल गायकवाड याने लोखंडी कोयता घेतला. अजिंक्य चव्हाण याच्या ताब्यातील विना नंबर प्लेटची पांढऱ्या रंगाची ॲक्टीव्हा गाडीला स्प्रे पेंटींगद्वारे निळा कलर स्प्रे ने मारला. त्यानंतर निळ्या दुचाकीवर अजिंक्य, विशाल आणि साहिल हे तसेच समर्थ, सार्थक व विधीसंघर्षीत बालक हे मोटारसायकलवरून समर्थ ज्वेलर्स दुकानाजवळ आले. त्यावेळी अजिंक्य, साहिल यांनी तोंडास मास्क बांधून दुकानात शिरले तर विशाल हा बाहेर गाडीवरच थांबला. उर्वरीत तिघे हे दुकान लुटताना काही गडबड झाल्यास त्यांना मदत करण्यासाठी दुकानाच्या आसपासच थांबून राहिले होते. दुकानात शिरलेल्या अजिंक्यने दुकान मालकाला पिस्टलचा धाक दाखवित दमदाटी केली तर साहिलने बॅग टाकून सोन्याचे दागिने बॅगेत भर असा दम दिला. साहिलने कोयत्याने मारून काऊंटरवरील काच फोडली. दुकान मालकाने आरडाओरड करण्यास सुरुवात केल्यानंतर साहिल, अजिंक्य हे दोघे निळ्या रंगाच्या गाडीवरून पळून गेले. त्यानंतर ते सर्वजण एकत्रित लिमयेवाडीतील समर्थच्या घराजवळील बोळात आले व निळ्या रंगाच्या गाडीचा रंग पेट्रोलने धुतला.

प्रिसिजन फाउंडेशन आयोजित...

PRECISION FOUNDATION

सस्नेह निमंत्रण

प्रिसीजन गप्पा

पर्व १७ वे

शुक्रवार, दिनांक ७ नोव्हेंबर २०२५

कार्यक्रम सर्वांसाठी खुला

गौरी थिएटर्स प्रस्तुत
प्रशांत दामले फॅन फौंडेशन प्रकाशित

संकर्षण VIA स्पृहा
निखळ मनोरंजनाचा हलका फुलका प्रयोग!



कलाकार
संकर्षण कऱ्हाडे । स्पृहा जोशी
सहकलाकार
गंधार जोग । विनय चेऊलकर

संकर्षण कऱ्हाडे यांची रसाळ विनोदबुद्धी,
मार्मिक कविता आणि
स्पृहा जोशी यांच्या भावस्पर्शी कवितांची गुंफण !
संस्कृती म्हणजे केवळ परंपरा नव्हे,तर ती काळाशी नाते सांगणारी जिवंत संवेदना आहे.
कथा, कविता आणि किश्शांचा भरघोस नजराणा...

Soham Ads

वेळ : सायं. ६:२५ वा स्थळ : शिवछत्रपती रंगभवन, सोलापूर.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे न.प. निवडणुकीसाठी इच्छुक उमेदवारांच्या उद्या मुलाखती

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.६, नोव्हेंबर -**

माजी मंत्री आणि आमदार संजय बनसोडे यांच्या मार्गदर्शनाखाली आगामी नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीतर्फे इच्छुक उमेदवारांच्या मुलाखतींचे आयोजन करण्यात आले आहे.

ही मुलाखत शनिवार, दि. ८ नोव्हेंबर रोजी दुपारी २ ते ५ वाजेपर्यंत आमदार संजय बनसोडे संपर्क कार्यालय, नगरपरिषदेच्या पाठीमागे, उदगीर येथे होणार आहे. नगराध्यक्षपदासाठी आणि नगरसेवक पदासाठी निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या सर्व इच्छुक उमेदवारांनी आपले उमेदवारी मागणी अर्ज ६ व ७ नोव्हेंबर रोजी संपर्क कार्यालयातून प्रत्यक्ष घेऊन भरावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

मुलाखतीदरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सरचिटणीस व पक्ष निरीक्षक ॲड. व्यंकट बेद्रे, प्रदेश सरचिटणीस सुरेखा पाटील आणि जिल्हा कार्याध्यक्ष अंकुश नाडे हे उपस्थित राहून मुलाखत घेणार आहेत.

सर्व इच्छुक उमेदवारांनी नियोजित वेळी उपस्थित राहावे, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष सय्यद जानीमियां यांनी केले आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### आर.बी. कुलकर्णी यांना मंडळ अधिकारी म्हणून पदोन्नती

**निलंगा, दि.६ नोव्हेंबर -**

अनेक वर्षांपासून तलाठी पदावर कार्यरत असलेले आर. बी. कुलकर्णी यांना मंडळ अधिकारी म्हणून पदोन्नती मिळाली आहे. त्यांची नियुक्ती निलंगा तालुक्यातील भुतमुगळी महसूल मंडळात करण्यात आली आहे. यापूर्वी कुलकर्णी यांनी बसपूर, कलांडी, निटूर आदी ठिकाणी प्रामाणिकपणे व कार्यतत्परतेने सेवा बजावली आहे. त्यांच्या पदोन्नतीनंतर सहकारी कर्मचारी आणि स्थानिक नागरिकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

### ‘वंदे मातरम’ गीताला १५० वर्षे: लातूरमध्ये विशेष कार्यक्रमाचे आयोजन

**लातूर, दि.६ नोव्हेंबर -**

बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी १८७५ साली लिहिलेल्या ‘वंदे मातरम’ या अमर देशभक्तिगीताला यंदा ७ नोव्हेंबर २०२५ रोजी १५० वर्षे पूर्ण होत आहेत. या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक दृष्ट्या महत्त्वाच्या घटनेनिमित्त राज्यातील सर्व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये गीतगायन, देशभक्तिपर भाषणे, वक्तृत्व स्पर्धा, निबंध लेखन व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. या उपक्रमाअंतर्गत लातूर जिल्हा क्रीडा संकुल येथे शुक्रवार, दि. ७ नोव्हेंबर रोजी सकाळी ९.३० ते १०.४० या वेळेत विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास जास्तीत जास्त नागरिक, विद्यार्थी, युवक-युवतींनी उत्साहाने सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी पी. जे. औताडे यांनी केले आहे.

### लातूर जिल्ह्यात २० नोव्हेंबरपर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी लागू

**लातूर, दि.६ नोव्हेंबर -**

कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी केशव नेटके यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ अंतर्गत ६ ते २० नोव्हेंबर २०२५ या कालावधीत संपूर्ण लातूर जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी केला आहे. या काळात शस्त्रास्त्रे, दंडे, स्फोटक पदार्थ, दाहक वस्तू, तसेच पाचपेक्षा अधिक व्यक्तींच्या जमावावर बंदी राहील. विवाह, अंत्ययात्रा व शासकीय कामकाज यांना या आदेशातून सूट देण्यात आली असून, सभा-मोर्चांना परवानगीसाठी पोलीस अधिकाऱ्यांची पूर्वपरवानगी आवश्यक राहील.

### पद्मिनबाई बालवाडे यांचे निधन

**निलंगा, दि.६ नोव्हेंबर -**



निलंगा तालुक्यातील गौर येथील वारकरी संप्रदायातील पद्मिनबाई तुळशीराम बालवाडे यांचे दि.५ नोव्हेंबर रोजी रात्री वयाच्या ८५ व्या वर्षी वर्धापकाळाने निधन झाले. त्या सहशिक्षक संजय बालवाडे व गोविंद बालवाडे यांच्या आई होत. दि.६ नोव्हेंबर रोजी दुपारी बाराच्या सुमारास आनंदवाडी स्मशानभूमीत त्यांचा अंत्यसंस्कार करण्यात आला. त्यांच्या पश्चात दोन मुलं, दोन मुली व नातवंडे असा मोठा परिवार आहे.

# कर्जमाफीशिवाय मतदान नाही : उद्धव ठाकरे

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.६, नोव्हेंबर -**

राज्य सरकारने निवडणुकीदरम्यान शेतकऱ्यांना दिलेली तीन लाख रुपयांची कर्जमाफीची घोषणा अद्याप पूर्ण न केल्याने शेतकऱ्यांनी कर्जमाफीनंतरच मतदान अशी भूमिका घ्यावी, असे आवाहन शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केले.

औसा तालुक्यातील भुसणी येथील शेतकऱ्यांशी गुरुवारी (दि. ६ नोव्हेंबर) संवाद साधताना ते बोलत होते. या वेळी खा. ओमराजे निंबाळकर, माजी मंत्री चंद्रकांत खैरे, शिवसेना नेते अंबादास दानवे, माजी आमदार दिनकर माने, आमदार मिलींद नार्वेकर, कैलास पाटील, डॉ. शोभा बेंजरगे, जिल्हा प्रमुख संतोष सोमवंशी आदी मान्यवर उपस्थित होते.

उद्धव ठाकरे म्हणाले की, राज्य सरकार जोपर्यंत शेतकऱ्यांची कर्जमाफी पूर्ण करीत नाही, तोपर्यंत महायुतीच्या उमेदवारास मतदान नाही. मी शेतकऱ्यांच्या पाठीशी आहे आणि तुम्हा सर्वांना धैर्य द्यायला आलो आहे.

ते पुढे म्हणाले, शेतकऱ्याला हेक्टरी ५० हजार रुपये मिळाल्याशिवाय आम्ही हे सरकार सोडणार नाही. मुख्यमंत्री बिहारच्या प्रचारात व्यस्त आहेत, पण महाराष्ट्रातील शेतकरी प्रश्नांकडे दुर्लक्ष करत आहेत, हे राज्याचे दुर्दैव आहे. महिलांशी संवाद साधताना ठाकरे म्हणाले, आता लाडक्या भगिनींनी सरकारकडे थेट २१०० रुपयांचा तगादा लावावा. शेतकऱ्यांच्या व्यथा ऐकताना त्यांनी सर्वांना एकीने संघर्ष करण्याचे आवाहन केले.

या कार्यक्रमाला औसा व निलंगा तालुक्यातील शेतकरी, पदाधिकारी आणि शिवसेना कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती होती.



# स्थानिक निवडणुकांत स्वराज्य शक्ती सेनेचा दमदार प्रवेश

## करुणा मुंडे यांची घोषणा

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.६, नोव्हेंबर -**

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे बिगुल वाजताच सर्वच राजकीय पक्षांनी तयारीला वेग दिला आहे. याच पार्श्वभूमीवर स्वराज्य शक्ती सेनेकडून मराठवाड्यात जोरदारपणे उमेदवार उतरवले जाणार असल्याची घोषणा पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा करुणा धनंजय मुंडे यांनी केली. त्या लातूर येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होत्या.



करुणा मुंडे म्हणाल्या, आतापर्यंत पारंपरिक नेत्यांनी केवळ स्वतःच्या स्वार्थासाठीच राजकारण केले. पण आता मराठवाड्यात खऱ्या अर्थाने जनतेचे राजकारण घडवण्याची वेळ आली आहे. सामाजिक कार्य करणारे, गोरगरीब, वंचित आणि आतापर्यंत संधी न मिळालेल्या सर्व इच्छुकांनी स्वराज्य शक्ती सेनेत सहभागी व्हावे, अशा सर्वांना आम्ही उमेदवारी देऊन निवडणुकीच्या रिंगणात उतरवणार आहोत.

त्या पुढे म्हणाल्या, नेता तोच आणि त्याचे मुद्देही तेच असल्यामुळे व्यवस्था बदलायची असेल तर नेता बदलायलाच हवा. नाली, रस्ते, लाईट, पिण्याचे पाणी, स्वच्छता हेच खऱ्या अर्थाने जनतेच्या जीवनाशी निगडित प्रश्न आहेत आणि याच मुद्द्यांवर आमचा पक्ष लढणार आहे.

महिला शेतकरी आणि वंचित घटकांवरील अन्यायावर भाष्य करताना त्यांनी सरकारवर तीव्र टीका केली. महाराष्ट्रात महिला शेतकऱ्यांवर अन्याय होत आहे, त्यांना न्याय मिळत नाही. पण जो न्यायासाठी आवाज उठवतो, त्यालाच जेलमध्ये टाकले जाते, असे त्यांनी संतप्तपणे सांगितले.

या पत्रकार परिषदेस स्वराज्य शक्ती सेनेचे जिल्हाध्यक्ष करण कांबळे, युनूसभाई शेख, प्रगती कांबळे, प्रिया गायकवाड, अनु वाघमारे, सचिन भाले, रामदास सोनवणे, शक्ती आणि धम्मानंद लामतुरे उपस्थित होते.

## लातूरमध्ये ६४ वी राज्य हौशी मराठी नाट्यस्पर्धा १७ नोव्हेंबरपासून सुरु

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.६, नोव्हेंबर -**

हौशी नाट्यकलावंत आणि नाट्यरसिकांच्या उत्कंठेचा शिगेला पोहोचवणारी ६४ वी महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्यस्पर्धा लातूर केंद्रावर दि.१७ नोव्हेंबरपासून रंगणार आहे. या स्पर्धेत लातूर जिल्ह्यातील १३ नामवंत नाट्यसंघांचा सहभाग असून ३० नोव्हेंबरपर्यंत चालणारी ही स्पर्धा नाट्यरसिकांसाठी सांस्कृतिक मेजवानी ठरणार आहे.

राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने आयोजित या स्पर्धेतील नाट्यप्रयोग दररोज सायंकाळी ७ वा. शहरातील स्व. दगडोजीराव देशमुख स्मृती सभागृह, मार्केट यार्ड, लातूर येथे सादर होणार आहेत. हौशी नाट्यकलावंत विविध सामाजिक, भावनिक आणि समकालीन विषयांवरील नाटके सादर करणार आहेत.

या स्पर्धेचे आयोजन राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार आणि सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली होत असून, सांस्कृतिक कार्य संचालक बिभीषण चवरे यांनी माहिती दिली. नाट्यरसिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## उदगीरच्या विकासासाठी नारायण राणे यांच्या पुढाकाराने मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासोबत बैठक

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.६, नोव्हेंबर -**



माजी मुख्यमंत्री आणि खासदार नारायण राणे यांच्या मार्गदर्शनाखाली उदगीरच्या विकासासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत उदगीर शासकीय दूध डेअरी, उदगीर शहर पोलीस स्टेशन हद्दवाढ, आणि नगरपरिषद हद्दवाढ या तीन प्रमुख विषयांवर सकारात्मक चर्चा झाली.

१५ एप्रिल २०२५ रोजी राणे यांनी मुख्यमंत्री यांना यासंबंधी विनंतीपत्र दिले होते. त्यानुसार सचिवांना प्रस्ताव तयार करण्याचे आदेश देण्यात आले होते. दूध विकास मंत्री अतुल सावे यांनी प्रस्तावास मंजुरी दिली असून तो सध्या मुख्यमंत्र्यांच्या अंतिम मंजुरीसाठी प्रलंबित आहे. तो तातडीने पारित करावा, अशी मागणी राणे यांनी बैठकीत केली. राणे यांनी नमूद केले की, जसे नागपूरला विदर्भासाठी डेअरी उभी केली जात आहे, तसेच मराठवाड्यातील शेतकऱ्यांसाठी उदगीर येथे डेअरी उभी करणे अत्यावश्यक आहे. यामुळे शेतकऱ्यांना महत्त्वाचा आर्थिक आधार मिळेल.

या बैठकीत शासकीय दूध योजना पुनर्जीवन समितीचे सदस्य ॲड. नरेश सोनावणे आणि पाटील उपस्थित होते.

## औसा येथे संत गणेशनाथ महाराजांच्या नगरप्रदक्षिणेला भाविकांचा प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.६, नोव्हेंबर -**

औसा येथील श्री संत गणेशनाथ महाराजांच्या नगरप्रदक्षिणेला भाविक भक्तांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. मध्यरात्री निघालेली नगरप्रदक्षिणा पहाटे पाचच्या सुमारास मंदीरात पोहोचली.

बुधवार, दि.५ नोव्हेंबर रोजी दुपारी दोन वाजता निघालेल्या नगरप्रदक्षिणेदरम्यान पंचक्रोशीतील हजारो भक्तांनी संताचे दर्शन घेण्यासाठी गर्दी केली होती. कंठी धरिला कृष्णमणी, अवघा जणी प्रकाश या अभंगानंतर गोपाळपुर येथे महाप्रसादाचा सोहळा संपन्न झाला. वर्षभर या प्रसादाची प्रतीक्षा करणाऱ्या भाविकांनी मोठ्या भक्तिभावाने सहभाग घेतला.

रात्री हभप. ज्ञानेश्वर महाराज आळंदी यांचे कीर्तन व भजनानंतर मध्यरात्री संत गणेशनाथांची पालखी ज्ञानोबा-तुकाराम च्या गजरात नगरप्रदक्षिणेसाठी निघाली. मार्गावर महिलांनी सडा मारून, रंगोळी व फुलांनी दारं सजवली होती. पहाटे तेरणा नदीकिनारी पालखी पोहोचताच भव्य फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली.



आज दुपारी दोन वाजता पारंपरिक दगडी चाकांचा महाप्रसाद रथ निघाला. बाजारचौकात झालेल्या महाअभंगानंतर चोपदारांच्या संकेतावर गोपाळपुर व हनुमान मंदिर येथे महाप्रसाद वाटप झाले. महाआरतीनंतर संत गणेशनाथांची पालखी पुन्हा मंदिराकडे परतली. भक्ती, उत्साह व श्रद्धेने भरलेला हा सोहळा औसा परिसरात भाविकांच्या मनात अविस्मरणीय ठरला.

## स्मशानभूमी अतिक्रमण प्रकरणात ॲड. प्रकाश तोंडारे यांना दोन वर्षांची सक्तमजुरी



**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.६, नोव्हेंबर -**

उदगीर शहरातील स्मशानभूमीवरील अतिक्रमण प्रकरणात तब्बल १४ वर्षांनंतर न्यायालयाने निकाल दिला आहे. या प्रकरणात ॲड. प्रकाश शरणअप्पा तोंडारे यांना दोन वर्षांची सक्तमजुरी आणि अन्य शिक्षेचा आदेश प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी व्ही. आर. घराळ यांनी दिला आहे.

सदर प्रकरणात २४ नोव्हेंबर २०१० रोजी भानुदास विठ्ठल साबणे यांनी ग्रामीण पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली होती. फिर्यादीनुसार स्मशानभूमीवरील काही समाध्या उकरून तिथे बेकायदेशीर कब्जा करण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. या प्रकरणी ॲड. प्रकाश तोंडारे व इतर सहा जणांविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला होता.

फौजदारी खटला क्र. ११२/२०११ या प्रकरणात साक्षीपुरावे आणि कागदपत्रे तपासल्यानंतर न्यायालयाने निकाल देताना आरोपी क्रमांक २ ते ७ यांना पुराव्याअभावी निर्दोष मुक्त केले.

मात्र, आरोपी क्रमांक १ ॲड. प्रकाश तोंडारे यांच्याविरुद्ध अपराध सिद्ध झाल्याचे नमूद करत त्यांना पुढील शिक्षा सुनावण्यात आली. तसेच आरोपी १ ते ७ यांचे जामीन रद्द करण्याचा आदेशही न्यायालयाने दिला आहे.

या निकालानंतर स्मशानभूमी प्रकरण पुन्हा चर्चेत आले असून हिंदूखाटीक समाजाने अतिक्रमण काढण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे दाद मागितली आहे. तब्बल १४ वर्षांपासून न्यायाची प्रतीक्षा करणाऱ्या समाजात आता समाधान व्यक्त केले जात आहे.

# औसा किल्ला होणार पर्यटनाचं नवं आकर्षण केंद्र : आशिष शेलार

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.६, नोव्हेंबर -**

ऐतिहासिक घटनांचा साक्षीदार असलेल्या औसा किल्ल्याच्या संवर्धनाच्या कामांना आता गती मिळणार असून, काम पूर्ण झाल्यानंतर हा किल्ला पर्यटकांसाठी नव्या आकर्षणाचे केंद्र ठरणार असल्याची ग्वाही राज्याचे माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी दिली.

मंत्री शेलार यांनी औसा किल्ल्याची पाहणी करून परिसरातील सुरू असलेल्या विकासकामांचा आढावा घेतला. यावेळी आ. अभिमन्यू पवार, पुरातत्व विभागाचे संचालक तेजस गर्गे, औसा-रेणापूरचे उपविभागीय अधिकारी अविनाश कोरडे, तहसीलदार घनश्याम अडसूळ, पुरातत्व विभागाचे सहायक संचालक अमोल गोटे आणि औसा नगरपालिकेचे मुख्याधिकारी मंगेश शिंदे उपस्थित होते.



मंत्री शेलार म्हणाले, औसा किल्ल्याच्या डागडुजी आणि संरक्षणासाठी आवश्यक कामांचा प्रस्ताव तातडीने सादर करण्यात यावा. मंजूर कामांना गती देऊन मंजुरी प्रक्रिया लवकर पूर्ण केली जाईल. किल्ल्यातील अतिक्रमण हटवताना नागरिकांना आवास योजनेतून पर्यायी घरे देण्यासाठी प्रस्ताव तयार करावा. तसेच ‘साऊंड अँड लाईट शो’च्या माध्यमातून किल्ल्याचा गौरवशाली इतिहास पर्यटकांना दाखविण्याची सुविधा निर्माण केली जाईल.

आ. अभिमन्यू पवार म्हणाले, किल्ल्यात काही घरांचे अतिक्रमण असल्याने विकास कामांना अडथळा निर्माण होत आहे. संबंधित कुटुंबांना आवास योजनेतून घरे उपलब्ध करून दिल्यास संवर्धनाला गती मिळेल. त्याचबरोबर खरोसा येथील प्राचीन लेण्यांचेही संवर्धन करण्यात यावे, अशी मागणी त्यांनी केली.

पुरातत्व विभागाचे संचालक तेजस गर्गे आणि सहायक संचालक अमोल गोटे यांनी किल्ल्याच्या दुरुस्तीच्या सद्यस्थितीची आणि ऐतिहासिक पार्श्वभूमीची माहिती सविस्तर दिली.

औसा किल्ल्याच्या पुनरुत्थानामुळे औसा शहराला राज्याच्या पर्यटन नकाशावर विशेष स्थान मिळेल, अशी अपेक्षा आ. पवार यांनी व्यक्त केली.

## श्री संत शिरोमणी मारुती महाराज साखर कारखान्याचा गळीत हंगाम प्रारंभ

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.६, नोव्हेंबर -**

तालुक्यातील बेलकुंड येथील श्री संत शिरोमणी मारुती महाराज शेतकरी सहकारी साखर कारखान्याचा २०२५-२६ गळीत हंगामाचा शुभारंभ हभप. ज्ञानेश्वर महाराज माकणीकर यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी देवताळा संस्थानचे महंत राजेंद्रगिरी महाराज, धनंजय भोसले, कारखान्याचे चेअरमन शाम रविंद्र भोसले, ऊस उत्पादक सभासद राजेंद्र मोरे, शिवाजी सावंत, सोहनलाल वर्मा, महमद रफीक बिरादार, पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

बॉयलर होमहवन पूजन संचालक श्री. व सौ. संतोष भोसले यांच्या हस्ते, तसेच गव्हाण पूजन व सत्यनारायण पूजा संचालक श्री. व सौ. शामराव साळुंके यांच्या हस्ते पार पडली. या प्रसंगी कारखान्याच्या वतीने खरेदी करण्यात आलेल्या नव्या हार्वेस्टर आणि ट्रॅक्टर इन्फिल्डरचे पूजनही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमाला चेअरमन शाम भोसले, व्हा. चेअरमन सचिन पाटील, संचालक शाम साळुंके, गणपतराव बाजुळगे, सुभाष जाधव, ॲड. बाबासाहेब गायकवाड, भरत माळी, संतोष भोसले, अमित माने, रमेश वळके, अनिल पाटील, विलास काळे, गोविंद सोनटक्के, चंद्रसेन पाटील, कार्यकारी संचालक सदाशिव बहीर, शेतकरी संघटनेचे राजीव कसबे, राजेंद्र मोरे, जागृती शुगरचे जनरल मॅनेजर गणेश येवले, मांजरा शुगरचे जी.एम. वाकडे, जागृती शुगर्सचे कदम, चिफ इंजिनिअर सुनिल पवार, चिफ केमिस्ट नानासाहेब पाटोळे, चिफ अशीटर गोपाळ चव्हाण, सिव्हिल इंजिनिअर काळे, कार्यालयीन अधीक्षक सूर्यकांत सावंत तसेच कारखान्याचे अधिकारी, कर्मचारी व कामगार उपस्थित होते.


### छोटी जाहिरात...

**टि.सी. हरवली आहे**

**कान्होपात्रा उत्तमराव पोले** या नावाची टी.सी.हरवली आहे.चाकूर येथून अहमदपूर कडे दि.२८ आक्टोंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता बसने अहमदपूर कडे प्रवास करीत असताना संत गोविंदबाबा विद्यालय, लातूर रोडची कान्होपात्रा उत्तमराव पोले या नावाची **टि.सी.व इतर शैक्षणिक साहित्य** हरवले आहेत. टि.सी.व कागदपत्रे सापडल्यास खालील मोबाईल नंबरवर संपर्क करावा.

**कान्होपात्रा उत्तमराव पोले**
**मो. ८४५९७७९६५९**

# राज्यस्तर शालेय व्हॉलीबॉल स्पर्धेचा बक्षीस वितरण

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.६ नोव्हेंबर**

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग अंतर्गत क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अंतर्गत धिनस्त जिल्हा प्रशासन, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषद, बीड यांचे विद्यमाने व जिल्हा राज्य व्हॉलीबॉल संघटनेच्या तांत्रिक सहकार्याने दिनांक ०१ ते ०२ नोव्हेंबर, २०२५ या कालावधीत जिल्हा क्रीडा संकुल, इनडोअर हॉल, बीड येथे मान्यवरांच्या उपस्थितीत १७ वर्षाखालील मुले व मुली राज्यस्तर शालेय व्हॉलिबॉल स्पर्धेचे बक्षीस वितरण संपन्न झाला.

सदर स्पर्धेच्या बक्षीस वितरण कार्यक्रम जिल्हा परिषद, बीडचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहेमान यांचे हस्ते, जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यगर, जिल्हा व्हॉलीबॉल संघटनेचे सचिव शकील अहेमद, गोपाळ धांडे यांचे प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

बक्षीस वितरण कार्यक्रमाच्या प्रसंगी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहेमान यांनी स्पर्धेत सहभागी झालेल्या खेळाडूंना सातत्याने खेळाचा सराव करून विविध स्पर्धेमध्ये यश संपादन केले पाहीजे. खेळ खेळल्याने शरीर व मन तंदुरूस्त राहत. ज्या संघानी प्राविण्य मिळविले त्या संघातील खेळाडूंचे कौतूक करून खेळाडूंनी राष्ट्रीयस्तरावर प्राविण्य मिळवून राज्याचे नाव उंचवावे अशी अपेक्षा व्यक्त केले. जे संघ पराभूत झाले, ज्या खेळाडूंची राज्य संघात निवड झाली नाही त्यांनी नाराज न होता खचून न जाता पुढच्या वेळेस जोमाने खेळ करत यश संपादन करावे असे प्रतिपादन केले.

सदर स्पर्धेत मुलांच्या वयोगटात प्रथम क्रमांक छत्रपती संभाजीनगर विभाग (विवेकानंद माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय काळेगाव हवेली, ता. जि. बीड, द्वितीय क्रमांक कोल्हापूर विभाग (माध्यमिक आश्रमशाळा आष्टा, जि. सांगली तर तृत्तीय क्रमांक - नागपूर विभाग निकेतन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, नागपूर, जि.नागपूर सदर स्पर्धेत मुलींच्या वयोगटात प्रथम क्रमांक पुणे विभाग (मिलेनियम नॅशनल स्कुल ॲण्ड जुनियर कॉलेज जि. पुणे), द्वितीय क्रमांक -लातूर विभाग (छत्रपती शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, धाराशिव, जि. धाराशिव तर तृत्तीय क्रमांक कोल्हापूर विभाग (द्रविड हायस्कुल, वाई, ता. वाई, जि. सातारा) जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यगर यांनी प्रास्तविकामध्ये सदर स्पर्धे विषयी सविस्तर माहिती देवून सदर स्पर्धेच्या बक्षीस वितरण कार्यक्रमात मान्यवर मंडळी उपस्थित राहिल्याबद्दल सर्वांचे धन्यवाद व्यक्त करून आभार मानले.

सदर स्पर्धा हया दोन दिवस चालू राहिल्या. सदर स्पर्धेत राज्याच्या आठ विभागातून आठ मुले व आठ मुलींचे संघ, प्रत्येक विभागातून ०५ मुले व ०५ मुली निवड चाचणीसाठी सहभागी झाले. सदर स्पर्धेतून क्रीडा

संचालनालयामार्फत नियुक्त तज्ञ निवड समिती सदस्यांमार्फत महाराष्ट्र राज्याचा मुला व मुलींचा पुढील प्रमाणे-निवडण्यात आला. सदर संघ उत्तरप्रदेश बरेली येथे दि. ११ ते १५ नोव्हेंबर, २०२५ या कालावधीत होणा-या राष्ट्रीय शालेय व्हॉलीबॉल स्पर्धेत महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधीत्व करणार आहे.सदर स्पर्धेकरिता राज्य संघ निवड चाचणी सदस्य म्हणून नाजुक उईक, गणेश खैरमोडे, अनिकेत बोडखे, धनंजय माळी, अंजली पाटील, पंच म्हणून जब्बार पठाण, काझी अकरम, सुनिल मुलानी, ताज पठाण, शहाबाज पठाण, विठ्ठल कावरे, प्रशांत सिरसाठ, वहिद शेख, प्रविण कोरडे हे काम पाहत आहेत.निवडलेला महाराष्ट्र राज्याचा मुलींचा संघ गायत्री नांदे, सई जगताप, शृती राऊत, स्वरा देवघरे, सिद्धी सनस,विशाखा, मोरे, वैष्णवी पाटील, प्रणाली कामटकर, माहेश्वरी भावरकर, मधुरा देसाई, उर्वी दसरे, वैष्णवी भनजे. राखीव खेळाडू संध्या कानवटे, गिरीजा पवार, सानवी कोळी, वसुधा नांदुर्डीकर, रिशमा शेट्टी.

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा

## बीडमध्ये ८ उपकेंद्रावर २०४० परीक्षार्थी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.६ नोव्हेंबर**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा २०२५ दिनांक ९ नोव्हेंबर २०२५ रोजी बीड जिल्हा केंद्रावरील एकूण ०८ उपकेंद्रामधून सकाळी १०.०० ते दुपारी १२.०० व दुपारी दुसरे सत्र ०३ ते ०५.०० वाजता अशी दोन सत्रात घेण्यात येणार आहे. या परीक्षेसाठी एकूण २ हजार ४० उमेदवार बसलेले आहेत.

परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी ०८ उपकेंद्रप्रमुख १६ मदतनीस ३२ पर्यवेक्षक १०३ समवेक्षक असे एकूण १५९ अधिकारी, कर्मचारी यांची जिल्हा प्रशासनाद्वारे नियुक्ती करण्यात आलेली आहे.

सदर नियुक्त अधिकारी, कर्मचारी यांना दिनांक ०४ नोव्हेबर २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जिल्हा नियोजन सभागृह बीड येथे निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा केंद्र प्रमुख यांनी परीक्षेच्या अनुषंगाने प्रशिक्षण दिले आहे.

१०० मीटर परिघात मनाई आदेश परीक्षेच्या कालावधीत उपकेंद्रावर कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी परीक्षा उपकेंद्रावर पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आलेला आहे. तसेच परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये मनाई आदेश लागू करण्यात आलेला आहे.

आयोगाच्या सूचनेनुसार या परीक्षेसाठी बसलेल्या उमेदवारांना त्यांच्याकडील मोबाईल, पेजर, कॅल्क्युलेटर, इलेक्ट्रॉनिक वस्तू आणि अभ्यासाचे इतर साहित्य परीक्षा केंद्रावर घेऊन जाण्यास मनाई आहे. आयोगाने दिलेल्या सूचनेप्रमाणे उमेदवारांना जेवणाचा डबा, अल्पोपहार व पाण्याची बॉटल घेऊन जाण्यास परवानगी देण्यात येत आहे. दोन पेपरच्या मध्यल्या वेळेमध्ये उमेदवारांना परीक्षा उपकेंद्राच्या बाहेर जाण्यास मनाई आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने नेमून दिलेल्या परीक्षेचे आवश्यक साहित्यच उमेदवारांना जवळ बाळगण्याची मुभा राहील तसेच सर्व उमेदवारांनी परीक्षेच्या वेळी प्रवेश पत्रासोबत त्यांचे स्वतःचे आधारकार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट किंवा ड्रायव्हिंग लायसन्स (फक्त स्मार्ट कार्ड प्रकारचे) यापैकी कोणत्याही एका ओळखपत्राची छायांकित प्रत दोन सत्रासाठी दोन छायांकित प्रत सोबत आणणे आवश्यक आहे.

उमेदवारांना त्यांच्या परीक्षा उपकेंद्रावर पेपर क्रमांक -०१ सकाळी ०८.३० वाजता व पेपर क्रमांक ०२ सत्रामध्ये दुपारी १.३० वाजता उपस्थित राहावे.

सकाळच्या सत्रात ०९.३० वाजेनंतर आणि दुपारच्या सत्रात २.३० वाजेनंतर परीक्षा केंद्रावर येणाऱ्या उमेदवारांना कोणत्याही कारणास्तव प्रवेश देण्यात येणार नाही, असे निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळवले आहे.

# श्री क्षेत्र गौतमऋषी देवस्थानास धाकट्या ब्रह्मगिरीचे महात्म्य!

## काकडा सांगता निमित्त महापंगत संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.६ नोव्हेंबर**

बीड शहरापासून पालवन श्री क्षेत्र गौतमऋषी संस्थान घोलपदरा पालवन येथे

ह.भ.प.श्री.गु.महंत श्रीरंग महाराज डोंगरे यांच्या मार्गदर्शना आयोजित काकडा सांगता निमित्ताने ह.भ.प.श्री. रामायणाचार्य विश्वंभर महाराज माळोदे यांच्या सुश्राव्य कीर्तन संपन्न झाले असुन या निमित्ताने राजेंद्र मस्के परिवारातर्फे महापंगतीचे आयोजन करण्यात आले होते. पंचक्रोशीतील अनेक भाविक भक्तांनी कीर्तनाचा व महाप्रसादाचा लाभ घेतला.

श्री. क्षेत्र गौतमऋषी देवस्थान जिल्ह्यात भाविक भक्तांच्या श्रद्धेमुळे विख्यात झाले असून दर अमावस्येला भाविक भक्तांची दर्शनासाठी गर्दी असते. या देवस्थानवर येणाऱ्या भाविक भक्तांच्या सोयीसाठी रस्ता, नाल्या, लाईट, पाणी अशा मुलभूत

पालवण ग्रामस्थ व राष्ट्रवादी शरदपवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या पुढाकाराने

सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केलेला आहे. संक्रांति दरम्यान त्र्यंबकेश्वर ब्रह्मगिरी प्रदक्षिणेसाठी अलोट गर्दी असते. त्याच धर्तीवर बीड व पंचक्रोशीतल भाविकांची प्रदक्षिणेसाठी गर्दी होते. गेली अनेक वर्षापासून प्रदक्षिणेची परंपरा भक्तांनी संवर्धित केली आहे.महर्षी गौतम ऋषीच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या प्राचीन तपोभूमीत संत महंत ऋषी मुनींच्या कृपा आशीर्वादाने भाविक भक्तांच्या विशेष परिश्रमातून श्री त्र्यंबकेश्वर महादेव व श्री रुक्मिणी पांडुरंगाचे भव्य नतून मंदिराचे व शिखराचे बांधकाम करण्यात आले आहे.तसेच या संस्थानात

श्री रुक्मिणी पांडुरंग, जगद्गुरु तुकाराम महाराज महंत गुरु महादेव बाबा यांच्या नतुन मूर्तीची स्थापना यापूर्वीच करण्यात आलेल्या आहेत. यामुळे परिसरातील भाविक बहुसंख्येने या गौतम ऋषी देवस्थान मध्ये दर्शनासाठी व आध्यात्मिक कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने उपस्थित असतात.

चातुर्मासाच्या निमित्ताने आज काकडा सांगता समारंभ मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

# किल्ले धारूर नगरपरिषद निवडणूक २०२५: 'वारसा' आणि 'तरुण जोश' घेऊन डॉ. मयूर सावंत रिंगणात!

**तभा वृत्तसेवा**
**किल्लेधारूर दि.६ नोव्हेंबर**

### ध्येय 'सर्वांगीण विकासाचे'; राष्ट्रवादीकडून नगराध्यक्षपदासाठी प्रबळ दावेदारी

किल्ले धारूर नगरपरिषदेच्या आगामी २०२५ च्या निवडणुकीत नगराध्यक्षपदासाठी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षाकडून तरुण आणि सुशिक्षित चेहरा डॉ. मयूर मुकुंदराव सावंत यांनी जोरदार दावेदारी केली आहे. 'एकच ध्यास, किल्ले धारूरचा सर्वांगीण विकास' हे लक्ष घेऊन ते मैदानात उतरण्यास सज्ज झाले असून, त्यांच्या उमेदवारीमुळे शहरातील राजकीय वातावरण तापले आहे.



डॉ. मयूर सावंत यांचा राजकीय वारसा पिढीजात आहे. त्यांचे वडील, प्राध्यापक मुकुंद सावंत यांनी कमी वयात राजकारणात सक्रिय होत नगरपरिषदेचे नगराध्यक्षपद भूषवले होते. त्यांच्या कार्यकाळात धारूर शहराला पाणीटंचाईतून बाहेर काढण्यासाठी टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यासारखी अनेक महत्त्वाची विकासकामे केल्याचे बोलले जाते.

याचबरोबर, डॉ. मयूर यांचे आजोबा, फकिरा सावंत यांनी देखील 'मठ गल्ली, कसबा विभाग' मधून नगरसेवक म्हणून नगरपरिषदेत काम केले आहे. आजोबा आणि वडिलांनी केलेल्या सामाजिक आणि राजकीय कामाची प्रेरणा घेऊनच डॉ. मयूर सावंत हे आता सक्रिय राजकारणात उतरले आहेत. तरुण नेतृत्व, विकासाचा निर्धार सध्या चर्चेत असलेले डॉ. मयूर सावंत हे तरुण असल्याने त्यांच्यामध्ये असलेला उत्स्फूर्त उत्साह, सकारात्मक कार्यशैली आणि सामाजिक एकोपा राखण्याची वृत्ती शहरातील नागरिकांमध्ये विशेषतः युवकांमध्ये चर्चेचा विषय ठरली आहे.

प्रत्येक सामाजिक कार्यक्रमात त्यांची सक्रिय उपस्थिती असते. त्यांच्या तरुण नेतृत्वाला शहरातील युवकांची मोठी पसंती मिळत आहे.

प्राध्यापक मुकुंदराव सावंत यांचा राजकीय वारसा आणि स्वतःचा तरुणाईचा जोश यामुळे नगराध्यक्षपदासाठी ते किल्ले धारूर शहरात प्रबळ दावेदार म्हणून ओळखले जात आहेत. 'लक्ष २०२५' - तिकीटासाठी सर्वत्र मागणी

राष्ट्रवादी (अजित पवार गट) कडून नगराध्यक्षपदाचे तिकीट मिळावे यासाठी डॉ. मयूर सावंत यांनी पक्षाकडे मागणी केली आहे. त्यांचे कौटुंबिक राजकीय योगदान, शैक्षणिक पार्श्वभूमी आणि धारूरच्या विकासाची तळमळ पाहता, त्यांना उमेदवारी मिळावी अशी भावना विविध क्षेत्रांतील नागरिक व्यक्त करत आहेत.

डॉ. मयूर सावंत यांच्या रूपाने किल्ले धारूर शहराला एका गतिमान आणि विकासाभिमुख तरुण नेतृत्वाची संधी मिळू शकते, असे मत व्यक्त होत आहे. 'लक्ष २०२५' साध्य करण्यासाठी, ही उमेदवारी मिळाल्यास ते नक्कीच वडिलांच्या आणि आजोबांच्या पावलावर पाऊल ठेवून शहराच्या सर्वांगीण विकासासाठी काम करतील अशी आशा आहे.

# मनोज जरांगे प्रकरणी ना. पंकजाताई मुंडे यांची जालन्याच्या एसपींशी चर्चा; प्रकरणाचा गंभीरपणे तपास करून जरांगेंच्या सुरक्षेत वाढ करण्याचे आदेश

**तभा वृत्तसेवा**
**मुंबई दि.६ नोव्हेंबर**

मराठा आंदोलक मनोज जरांगे यांच्या जीवाला धोका असल्याच्या बातम्या माध्यमात आल्यानंतर राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री तथा जालन्याच्या पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी जालन्याचे पोलिस अधीक्षक अजयकुमार बन्सल यांना संपर्क साधून या विषयावर चर्चा केली. या प्रकरणाचा गंभीरपणे तपास करून जरांगे यांच्या सुरक्षेत वाढ करावी असे आदेश आज दिले.

मराठा आरक्षणासाठी लढा देणारे मराठा आंदोलक मनोज जरांगे यांच्या जीवाला धोका असल्याची तक्रार पोलिस ठाण्यात आल्यानंतर जालना पोलिसांनी दोन जणांना ताब्यात घेत त्यांची चौकशी सुरू केली आहे. या घटनेची माहिती मिळताच जालन्याच्या पालकमंत्री म्हणून ना. पंकजाताई मुंडे यांनी लगेचच पोलिस अधीक्षक अजयकुमार बन्सल यांना फोनवरून संपर्क साधला आणि संपूर्ण घटनेची माहिती जाणून घेतली. हा प्रकार अतिशय गंभीर असून याचा सखोल तपास करावा तसेच जरांगे यांच्या सुरक्षेत वाढ करावी असे आदेश त्यांनी पोलिस अधीक्षकांना दिले.

# मुकुंदराज व मुरंबी तलाव परिसरात विविध प्रजातीच्या पक्ष्यांची नोंद

**पक्षी निरीक्षणासाठी गर्दी**

**तभा वृत्तसेवा**
**अंबााजोगाई दि.६ नोव्हेंबर**

संपूर्ण महाराष्ट्रात ५ नोव्हेंबर ते १२ नोव्हेंबर या काळात महाराष्ट्रभर पक्षी सप्ताह साजरा केला जातो. यानिमित्त बुधवारी (दि. ०५) शहरातील पक्षी मित्रांनी मुकुंदराज, नागनाथ व बुट्टेनाथ मंदीर परिसरात तर गुरुवारी (दि. ०६) रोजी मुरंबी तलावावर पक्षांची पाहणी केली. यावेळी विविध पक्षांच्या प्रजाती आढळून आल्या त्यांची नोंद इ-बर्ड या प वर करण्यात आली.

पक्षीशास्त्रज्ञ मारूती चितमपल्ली (५ नोव्हेंबर आणि डॉ. सलीम अली (१२ नोव्हेंबर) यांच्या जन्मदिनाच्या मधल्या काळात हा पक्षीसप्ताह पक्षी मित्र महाराष्ट्रभर राबवितात. अंबाजोगाई शहरात दरवर्षी प्रमाणे या वर्षीही हा उपक्रम राबवण्यात आला. या उपक्रमात दिनांक ५ नोव्हेंबर ते १२ नोव्हेबर या काळात विविध ठिकाणी पक्षिनिरीक्षणांचे आयोजन करण्यात आले आहे. पक्षीसप्ताहाच्या पहिल्या दिवशी सुरुवात करताना मुकुंदराज परिसर ते बुटेनाथ - नागनाथ मंदिर या ठिकाणी पक्षीनिरीक्षण करण्यात आले. सकाळी ६.३० ते ९ या वेळात पक्षिनिरीक्षणाने या उपक्रमाची सुरुवात झाली. गुरुवारी तालुक्यातील मुरंबी तलावावर पक्षी निरीक्षणासाठी अंबाजोगाई येथील अनेक निसर्गप्रेमी नागरिक पक्षिअभ्यासक, शिक्षक व विद्यार्थी सहभागी झाले होते. या पक्षिनिरीक्षणावेळी मुकुंदराज परिसरात अनेक प्रजातींचे पक्षी आढळून आले. यातील काही पक्षी हे स्थलांतरीत आणि इतर स्थानिक प्रकारचे पक्षी होते. अंबाजोगाई येथील अनेक पक्षीमित्रांनी उपस्थितांना पक्षी निरीक्षणासाठी मार्गदर्शन केले. डॉ. शुभदा लोहिया, प्रा. अभिजित लोहिया, रत्नाकर निकम, रामराव मुंडे, जे. व्ही. कस्तुरे, मुन्ना सोमाणी, स्वाराती महाविदयालयाचे प्राचार्य प्रशांत देशमुख, गणेश कदम, हेमंत धानोरकर, प्रा. आदित्य कदम, प्रा. पी. एस. तरकसे, श्रीराम वाशिंबे, प्रशांत बर्दापुरकर, शुभम देशमाने, शंकर कराड या सर्वांनी पक्षिनिरीक्षणात सहभाग घेतला. तसेच आदित्य कदम, ओजस तारका हेमंत, वरद देशमुख या बाल पक्षीनिरीक्षकांनीही या उपक्रमात अत्यंत उत्साहाने सहभाग घेऊन पक्षीशास्त्रातील विज्ञान व मनोरंजन याचा अनुभव घेतला.

**निरीक्षणात आढळलेले पक्षी**

मुकुंदराज परिसर ते बुटेनाथ -नागनाथ मंदिर परीसरात बोनेलीचा गरुड, हळद्या, चष्मेवाला, वेडा राघू, निलीमा, शेकाट्या, रिव्हर टर्न, कॉमन सँडपाइपर, ग्रे हेरॉन, डार्टर, पांढरी पाणकोंबडी, पान कावळे, नदी कुरव, हळदी कुंकू बदक, अशा अनेक वैशिष्ट्यपुर्ण पक्ष्यांचे प्रकार मोठ्या प्रमाणात आढळून आले.

# सेवा निवृत्त कर्मचारी यांनी हयात नामे सादर करावेत-अनिल बोर्डे



**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.६ नोव्हेंबर**

बीड जिल्ह्यातील सर्व पेन्शन धारक व सेवानिवृत्त कर्मचारी यांनी दरवर्षीप्रमाणे माहे नोव्हेंबर २०२५ मध्ये हयात प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे असे श्री जगदंबा ज्येष्ठ नागरिक सेवाभावी संस्था गेवराई यांनी केले आहे.

जिल्हा परिषद कर्मचारी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी गटविकास अधिकारी यांच्याकडे व कोषागार अधिकाऱ्याकडून पेन्शन मिळणाऱ्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी बँक ऑफ इंडिया बँकेत हयात नामा प्रमाणपत्र सादर करावे. हयात नामा प्रमाणपत्र सोबत आधार कार्ड, बँक अकाउंट, पी पी पी ओ क्रमांक असणे आवश्यक आहे असे आवाहन सेवानिवृत्त व अध्यक्ष श्री जगदंबा ज्येष्ठ नागरिक सेवाभावी संस्था गेवराई अनिल बोर्डे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

**दीनदयाळ नागरी सहकारी बँक म. अंबाजोगाई**
मुख्य कार्यालय- मुख्य कार्यालय, बस डेपो शेजारी, परळी-रोड, अंबाजोगाई
फोन क्र. ०२४४६-२४६९२७
ऑफिस पत्ता:- मुख्य कार्यालय, बस डेपो शेजारी, परळी-रोड, अंबाजोगाई
फोन क्र. ०२४४६-२४६९२७
जा.क्र. दीन/मु.का./वसुली/०९/७००२-११८/१७३/२०२५-२६ दिनांक- ०४.११.२०२५
परिशिष्ट ४ अ
नियम ८ व ९ नुसार
**मालमत्ता विक्रीची सूचना**
[illegible]
स्थळ:- लातूर
दिनांक:-०४.११.२०२५
अधिकृत अधिकारी, (सिक्युअर्ड क्रेडीटर) दीनदयाळ नागरी सहकारी बँक म. अंबाजोगाई, मो. ७६६६५७७९००

**DNS Bank Ltd. Ambajogai**
( Secured Creditor as defined u/s 2(1)(zd) of SARFAESI Act,2002)
(सरफेसी कायदा,२००२ च्या २(१)(zd)नुसार परिभाषित केल्यानुसार सुरक्षित कर्जदार)
जा.क्र. सरफेसी/१३/टीएल-८०/१७३/२०२५-२६ दिनांक ०४.११.२०२५
नोंदणीकृत पोस्ट/जाहिरातीद्वारे
[illegible]
**DNS Bank Ltd. Ambajogai**
[illegible]

# रेती उपसासाठी लागणारे ६० लाखांचे साहीत्य नष्ट



**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. ६ नोव्हेंबर-**

मुदखेड पोलिस व महसूल यांनी अवैध रेती उपसा विरोधात कारवाई करुन ६० लाखांचा मुद्देमाल नष्ट केला आहे. हि कारवाई दि.६ नोव्हेंबर रोजी सकाळी पाचच्या सुमारास करण्यात आली.

### पोलीस-महसुलची संयुक्त कारवई

मुदखेड तालुक्यातील वासरी, शंकतिर्थ आदी भागात मोठ्या प्रमाणात वाळूचा उपसा, वाहतूक होत असल्याची माहिती मिळाल्यावरुन मुदखेड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धीरज चव्हाण, तहसीलदार आनंद देऊळगावकर यांच्या संयुक्त पथकाने वासरी व शंकतीर्थ या परिसरात छापा टाकून प्रत्येक सात लाख रुपयांच्या पाच बोटी, दोन लाख रुपयांचे तराफे, तीन लाखांचे वाळू उपसा इंजिन, वीस लाखांचा मोठा फायबर असा एकूण ६० लाखांचा मुद्देमाल नष्ट केला. हि कारवाई पोलीस निरीक्षक धीरज चव्हाण, तहसीलदार आनंद देऊळगावकर, मारोतराव जगताप ,विश्वनाथ बोधमवाड, बाबुराव मुळेकर, राजू चव्हाण, गंगाधर मोरे, शेषराव कोटूरवार, राजकुमार मस्के, गोपाल माने, मनोज वाघमारे सर्व ग्राम महसूल अधिकारी, पोलीस हेड कॉन्स्टेबल अंगद कदम, पोह-कवठेकर, पोकॉ रंजीत वानोळे, पोकॉ- संदीप कारामुंगे, पोकॉ अरविंद सिंगारपुतळे, पोकॉ गणपत बोरकर, महसूल सेवक,सुल्तान पठाण, कोकणे, पोलीस पाटील प्रताप पवार, टील, शुभांगी येडे व भावेश्वर मुंगल यांच्या पथकाने केली.

# वाळू माफिया विरोधात प्रशासनाची धडक कारवाई

**तभा वृतसेवा**
**नरसी, दि. ५ नोव्हेंबर-**

मागील काही दिवसांपासून लोहा व मुदखेड तालुक्यातील चोरटे वाळू माफिया नायगाव, उमरी व मुदखेड तालुक्यात गोदावरी पात्रात टायटॅनिक जहाजा सारख्या मोठ मोठ्या सक्शन पंपांच्या सहाय्याने अवैध वाळू उपसा करत असल्याची बातमी दै.तरुण भारत मध्ये प्रकाशित केली होती. या वृत्तानंतर आज बुधवारी दि. ५ नोव्हेंबर रोजी पहाटे महसूल विभागाने धाडसी पाऊल उचलत बरबडा, अंतरगाव परिसरात पाठलाग करून थरारक कारवाई करत दोन फायबर बोटी जप्त करून थेट स्फोटक लावून उडवल्या. या कारवाईने वाळू माफियांमध्ये चांगलीच धांदल उडाली आहे.

गोदावरी पात्रातून अवैधरीत्या उपसली जाणारी वाळू येळी, कौडगाव, नांदगाव, चिंचोली, कामळज,ईळेगाव ,आदी ठिकाणी





तरुण भारत इफेक्ट

विकली जात असल्याचे उघड झाले होते. माफियांचे हे मोठे रॅकेट नायगाव व उमरी महसूल अधिकाऱ्यांना चकवत होते. बुधवारी पहाटे नायगाव तालुक्यातील बरबडा वाडी येथून नदीपात्रातून जाणारी बोट गस्त घालणाऱ्या पथकास दिसली त्यानंतर त्या बोटीचा सहाय्याने बोटीनेच पाठलाग केला असता लपवून ठेवलेल्या दोन बोटी उमरी तालुक्यातील येळेगावच्या हद्दीमध्ये दिसून आल्याने नायगाव व उमरी येथील महसूल विभागाने एकत्र येऊन संयुक्त कारवाई केली.

दि.५ नोव्हेंबर रोजी बुधवारी पहाटे ४.३० वाजता धर्माबादचे उपविभागीय अधिकारी दाभाडे, बिलोलीच्या उपविभागीय अधिकारी सौ. क्रांती डोंबे, नायगावच्या तहसीलदार सौ. धम्मप्रिया गायकवाड, उमरीच्या महसूल अधिकाऱ्यांसह मंडळ अधिकारी आरु, मंडळ अधिकारी कावळे, तलाठी हसनापल्ले आणि चालक तुकाराम पुरी यांनी बरबडा-अंतरगाव परिसरात दोन्ही बाजूंनी वेढा घालून थरारक कारवाई केली.

या कारवाईत दोन फायबर बोटी नदीपात्रात आढळल्याने त्या जप्त करण्यात आल्या आणि त्यानंतर स्फोटकांच्या सहाय्याने ब्लास्ट करून त्यांना नष्ट करण्यात आले. या कारवाईने वाळू माफियांचे कंबरडे मोडले आहे. महसूल विभागाने केलेली कारवाई व दै. तरुण भारत ने घेतलेला बातमीचे चे सर्वत्र कौतुक होत आहे.

## ज्युदो स्पर्धेत ऋतुराज केंद्रेसह नागेश लुटेला सुवर्ण पदक




**नांदेड** -कंधार तालुक्यातील दिग्रस बु. येथील श्री शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील खेळाडूंनी सुवर्ण पदके पटकावत विद्यालयाचा नावलौकीक केला आहे. नुकतेच विभागीय ज्युदो स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेत विद्यालयातील इयत्ता अकरावीमध्ये शिकत असलेल्या ऋतुराज केंद्रे या खेळाडूने ४० किलो वजन गटात तर नागेश लुटे या खेळाडूने ६० किलो वजन गटात प्रथम क्रमांक घेत सुवर्ण पदक पटकाविले. खेळाडूंच्या या यशाबद्दल शालेय समिती अध्यक्ष विश्वंभर पाटील, मुख्याध्यापक एच.एस. बोड्डावार, पर्यवेक्षक बी.डी. होनराव यांच्यासह नारायण लुटे व मित्र मंडळाने अभिनंदन केले आहे.

## भाजप बाऱ्हाळी मंडळ अध्यक्षपदी मनोज कांबळे यांची नियुक्ती

**मुखेड-**भारतीय जनता पार्टी च्या आ.डॉ.तुषार राठोड यांच्या नेत्रत्वात मुखेड येथे झालेल्या कार्यकर्ता मेळाव्यात बा-हाळी मंडळ अनुसूचित



जाती अध्यक्ष पदावर मनोज गोविंदराव कांबळे सावरगावकर यांची नियुक्ती करण्यात आली असुन नियुक्तीचे पत्र भाजप बा-हाळी मंडळ अध्यक्ष बालाजी पाटील सकनुरकर यांनी दिली. मनोज कांबळे यांनी मागील काळात भाजपाचे आमदार डॉ.तुषार राठोड यांच्या नेत्रत्वात सामाजिक, राजकिय क्षेत्रात केलेल्या महत्वपूर्ण कामाची दखल घेऊन ही नियुक्ती दिली आहे. दिलेल्या नियुक्ती मुळे पक्ष संघटन अधिक मजबूत करण्यास तसेच पक्षविस्तारासाठी यांचे काम उल्लेखनीय रहाणार आहे. या नियुक्तीबद्दल मनोज कांबळे यांचे विविध स्तरातून अभिनंदन होत असून, त्यांच्या पुढील कार्यास अनेकांनी शुभेच्छा देत आहेत.

## संभाजी ब्रिगेड पार्टीच्या तालुकाध्यक्षपदी सारंग मिराशे

**नांदेड-**संभाजी ब्रिगेड पार्टीच्या तालूकाअध्यक्षपदी येथील सामाजिक कार्यकर्ते सारंग पाटील मिराशे यांची निवड करण्यात आली आहे. सदर निवडीचे पत्र जिल्हाध्यक्ष कमलेश पाटील कदम यांच्या हस्ते त्यांना नुकतेच देण्यात आले आहे. सारंग मिराशे हे गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक चळवळींमध्ये काम करतात. त्यांच्या कार्याची दखल संभाजी ब्रिगेड या सामाजिक संघटनेने घेतली असून त्यांच्या निवडीबद्दल त्यांच्या मित्र परिवारांतून अभिनंदन केले जात आहे.

# जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्रचार्यजी यांच्या पादुका दर्शन सोहळ्याचे हदगावात आयोजन

**तभा वृतसेवा**
**हदगाव/ निवघा बा., दि. ५ नोव्हेंबर-**

जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज संस्थानच्या अंधश्रद्धा निर्मूलन उपक्रमांतर्गत अनंत श्री विभूषित जगद्गुरु रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्यजी रामानंदाचार्य दक्षिणपीठ नाणिजधाम यांचा पादुका दर्शन सोहळा व प्रवचन दर्शन सोहळ्याचे आयोजन शुक्रवार दि.७ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ९ वाजता हदगाव शहरातील नांदेड रोड ,बी. एस.एन.एल. कार्यालयासमोर, हदगाव शहर जिल्हा नांदेड येथे करण्यात आले आहे अशी माहिती मराठवाडा उपपीठ पीठ प्रमुख जयप्रकाश लोणारी, पीठ व्यवस्थापक सुरेश मोरे, जिल्हा निरीक्षक बजरंग दायमा, जिल्हाध्यक्ष मुंडकर, हदगाव तालुका अध्यक्ष पांडुरंग नरवाडे यांनी दिली. जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्रचार्यजी संस्थांच्या वतीने अनेक सामाजिक उपक्रम राबविले जातात जसे की, ग्राम स्वच्छता अभियान, शैक्षणिक उपक्रमांतर्गत इंग्रजी माध्यमांची मोफत शाळा, मोफत वेदपाठ शाळा, रक्तदान शिबिर ,वैद्यकीय उपक्रमांतर्गत



मोफत दवाखाना, मरणोत्तर देहदान ,मोफत रुग्णवाहिका सेवा महाराष्ट्रात विविध महामार्गावर ५३ रुग्णवाहिका २४ तास अखंडपणे अपघातग्रस्तांच्या सेवेत कार्यरत आहेत.

या कार्यक्रमानिमित्त हदगाव शहरातून जगद्गुरुश्रींच्या पादुकांची भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे. यामध्ये विविध देखावे यांचे सादरीकरण होणार आहे. जगद्गुरुश्रींच्या पादुकांचे संतपिठावर आगमन झाल्यानंतर विविध कार्यक्रम संपन्न होणार आहेत. यामध्ये गुरु पूजन, उपासक दीक्षा, आरती सोहळा, जगद्गुरुश्रींचे प्रवचन,प्रवचनकाराचे अमृततुल्य प्रवचन, दर्शन सोहळा, पुष्पवृष्टी असे विविध कार्यक्रम संपन्न होणार आहेत.

तसेच उपस्थित मान्यवर यांच्या हस्ते सामाजिक उपक्रमांतर्गत समाजातील गरजवंतांना २९ मोफत शिलाई मशीनचे वाटप करण्यात येणार आहे. यासाठी दिवसभर येणाऱ्या सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आलेले आहे. या नयनरम्य सोहळ्यासाठी जिल्हा सेवा समितीचे सर्व पदाधिकारी, तालुका सेवा समितीचे पदाधिकारी,सेवा केंद्र समितीचे पदाधिकारी , आरती केंद्र समितीचे पदाधिकारी,युवासेना, हिंदू संग्राम सेना, महिला सेना, प्रवचनकार, गुरु सेवक ,प्रोटोकॉल अधिकारी, आजी व माजी पदाधिकारी यांची उपस्थिती असणार आहे. या कार्यक्रमासाठी जिल्ह्यातील जास्तीत जास्त भक्तगण, उपासक, साधक ,शिष्य ,हितचिंतक यांनी सहकुटुंब सहपरिवार उपस्थित राहून या नयनरम्य सोहळ्याचा लाभ घ्यावा असे आवाहन पीठ प्रमुख, पीठ व्यवस्थापक, जिल्हा निरीक्षक, जिल्हा अध्यक्ष, जिल्हा समितीचे पदाधिकारी, तालुका समितीचे पदाधिकारी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# तथागत नगर येथील विहाराकडे जाणाऱ्या रस्त्यावर कचऱ्याचे ढिगारे



**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ५ नोव्हेंबर-**

शहरातील तथागतनगर येथील मुलगंध कुटी विहाराकडे जाणाऱ्या मार्गावर मोठ्या प्रमाणात कचऱ्याचे ढिगारे निर्माण झाले असून, यामुळे परिसरातील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

शहरातील तथागत नगर भागातील मुलगंध कुटी विहाराकडे जाणाऱ्या मार्गावर मागील अनेक दिवसांपासून कचऱ्याचे ढिगारे साचलेले आहेत. यामुळे विहाराकडे जाणऱ्या उपासकांना, परिसरातील नागरिकांना या कचऱ्याच्या दुर्गंधीचा मोठा त्रास सहन करावा लागत असून, यामुळे आरोग्याचा प्रश्न देखील निर्माण झाला आहे. या मार्गावरील कचरा उचलण्यात यावा, अशी मागणी परिसरातील नागरिकांनी अनेकवेळा महापालिकेकडे केली. परंतु त्यांच्या या मागणीकडे दुर्लक्ष होत असल्याने नागरिक संताप व्यक्त करत असून, तातडीने उचलावा, अशी मागणी होत आहे.

# मुदखेड येथे वंदे मातरम् गीत सामूहिक गायन कार्यक्रम

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. ६ नोव्हेंबर-**

वंदे मातरम हे गीत भारताचे राष्ट्रीय गीत आहे त्याची रचना बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी १८७५ मध्ये केली होती.

वंदे मातरम हे गीत भारताचे गौरवशाली प्रतीक आहे. हे गीत गाताना आपल्या देशभक्तीची आणि राष्ट्रीय एकतेची जाणीव होते.

वंदे मातरम या गीताला १५० वर्ष झाल्याच्या उपलक्ष्यात महाराष्ट्र सरकारने विशेष कार्यक्रम आयोजित करण्याचा निर्णय घेतला आहे. त्या अनुषंगाने दिनांक ७ नोव्हेंबर रोजी शहरातील क्रीडा संकुल मैदान येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला मुदखेड तालुका प्रशासन, शाळा, महाविद्यालये, आणि विविध शैक्षणिक संस्था सहभागी होणार असून दिनांक ७ नोव्हेंबर रोजी सकाळी ९:३० वाजता शहरातील क्रीडा संकुल मैदान येथे सामूहिक गायन कार्यक्रम होणार आहे. अशी माहिती (बंदा बैरागी बंदा सिंघजी बहादुर) शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य एस.एस.परघणे यांनी दिली आहे.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी तहसीलदार आनंद देऊळगावकर यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन समिती गटित करण्यात आली असून या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

# मांजरम जिल्हा परिषद गटात ऐश्वर्या रातोळीकर यांची उमेदवारी चर्चेत

**तभा वृतसेवा**
**नरसी, दि. ६ नोव्हेंबर-**

नायगाव तालुक्यातील जिल्हा परिषद मांजरम गट हा यंदा अनुसूचित जाती (महिला) राखीव ठरल्यानंतर राजकीय समीकरणांना वेग आला आहे. या गटात राष्ट्रवादी (अजित पवार गट)काँग्रेस पार्टीने सर्वात आधी तयारी सुरू करत वातावरण आपल्या बाजूने वळवण्याची मोहिम हाती घेतली आहे.



राष्ट्रवादीकडून रातोळी येथील माजी उपसरपंच तथा भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे सदस्य गंगाधर पटने रातोळीकर यांच्या कन्या कु. ऐश्वर्या गंगाधर पटने रातोळीकर यांनी उमेदवारीसाठी अर्ज दाखल केला आहे. यांनी पक्षाकडे केलेल्या उमेदवारी अर्जामुळे या गटात राजकीय रंगत वाढली असून ऐश्वर्या रातोळीकर राष्ट्रवादीकडील प्रबळ दावेदार ठरणार आहेत.

नुक्तेच नायगाव येथे झालेल्या आढावा बैठकीत माजी सरपंच गंगाधर पटने रातोळीकर यांनी आपल्या कन्येचा अर्ज पक्षश्रेष्ठींकडे सुपूर्द केला. यावेळी विश्वंभर पाटील, दत्तराम पाटील, नंदू पाटील, ताजुद्दीन, विलास पाटील, सतीश ईंगोले, मुकदम बालाजी पाटील, अंकुश पाटील, राम पाटील, शंकरराव पांचाळ, शंकरराव गोपछडे आदी उपस्थित होते.

जि.एन.एम. पदवीधर असलेल्या ऐश्वर्या रातोळीकर या उच्चशिक्षित, मितभाषी व शिस्तप्रिय कार्यकर्त्या म्हणून ओळखल्या जातात. त्यांच्या नेतृत्वात गडगा, टेंभुर्णी, मरवाळी, माहेगाव, कोलंबी, दरेगाव, आंचोली, मांजरम, मोकासदरा, लालवंडी, नरंगल आदी गावांमध्ये जनसंपर्क मोहिमेचा पहिला टप्पा पूर्ण करण्यात आला आहे.

माजी उप सरपंच गंगाधर पटने रातोळीकर यांनी आपल्या कार्यकाळात गावोगावी जाऊन सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी प्रशासनाशी थेट संवाद साधला.

# देगलूर नगरपरिषदेच्या रणांगणात होणार तिरंगी झुंज!

**मिलिंद वाघमारे**
**देगलूर, दि. ५ नोव्हेंबर-**

आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीचे बिगुल वाजले असून काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) आणि भारतीय जनता पार्टीकडून जय्यत तयारी चालू आहे. सध्या स्थानिक नेत्यांच्या हालचालीचा वेग वाढला असून यंदा तिरंगी लढत होण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. यात काँग्रेस, भाजप आणि राष्ट्रवादी आमने-सामने असतील तर इतर पक्षांची भूमिकाही निर्णायक ठरणार असल्याचे बोलले जात आहे.

देगलूर शहर तेलंगणा, कर्नाटक आणि महाराष्ट्र राज्याच्या त्रिसीमेवर वसलेले असून नांदेड शहरानंतर महत्वाचे म्हणून शहर म्हणून देगलूरची ओळख आहे. नुकतेच नगरपरिषद आणि नगरपंचायतीच्या निवडणुकीचे वेळापत्रक जाहीर झाल्याने स्थानिक नेत्यांकडून निवडणूकच्या परिक्षेचे अभ्यास आणि व्यूहरचना आखली जात आहे. सध्या राजकीय हालचालींना चांगलेच वेग आले असून हेवेदावे, गटबाजी, पक्षांतर आणि आरोप-प्रत्यारोप हे देगलूरांच्या चर्चेचा केंद्रबिंदू ठरत आहेत. राजकीय वर्तुळात दिवसेंदिवस बदल होत असले तरी यंदाची निवडणूक मात्र चुरशीची होण्याची शक्यता राजकीय विश्लेषकांकडून व्यक्त केली जात आहे. यामध्ये प्रामुख्याने काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि भारतीय जनता पार्टी हे पक्ष आघाडीवर आहेत. परंतु शिवसेना (एकनाथ शिंदे गट), शिवसेना (उबाठा गट), वंचित बहुजन आघाडी, ए.आय.एम.आय.एम आणि विविध सामाजिक संघटना यांची भूमिकाही तेवढीच निर्णायक ठरणार आहे.




भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाकडून मनोरमा मष्णाजी निलमवार यांचे नाव नगराध्यक्ष पदाचे उमेदवार म्हणून प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या उपस्थितीत अधिकृत घोषणा करण्यात आली. तर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) या पक्षाकडून विजयमाला बालाजी टेकाळे यांचे नाव जवळपास निश्चित असल्याचे सांगण्यात येते. सध्या भारतीय जनता पार्टीकडून अद्याप नगराध्यक्ष पदाचा उमेदवार घोषित करण्यात आलेला नसला तरी देगलूर येथील मोंढा मैदानावर दि. ०३ नोव्हेंबर रोजी संपन्न झालेल्या जनसंवाद सभेत प्रामाणिक आणि स्वच्छ प्रतिमेचा उमेदवार घोषित करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले त्यामुळे भाजपाचा नगराध्यक्ष पदाचा उमेदवार कोण? ही उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. भाजपाच्या सर्वेक्षणात आघाडीवर असणाऱ्या उमेदवाराच्याच गळ्यात नगराध्यक्ष पदाच्या उमेदवाराची माळ पडणार हे मात्र निश्चित!

प्रशासकीय आकडेवारीनुसार देगलूर शहरात २२ हजार ७८२ पुरुष मतदार तर २२ हजार ४६५ महिला मतदार आहेत. तब्बल ४५ हजार २४७ मतदार आगामी निवडणुकीत सत्तावीस लोकप्रतिनिधींच्या जागेचे भविष्य ठरवणार आहेत. त्यामुळे तुर्तास तरी मतदारांचे भाव वधारले आहे. परंतु सध्या राजकीय आरोप-प्रत्यारोप आणि पक्षांतराचे सत्र चालूच आहे. त्यामुळे येणाऱ्या निवडणुकीत मतदारराजा कोणावर दिलदार होणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. शहरातील तरुणांच्या रोजगाराचा प्रश्न, महिलांच्या सक्षमीकरणाची मुद्दा, शैक्षणिक संकुलाची उभारणी, नाली, रस्ते,पाणी, वीजपुरवठा आणि गटार योजना यासारखे मूलभूत प्रश्न कोणत्या पक्षाचा अजेंडा असणार आहे. मागील काळात त्या-त्या पक्षांची आणि प्रतिनिधींची भूमिका काय राहीली आहे याचाही विचार मतदारराजा करणार असल्याचे सांगण्यात येते आहे. त्यामुळे आतातरी राजकीय भाकित करणे अवघड आहे मात्र ही निवडणूक चुरशीची होणार असल्याची चर्चा आहे.

मागील काळात काँग्रेसची सत्ता नगरपरिषदेवर होती. त्यामुळे सत्तेतील कामगिरीचा आलेख माजी नगराध्यक्ष मोगलाजी शिरशेटवार आणि त्यांच्या शिलेदारांकडून जनतेसमोर ठेवले जाईल. तर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांच्याकडून लक्ष्मीकांत पदमवार हे राष्ट्रवादीच्या रथाचा सारथी म्हणून भूमिका कशी वटवणार ? यावरही भवितव्य ठरवणार आहे. तसेच देशात आणि राज्यात भारतीय जनता पार्टीची सत्ता असल्याने स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीतही सत्ता प्रस्थापनेसाठी प्रयत्नाची पराकाष्ठा केली जाईल. सध्या देगलूर - बिलोली मतदारसंघाचे आमदार जितेश अंतापुरकर यांच्या माध्यमातून सत्तेची समीकरणे कशी आखली जातील, भाजपातील जुन्या-नव्या पदाधिकाऱ्यांचे सूर जुळविण्यावरही विजयाची गणित ठरणार आहे. राज्यसभेचे खा. अशोक चव्हाण आणि खा. डॉ. अजित गोपछडे यांच्या नेतृत्वाची परीक्षा असणार आहे. तसेच संघाच्या तत्वप्रणालीचा अवलंब करीत निवडणूक लढविल्यास नगरपरिषदेवर कमळ फुलण्यासाठी शक्यता आहे. त्यामुळे आगामी निवडणुकीत विविध घटकांची गोळाबेरीज करीत राजकीय समीकरणे जुळवणाऱ्यांवर आघाडीच्या पक्षाकडून भर दिला जाईल. त्याचबरोबर शिवसेना (एकनाथ शिंदे गट) पक्षात बालाजी पाटील खतगावकर यांच्यामार्फत राजकीय हालचाली होत आहेत, परंतु त्या कितपत यशस्वी ठरतील हे सांगणे कठीण आहे. तर शिवसेना (उबाठा गट) हे पक्ष महाविकास आघाडीसोबत असल्यास काँग्रेस पक्षाला बळ मिळेल पण मुस्लिम समाजाची नाराजी भोवल्यास विजयाची वाटचाल खडतर होण्याची शक्यता आहे. याचाच फायदा घेत ए.आय.एम.आय.एम नगराध्यक्ष पदाचा उमेदवार देणार का? याकडे जनतेचे लक्ष लागले आहे. तर वंचित बहुजन आघाडीने आजतागायत स्पष्ट भूमिका घेतलेली नाही. स्थानिक नेते आणि कार्यकर्ते संभ्रमात पडले असल्याची माहिती समोर आली आहे. एकूणच या सर्व घडामोडींचा विचार केल्यास तिरंगी लढत होईल परंतु निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काही इतर पक्षांचे व संघटनांचे मनोमिलन झाल्यास चौथी आघाडी सुद्धा निर्माण होऊ शकेल. असे घडल्यास आश्चर्याचे कारण नाही.

## टि.सी. हरवली

माझी कोमल अशोक कुंटे हिची १२ विज्ञान शाखा उत्तीर्ण श्री छत्रपती शिवाजी ज्युनिअर कॉलेज मुक्रामाबाद ता. मुखेड जि. नांदेड या महाविद्यालयात उत्तीर्ण झालेली मुक्रामाबाद ते देगलूर बसने प्रवास करताना हरवली आहे.

**संपर्क**
**सत्यम नगर, देगाव रोड देगलूर**
**मो. ८८५५९२३६०६**

## किनवट शिक्षण संस्था, किनवट

F175

## सभेची सुचना

दि.०६.११.२०२५

सर्व सभासदांस कळविण्यात येते की दिनांक २३.११.२०२५ मंगळवार रोजी सकाळी १०.०० वा. बळीराम पाटील महाविद्यालय, गोकुंदा ता.किनवट जि. नांदेड येथे संस्थेच्या कार्यालयात सर्वसाधारण सभा प्रफुल्ल प्रकाश राठोड यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात येईल तरी सभासदांनी वेळेवर उपस्थित रहाण्याची कृपा करावी.

**सभेपुढील विषय:**
१) मागील वृत्तात वाचून कायम करणे.
२) कार्यकारी मंडळातील सभासदांची निवड करण्यासाठी निवडणूक कार्यक्रमाप्रमाणे निवडणूक घेणे बाबत.
३) अध्यक्ष साहेबांच्या परवानगीने आयत्यावेळी येणारे विषय.

**शंकर चाडावार**
**सचिव**
**किनवट शिक्षण संस्था,**
**किनवट जि. नांदेड**

CMYK

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## वंदे मातरम सामूहिक गीत गायनाचे आयोजन

तभा वृत्तसेवा
तुळजापूर, दि.६ नोव्हेंबर -
शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्य विभाग आणि सांस्कृतिक कार्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दि.७ नोव्हेंबर रोजी राज्यातील सर्व शासकीय आयटीआय मधील मैदान व क्रीडा संकुल या ठिकाणी एकाच वेळी वंदे मातरम या गीतास १५० वर्ष पूर्ण झाली असल्याने साध शताब्दी महोत्सव साजरा करण्यात येत आहे. जनमानसात देशभक्तीची भावना या गीताने रुजवावी या हेतूने महाराष्ट्रातील सर्व तालुक्यांमध्ये या सामुदायिक गीताचे समूह गान, लघु नाटिका सादरीकरण, प्रमुख वक्याची मार्गदर्शन इत्यादी उपक्रम राबवले जाणार आहेत. शिक्षणमहर्षी सीना आलूरे गुरुजी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांच्या वतीने तालुका क्रीडा संकुल तुळजापूर येथे सकाळी ९.३० वाजता तहसीलदार तुळजापूर यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे.

तसेच सर्व शासकीय कार्यालयाचे प्रमुख, कर्मचारी, शहरातील सर्व शाळा, महाविद्यालयाचे प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी व सर्व नागरिक असे जवळपास ५००० जण उपस्थित राहणार आहेत.

## संक्षिप्त वृत्त...



### उद्धव ठाकरे यांचा शेतकरी संवाद दौरा; करजखेडा येथे बळीराजांशी थेट संवाद

धाराशिव, दि.६ नोव्हेंबर -
पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या मराठवाडा संवाद दौऱ्याच्या दुसऱ्या दिवशी, त्यांनी धाराशिव जिल्ह्यातील करजखेडा येथे शेतकरी बांधवांशी संवाद साधला. या संवादादरम्यान शेतकऱ्यांनी अतिवृष्टी आणि नुकसानीबाबत आपली व्यथा मांडली. अतिवृष्टीच्या काळात मदत तर सोडाच, पण कुठलाही मंत्री आमच्या भागात फिरकला नाही, अशी खंत शेतकऱ्यांनी व्यक्त केली. बळीराजांचे म नोबल वाढवत उद्धव ठाकरे म्हणाले, संकट कितीही गंभीर असलं तरी खचायचं नाही, आत्मविश्वास ठेवा; शिवसेना सदैव तुमच्या सोबत आहे. या कार्यक्रमास शिवसेना नेते चंद्रकांत खैरे, अंबादास दानवे, आमदार मिलिंद नार्वेकर, खासदार ओमराजे निंबाळकर, जिल्हाप्रमुख आमदार कैलास पाटील आणि इतर पदाधिकारी उपस्थित होते.



### सागर शेट्टी यांच्या कन्येचा वाढदिवस आश्रमशाळेत साजरा

तुळजापूर, दि.६ नोव्हेंबर -
सोलापूर येथील तरुण व्यापारी सागर रमण शेट्टी यांच्या कन्या श्रीजा हिचा पहिला वाढदिवस तुळजापूर येथील एकलव्य आश्रम शाळेत साजरा करण्यात आला. अवांतर खर्च टाळून, बॅनरबाजी न करता आणि अत्यंत साधेपणाने साजरा झालेल्या या वाढदिवस उपक्रमाने सर्वांचे लक्ष वेधले. रमण शेट्टी कुटुंबीयांनी आश्रम शाळेत येऊन तेथील सर्व विद्यार्थ्यांना मिष्ठान्न भोजन दिले. विद्यार्थिनींनी श्रीजाचे औक्षण करून तिला वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. समाजातील वंचित घटकांशी आनंद वाटण्याचा आणि सामाजिक दायित्व जपण्याचा हा उपक्रम सर्वांसाठी प्रेरणादायी ठरला. या प्रसंगी मुख्याध्यापक विठ्ठल म्हेत्रे, फुलाजी ताटीकुंडलवार, बालाजी भांडेकर, मयूर अंतरेड्डी, अशोक राठोड, रमाकांत पवार, सुनिता राठोड, लक्ष्मी पवार, अनिल घुगे, अशोक बनकर, दयानंद भडंगे, अण्णासाहेब मगर, हरीश मगदूम, तसेच सोलापूर येथील वैजनाथ शेट्टी, सागर शेट्टी, सोमनाथ शेट्टी यांच्यासह विद्यार्थी आणि कर्मचारी उपस्थित होते.



### सरस्वती सेंद्रिय शेतकरी गटामार्फत महिला शेतकऱ्यांना ज्वारी बियाण्यांचे वाटप

अणदूर, दि.६ नोव्हेंबर -
अणदूर येथील सरस्वती सेंद्रिय शेतकरी गटाच्या मार्गदर्शनाखाली, गटातील महिला शेतकऱ्यांना राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियान अंतर्गत कृषी विभागाच्या वतीने रब्बी ज्वारीचे मोफत बियाणे वाटप करण्यात आले. हा गट महिलांना शेतीत स्वावलंबी बनविण्यासाठी, तसेच शासनाच्या विविध कृषी योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी सातत्याने कार्यरत आहे. सेंद्रिय शेतीबाबत नवनवीन तंत्रज्ञान महिलांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य देखील या गटामार्फत होत आहे. गटाच्या अध्यक्ष बाबई लक्ष्मण चव्हाण आणि सचिव विजया नेमिनाथ कंदले यांच्या प्रयत्नातून गटातील २५ महिला सदस्यांना प्रत्येकी ४ किलो महाबीज सुधारित ज्वारीचे बियाणे मोफत देण्यात आले. या वाटप कार्यक्रमावेळी गटातील सर्व महिला शेतकरी उत्साहाने उपस्थित होत्या.



### उमेश कदम याचे विभागीय स्पर्धेत यश

परंडा, दि.६ नोव्हेंबर -
लातूर येथे पार पडलेल्या विभागीय मैदानी क्रीडा स्पर्धेत कल्याणसागर माध्यमिक विद्यालय, डोमगाव (ता. परंडा) येथील इयत्ता दहावीचा विद्यार्थी उमेश नवनाथ कदम याने १७ वर्षाखालील गोळाफेक स्पर्धेत विभागात द्वितीय क्रमांक पटकावला आहे. या उल्लेखनीय काम गिरीमुळे उमेश कदम याची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. विजयी विद्यार्थ्याला क्रीडाशिक्षक राजाभाऊ शिंदे आणि अंगद लांडगे यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष आमदार सुजितसिंह ठाकूर यांनी उमेश कदम याचा सत्कार करून त्याला शुभेच्छा दिल्या. यावेळी संस्थेच्या सचिवा प्रज्ञाताई कुलकर्णी, कल्याणसागर समूहाचे मार्गदर्शक विकास आप्पा कुलकर्णी, मुख्याध्यापक सुबोधसिंह ठाकूर, तसेच चंद्रकांत पवार, किरण गरड, समरजीतसिंह ठाकूर आदी मान्यवर उपस्थित होते.

# महायुतीत दोस्ती की कुस्ती? : परंडा नगरपरिषदेच्या निवडणुकीत रंगणार चुरस



### परंडा न.प. निवडणूक कार्यक्रम

उमेदवारी अर्ज भरण्याची सुरुवात: १० नोव्हेंबर, अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत: १७ नोव्हेंबर, मतदान दिनांक: २ डिसेंबर, पदे: १ नगराध्यक्ष, २० नगरसेवक.

### जाकीर सौदागर यांना रोखण्यासाठी नेते एकत्र ..

माजी आमदार सुजितसिंह ठाकूर (भाजप), राहुल मोटे (राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट), रणजीत ज्ञानेश्वर पाटील (शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गट), माजी नगराध्यक्ष सुभाषसिंह सद्दिवाल, रमेशसिंह परदेशी, नुरुद्दीन चौधरी, आणि हनुमंत वाघमोडे यांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे.

तरुण भारत राजकीय दंगल

तभा वृत्तसेवा / आप्पासाहेब शिंदे
परंडा, दि.६ नोव्हेंबर -
परंडा नगरपरिषदेची निवडणूक काही दिवसांवर येऊन ठेपल्याने शहरातील राजकीय वातावरण दिवसेंदिवस तापत आहे. सत्ताधारी शिवसेना (शिंदे गट) कडे सर्वाधिक इच्छुक उमेदवारांचा ओढा दिसून येत आहे.

मागील लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीच्या वेळी भाजप, शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांची युती होती. परंतु, यावेळी नगरपरिषद निवडणुका कार्यकर्त्यांच्या आहेत असे म्हणत शिवसेना (शिंदे गट) स्वतंत्रपणे लढण्याची रणनीती आखत आहे. त्यामुळे सत्तेत राहण्यासाठी एकत्र फिरणाऱ्या महायुतीच्या नेत्यांना आता एकम कांविरोधात लढावे लागणार आहे.

दरम्यान, शिवसेना (शिंदे गट) चे प्रभावशाली नेते व माजी नगराध्यक्ष जाकीर सौदागर यांना रोखण्यासाठी सर्वपक्षीय नेतेमंडळी मोठी कसरत करत असल्याचे दिसते.

राज्य निवडणूक आयोगाने नगरपरिषदेच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करताच पुन्हा नगराध्यक्ष जाकीर सौदागरच! असे बॅनर झळकू लागले. त्यामुळे शहरात राजकीय वातावरण अधिकच तापले आहे. माजी मंत्री आणि आमदार तानाजीराव सावंत यांचे समर्थक असलेले जाकीर सौदागर यांना पराभूत करण्यासाठी माजी आमदार सुजितसिंह ठाकूर (भाजप), माजी आमदार राहुल मोटे (राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट), शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) चे जिल्हाध्यक्ष रणजीत ज्ञानेश्वर पाटील, तसेच माजी नगराध्यक्ष सुभाषसिंह सद्दिवाल, रमेशसिंह परदेशी, नुरुद्दीन चौधरी आणि ॲड. हनुमंत वाघमोडे हे नेते एकत्र येत आहेत.

हम भी कुछ कम नहीं! अशी घोषणा देत ते सौदागर यांना टक्कर देण्यासाठी सज्ज झाले आहेत.

परंडा नगरपरिषदेची निवडणूक यंदा चुरशीची होणार यात शंका नाही. या निवडणुकीत एक नगराध्यक्ष आणि २० नगरसेवक पदांसाठी २ डिसेंबर रोजी मतदान होणार आहे.

सर्वच पक्षांच्या इच्छुक उमेदवारांची धावपळ सुरू झाली असून, जाकीर सौदागर यांनी १० प्रभागांतील उमेदवारांची प्राथमिक यादी निश्चित केली असल्याची माहिती आहे. सध्या तरी त्यांचे पारडे जड असल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे.

## कळंब नगरपालिकेच्या निवडणुकीत राजकीय गोंधळ

### युतीचे गणित अजूनही अनिश्चित...

तभा वृत्तसेवा / परवेज मुल्ला
कळंब, दि.६ नोव्हेंबर -
कळंब नगरपालिकेची निवडणूक जाहीर झाल्यानंतर सर्व राजकीय पक्षांनी स्वबळावर लढण्याची तयारी केली असून कार्यकर्त्यांनी आपल्या प्रभागात जोरदार हालचाली सुरू केल्या आहेत.



मात्र, युतीबाबत अजूनही स्पष्टता नसल्याने अनेक कार्यकर्त्यांची अवस्था कोणता झेंडा हाती घ्यावा? अशी झाली आहे.

नामनिर्देशन दाखल करण्याची प्रक्रिया केवळ दोनच दिवसांवर येऊन ठेपली असताना, काही कार्यकर्ते आपल्या पक्षाकडून तिकीट न मिळाल्यास युतीतील अन्य पक्षाकडून संधी मिळते का याकडे लक्ष ठेवून आहेत.

या गोंधळात काहींना उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर माघारी घ्यावी लागेल अशीही शक्यता वर्तवली जात आहे.

दरम्यान, या अनिश्चिततेमुळे स्थानिक नेतेमंडळींनाही रुसवे-फुगवे सम जावून घेण्यात अडचण येत असून आगामी दोन दिवसांत राजकीय चित्र अधिक स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

### न.प. निवडणुकीत मिरवणुका, सभा व घोषणांवर बंदी

वाशी, दि.६ नोव्हेंबर -
राज्य निवडणूक आयोगाने नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ चा कार्यक्रम जाहीर केल्यानंतर जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. निवडणुकीची प्रक्रिया शांततेत पार पाडण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ अंतर्गत आदेश जारी केला आहे.

या आदेशानुसार ४ नोव्हेंबर ते ३ डिसेंबर या कालावधीत जिल्ह्यातील नगरपरिषद हद्दीत मि रवणुका, सभा, मोर्चे, घोषणा, वाद्यवाजने व निवडणूक प्रचारावर बंदी घालण्यात आली आहे. ही बंदी जिल्हाधिकारी कार्यालय, उपविभागीय व तहसील कार्यालये तसेच सर्व शासकीय विश्रामगृह परिसरात लागू राहणार आहे.

## माजी मंत्री आमदार तानाजीराव सावंत यांचा दोन दिवसीय मतदारसंघ दौरा

### आगामी निवडणुकीची तयारी... संघटन बांधणी व मार्गदर्शन करणार...

तभा वृत्तसेवा
वाशी, दि.६ नोव्हेंबर -
परंडा मतदारसंघाचे आमदार आणि माजी मंत्री तानाजी सावंत हे आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर दोन दिवसीय मतदारसंघ दौऱ्यावर येत आहेत. हा दौरा ७ आणि ८ नोव्हेंबर रोजी होणार असून, या दौऱ्यात ते मतदारसंघातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या बैठका घेऊन आगामी निवडणुकीची तयारी, संघटन बांधणी आणि नगरपरिषद निवडणुकीसाठी मार्गदर्शन करणार आहेत.

दौऱ्याचा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे. ७ नोव्हेंबर रोजी दुपारी १ वाजता भैरवनाथ साखर कारखाना, सोनारी येथे परंडा तालुका ग्रामीण बैठक होईल. सायंकाळी ६ वाजता जाकिरभाई सौदागर यांच्या निवासस्थानी परंडा शहर बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. दि.८ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता साहिल फंक्शन हॉल, भूम येथे भूम नगरपरिषद बैठक, दुपारी १ वाजता त्याच ठिकाणी भूम तालुका ग्रामीण बैठक, तर दुपारी ३ वाजता शिवशक्ती साखर कारखाना, तांदुळवाडी (वाशी) येथे वाशी तालुका व शहर बैठक होणार आहे.



या बैठकींमधून पक्षाची संघटना मजबूत करणे, आगामी निवडणुकांसाठी रणनीती ठरवणे आणि कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करणे हा मुख्य उद्देश असल्याचे सांगण्यात आले. जिल्हाप्रमुख दत्ताअण्णा साळुंखे यांनी सर्व पदाधिकारी, युवासेना व महिला आघाडीच्या कार्यकर्त्यांना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

### मोघा खुर्द येथे हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळा

तभा वृत्तसेवा
लोहारा, दि.६ नोव्हेंबर -
तालुक्यातील मोघा खुर्द येथे अखंड हरिनाम सप्ताह, सामुदायिक ज्ञानेश्वरी पारायण व भागवत कथा ज्ञान यज्ञ सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा भव्य सोहळा दि.७ ते १३ नोव्हेंबर या कालावधीत सद्गुरु वासकर महाराज आणि श्री शिवराम बुवा दिंडेगावकर यांच्या आशीर्वादाने तसेच ह.भ.प. संत मारुती महाराज कानेगावकर व ह.भ.प. ज्ञानेश्वर माऊली महाराज अचलबेट येथे संपन्न होणार आहे.

कार्यक्रमात कीर्तन, भजन, गाथा, हरिपाठ व भागवत कथा यांचे आयोजन करण्यात आले असून घनराज महाराज रिंगणीकर, कुलदीप सूर्यवंशी महाराज, सागर बोराटे महाराज, नितीन जगताप महाराज, संकेत यादव महाराज, तुकाराम हजारे महाराज आणि गणेश सोनवणे महाराज यांचे कीर्तन होणार आहे.

## ऐन निवडणुकीच्या तोंडावर भाजपला धक्का...

# माजी नगरसेवक संजय बताले यांचा राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) मध्ये प्रवेश

तभा वृत्तसेवा
नळदुर्ग, दि.६ नोव्हेंबर -
नळदुर्ग शहरातील ज्येष्ठ नेते, जय हिंद प्रतिष्ठानचे अध्यक्ष आणि माजी नगरसेवक संजय बताले यांनी भाजपला सोडचिठ्ठी देत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटात प्रवेश केला आहे. नगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर झालेला हा प्रवेश भाजपसाठी मोठा धक्का मानला जात आहे.

नगरपालिका निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर सर्वच पक्ष प्रचार आणि उमेदवारी तयारीत व्यस्त आहेत. त्याचवेळी नळदुर्गमध्ये संजय बताले यांच्या निर्णयामुळे राजकीय समीकरणात बदल होण्याची चिन्हे आहेत.



संजय बताले यांचा प्रवेश मुंबई येथे झाला असून, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटाचे राष्ट्रीय अध्यक्ष व राज्याचे उपमुख्यमंत्री ना. अजित पवार आणि प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांच्या उपस्थितीत त्यांचा आणि त्यांच्या समर्थकांचा जाहीर पक्षप्रवेश झाला.

यावेळी ना. दत्ता भरणे, आमदार विक्रम काळे, माजी आमदार राहुल मोटे, प्रदेश उपाध्यक्ष सुरेश बिराजदार, प्रदेश सचिव गोकुळ शिंदे, अल्पसंख्यांक विभागाचे उपाध्यक्ष शफीभाई शेख, धाराशिव जिल्हाध्यक्ष महेंद्र धुरगुडे, तुळजापूर तालुका अध्यक्ष बबलु सुर्यवंशी, नळदुर्ग शहराध्यक्ष अजित जुनेदी, समीर मोरे व उमर शेख उपस्थित होते.

संजय बताले यांच्यासोबत रवी राठोड, विनायक जाधव, आनंद पवार, योगेश सुरवसे, बापु दुरुगकर, मुन्ना इनामदार, ॲड. लखन इंगोले आदी कार्यकर्त्यांनीही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला.

संजय बताले यांना राजकारणाचा त्रिकालीन अनुभव असून, त्यांनी तीन कार्यकाळ नगरसेवक म्हणून यशस्वीपणे काम केले आहे. नळदुर्ग शहरात त्यांचा व्यापक जनसंपर्क आणि प्रभाव लक्षात घेता, त्यांच्या पक्षप्रवेशामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार गट) ला आगामी नगरपालिका निवडणुकीत राजकीय बळकटी मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## तुळजाभवानी मंदिरात त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त दीपोत्सव

### जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते कल्लोळ तीर्थाचे पूजन

तभा वृत्तसेवा
तुळजापूर, दि.६ नोव्हेंबर -
त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त श्री तुळजाभवानी मंदिरात भक्तिमय वातावरणात दीपोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. पारंपरिक श्रद्धा, दिव्यांच्या तेजाने उजळलेला मंदिर परिसर आणि भक्तांची गर्दी यामुळे संपूर्ण परिसरात धार्मिक उत्सवाचे वातावरण निर्माण झाले होते.

श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानचे अध्यक्ष व जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी सपत्नीक कल्लोळ तीर्थाचे पूजन केले. त्यानंतर मंदिर परिसरात दीपोत्सवाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी सौम्यश्री पुजार, तहसीलदार व व्यवस्थापक (प्रशासन) माया माने, सहायक व्यवस्थापक (धार्मिक) अमोल भोसले, लेखापाल सिद्धेश्वर इंतुले, भंडारपाल नागेश शितोळे, जनसंपर्क अधिकारी अनिरुद्ध देशपांडे, अभिजित तेरखेडकर, उपाध्ये बंडो पाठक तसेच मंदिर संस्थानचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. दीपोत्सवाचे चोख व्यवस्थापन भंडारपाल नागेश शितोळे यांनी केले. मंदिर परिसरात हजारो दिव्यांची आरास, आकर्षक रांगोळ्या आणि सुंदर सजावटीने परिसर उजळून निघाला होता. भाविकांनी दीपदान करून भक्तिभावाने देवीचे दर्शन घेतले.



त्रिपुरारी पौर्णिमेला भगवान शंकराने त्रिपुरासुराचा वध केला होता, त्याच्या स्मरणार्थ हा दिवस 'देवदिवाळी' म्हणून साजरा केला जातो. भगवान शंकराच्या विजयाच्या आनंदार्थ देवतांनी दिवे लावल्याने दीपोत्सव साजरा करण्याची परंपरा आजही टिकून आहे.

धार्मिक मान्यतेनुसार हा दिवस अत्यंत पवित्र मानला जातो. भगवान शंकर आणि भगवान विष्णू यांच्या पूजेस या दिवशी विशेष महत्त्व असते. भाविकांनी या निमित्ताने पूजन, दर्शन आणि दीपदानाचा लाभ घेतला.

## दातृत्वातून दिला मायेचा स्पर्श; नागेशे बंधुंसाठी कपडे व उबदार पांघरूण



तभा वृत्तसेवा
कळंब, दि.६ नोव्हेंबर -
दसरा-दिवाळीचे सण उत्साहाने साजरे होत असले तरी समाजातील काही घटक आर्थिक अडचणींमुळे या आनंदापासून वंचित राहतात. अशाच गरजू व्यक्तींना मायेचा स्पर्श देण्यासाठी सेवानिवृत्त प्राध्यापक विश्वासराव जाधवर यांनी दातृत्वाचे उदाहरण घालून दिले.

गेल्या पन्नास वर्षांपासून गाय-गुरांचे पालन करणारे प्रकाश रामभाऊ नागेशे (वय ६५) तसेच कळंब आडत बाजारात दुकानाची राखण करून उपजीविका करणारे अनिल रामभाऊ नागेशे (वय ६२) या बंधूंना प्रा. जाधवर यांच्या हस्ते शर्ट, पॅन्ट, धोतर, टोपी आणि शाल देऊन सत्कार करण्यात आला. या दातृत्वपूर्ण उपक्रमाने प्रेरित होऊन आडत व्यापारी जुगलकिशोर मालपाणी यांनी थंडीच्या दिवसात या दोघा बंधूंना उबदार पांघरूण भेट देऊन मायेची ऊब अर्पण केली.

या प्रसंगी ह.भ.प. महादेव महाराज अडसूळ, माधवसिंग राजपूत यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.